दैनिक
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक

# राष्ट्र सह्याद्री

● संपादक : काकासाहेब नवले ● RNI No. MAHMAR /2019/82605 ● वर्ष ६ वे ● अंक २४२ ● गुरुवार, १२ जून २०२५ ● www.rashtrasahyadri.com ● पाने ८ ● मूल्य रु. ४.००

गायकवाड हॉस्पिटल
मान,पाठ,कंबर,गुडघे,मणके,हाडांची तपासणी व शस्त्रक्रिया सवलतीच्या दरात केली जाईल.
MBBS, DNB, ORTHO, FIJR, FIJA, MNAMS
Ex registrar breach candy mumbai,
Ex consultant ananrishiji ahmednagar
Ex consultant shree sainath shridi
डॉ. गायकवाड प्रविण
अस्थिविकार व सांधेरोपण तज्ञ
©7709031130
पहिला मजला,राजपाल क्लॉथ स्टोअर शेजारी,कॉटज कॉर्नर, सावेडी,नगर-मनमाड रोड,अहिल्यानगर-४१४ ००३,फोन - ०२४१-२९९५५८८

## झापुक | zupuk

काकाला पाहून
पुतणे पळू लागले
शेजारी बसायचेही
टाळू लागले
फायद्यासाठी संवगडी त्यांना
काकाकडे जाऊ देईना
पुतण्या का जवळ येत नाही
काकांच्याही लक्षात येईना

**नवनाथ कुताळ,**
**9422231825**

# पालिका,पंचायतींना प्रभाग रचनेचे आदेश

**स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचा बिगुल वाजला**



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठीच्या हालचालींना वेग आला असून त्यासाठी प्रशासकीय पातळीवर प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे. त्याच पार्श्वभूमीवर महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींना प्रभाग रचना करण्याचे आदेश राज्य सरकानं दिले आहेत. अ, ब आणि क वर्ग महानगरपालिकांची प्रभाग रचना करण्याबाबतचे आदेश सरकारने दिले आहेत. यामध्ये पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, पिंपरी चिंचवड, नवी मुंबई, वसई विरार, छत्रपती संभाजीनगर आणि कल्याण डोंबिवलीसारख्या महापालिकांचा समावेश आहे. राज्यात गेल्या तीन ते चार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडलेल्या आहेत. त्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर आता त्यासंबंधी हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत. या निवडणुकीसाठी प्रभाग रचना करण्यासंदर्भात राज्य सरकारने आदेश दिले आहेत. राज्यात ज्या ठिकाणी महापालिका निवडणुका घेण्यात येणार आहेत त्या ठिकाणी आता प्रभाग रचनेचे **(पान ४ वर)**

**अ वर्ग महानगरपालिका – पुणे, नागपूर**
**ब वर्ग महानगरपालिका – ठाणे, नाशिक, पिंपरी-चिंचवड**
**क वर्ग महानगरपालिका – नवी मुंबई, वसई-विरार, छत्रपती संभाजीनगर, कल्याण डोंबिवली**

### ■ ड वर्ग महापालिकांमध्ये तीन ते पाच सदस्य

ड वर्गातील महापालिकेत प्रभाग रचना ठरवताना शक्यतोवर सर्वच प्रभाग चार सदस्यांचे करायचे आहेत. मात्र, सर्वच प्रभाग चार सदस्यांचे होत नसल्यास एक प्रभाग तीन अथवा ५ सदस्यांचा होईल किंवा दोन प्रभाग ३ सदस्यांचे होतील. ड वर्ग महापालिकांमध्ये अमरावती, अहिल्यानगर, अकोला, कोल्हापूर, सोलापूर, संगाली-मिरज-कुपवाड, मिरा भाईंदर, उल्हासनगर, भिवंडी-निजामपूर, जळगाव, नांदेड, धुळे, मालेगाव, लातूर, चंद्रपूर, परभणी, पनवेल, इचलकरंजी आणि जालना या महापालिकेचा समावेश आहे.

### ■ शिवसेना, काँग्रेसचा विरोध

मुंबई प्रमाणेच पुण्यातही एक सदस्यीय प्रभागरचना व्हावी. जर चार सदस्यीय प्रभाग रचना आमच्यावर लादली तर आम्ही या निर्णयाविरोधात कोर्टात जाऊ, असा इशारा उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शहराध्यक्ष संजय मोरे यांनी दिला. त्यासोबतच पुण्यातील काँग्रेसने देखील या चार सदस्य प्रभाग रचनेला विरोध केला.

# महायुतीतच निवडणुका लढणार

## शक्य नसेल तिथे मैत्रीपूर्ण लढत : मुख्यमंत्री फडणवीस



**मुंबई :** भाजपमध्ये निवडणुका लढण्यासंदर्भातील निर्णय करण्याचा अधिकार हा आमचे अध्यक्ष, कार्याध्यक्ष आणि आमची निवडणूक कमिटी यांना आहे. बाकी कुणालाही याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार नाही. आम्ही महायुतीत निवडणुका लढणार आहोत. एखाद्या ठिकाणी, जिथे शक्य नाही तिथे मैत्रीपूर्ण लढत होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

आगामी काळात राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडणार आहेत. या निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक पक्ष कामाला लागले आहेत.

### शक्य तिथे युती

येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ज्या निवडणुका आहेत, त्यामध्ये शक्य तिथे जरुर युती करु. पण शक्य नसेल तिथे आपण आपल्या ताकदीवर लढायचं आहे.

**– प्रफुल्ल पटेल**
राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते

महायुतीमधील तीनही मोठे आणि महत्त्वाचे घटक पक्षदेखील कामाला लागले आहेत. राज्यात महायुतीचं सरकार आहे. पण स्थानिक पातळीवरचं राजकारण वेगळं असतं. यामुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुतीचे घटक पक्ष एकत्र निवडणूक लढणार की स्वतंत्र? याबाबत वेगवेगळे मतप्रवाह आहेत. राज्यभरातील सर्व निवडणुका महायुती म्हणून एकत्र लढू. एखाद्या ठिकाणी वाद झाला तर मैत्रिपूर्ण निवडणूक लढू. संभ्रम नको, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी देखील स्पष्ट केले. महाराष्ट्रात संपूर्ण निवडणुका महायुती सोबत लढणार आहे. शंभर टक्के सोबत लढणार आहे. आम्ही असेच आदेश आमच्या पक्षाला दिले आहेत. आमच्या कार्यकर्त्यांनादेखील तसे आदेश दिले आहेत. त्यांचं स्थानिक पातळीवर बोलणं सुरु झालेलं आहे. फारच वाद उत्पन्न झाला तर एखाद्या ठिकाणी मैत्रीपूर्ण लढू. बाकी सरसकट महायुती आहे. कुठलाही संभ्रम बाळगायची गरज नाही, असे बावनकुळे म्हणाले.

## महत्वाचे...

### 'राष्ट्रवादी'च्या युवा नेत्याची आत्महत्या कारमध्ये आढळला मृतदेह

सोलापूर : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते ओंकार हजारे (वय- ३२ वर्षे) यांनी विष प्राशन करून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना सोलापूरमध्ये घडली आहे. कारमध्ये त्यांचा मृतदेह आढळून आल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. ओंकार हजारे हे 'अण्णा' नावाने परिचित होते. मिळालेल्या माहितीनुसार, रविवार (८ जून) रात्री ही घटना घडली. ओंकार यांचा मृतदेह त्यांच्याच कारमध्ये आढळून आला. ओंकार यांनी विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली आहे. या घटनेमुळे सोलापूरच्या राजकीय आणि सामाजिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

### खलिस्तान्यांकडून डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याची तोडफोड

**होशियारपूर :** पंजाबच्या होशियारपूर जिल्ह्यामधील नूरपूर जट्टान गावतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याची मोडतोड करण्यात आली. प्रतिबंधीत सिख फॉर जस्टिसचा (एसएफजे) दहशतवादी गुरपतवंत सिंग पन्नू याने या घटनेची जबाबदारी घेतली आहे. आंबेडकरांच्या पुतळ्याला लक्ष्य करण्याची ही आठवडाभरातील दुसरी घटना आहे. यापूर्वी फगवाडाच्या फिल्लौर भागातही बाबासाहेबांच्या पुतळ्याची तोडफोड करण्यात आली होती.यासंदर्भात गुरपतवंत सिंग पन्नूने या आयकॉनोक्लास्टिक हल्ल्या चे व्हिडिओ फुटेज जारी केले आहे.

### उद्यापासून मान्सून पुन्हा सक्रिय होणार

**पुणे :** वेळेआधी सक्रिय झालेल्या मान्सूनने पुन्हा विश्रांती घेतल्याने शेतकऱ्यांचे डोळे आभाळाकडे लागले आहेत. काही ठिकाणी तुरळक सरी झाल्या असल्या, तरी सर्वदूर पावसाचा जोर नाही. मात्र, आता १३ जूनपासून पुन्हा एकदा मान्सून सक्रिय होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. हवामान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. सानप यांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ जूनपासून कोकण आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रातील काही भागांत मान्सून जोरात सक्रिय होणार आहे. कोल्हापूर, सातारा, सांगली, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज असून या भागांमध्ये ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. पुणे आणि अहिल्यानगरमध्ये देखील पावसाचे प्रमाण वाढणार आहे.

# एआय शेतीत क्रांती घडवणार : शरद पवार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** आरोग्य शिक्षण शेती अशा सर्वच क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा वापर वाढायला पाहिजे. शेती क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्याचे आम्ही ठरवले आहे. राज्य शासन वसंत दादा शुगर इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून उसाच्या क्षेत्रात प्रायोगिक तत्त्वावर राज्यातल्या १० हजार शेतकऱ्यांच्या शेतामध्ये याचा प्रयोग केला जाणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साह्याने ३० टक्के उत्पादन खर्च कमी करतानाच उत्पादनामध्ये जवळपास ३० टक्क्यांनी वाढ करण्याचे उद्दिष्ट असल्याचे देशाचे माजी कृषिमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनी सांगितले. हा बदलाव शेतीच्या क्षेत्रामध्ये हे तंत्रज्ञान 'गेम चेंजर' ठरेल. हे तंत्रज्ञान शेतीची अर्थव्यवस्था बदलायला हातभार लावणार आहे. त्या सगळ्या कामांमध्ये नगर जिल्ह्यातल्या जाणकार शेतकऱ्यांचा सहभाग असला पाहिजे अशी अपेक्षा पवार यांनी व्यक्त केली.

माहिती तंत्रज्ञान व संगणक क्षेत्रात भरीव योगदान



देणाऱ्या डॉ. विवेक सावंत यांना 'स्व. ड. रावसाहेब शिंदे स्मृती पुरस्कारा'ने राष्ट्रवादीचे संस्थापक शरद पवार यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी जेष्ठ पत्रकार मधुकर भावे, भगीरथ शिंदे, नगर जिल्ह्याचे खासदार निलेश लंके, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, रयत शिक्षण संस्थेचे दादा कळमकर आदींना यावेळी सन्मानित करण्यात आले. शरद पवार म्हणाले, देशाच्या शेती **(पान ४ वर)**

## १० हजार शेतकऱ्यांच्या ऊस शेतीत करणार प्रायोगिक उपयोग; ३० टक्के उत्पादन खर्च कमी करतानाच उत्पन्न वाढणार

### एआय उसासाठी राज्य सरकारकडून ५०० कोटी

राज्याच्या अर्थमंत्र्यांनी जाहीर केल्यानुसार सुरुवातीला १० हजार शेतकरी घेतले. त्या १० हजार शेतकऱ्यांसाठी लागणारा निधी यातील काही वाटा हा महाराष्ट्र सरकार देईल. त्यासाठी त्यांनी ५०० कोटी रुपयांची तरतूद केली. याबरोबरच वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट ज्याचा अध्यक्ष मीच आहे, तिथूनही आम्ही काही रक्कम घालत आहोत. साखर कारखान्यांनी सुद्धा घालावेत. साधारणतः सुरुवातीला दर हेक्टरी २५ हजार खर्च आहे, आणि दुसऱ्या वर्षापासून तो खर्च जवळपास ९ हजाराच्या आसपास येईल. तेव्हा सुरुवातीचा २५ हजार खर्च शेतकऱ्याला झेपणार नाही तिथे महाराष्ट्र सरकार, साखर कारखाने आणि वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट हे तिघे एकत्रित शेतकऱ्यांना अर्थसहाय्य करतील. म्हणून शेतकऱ्यांनी या नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून घेतला पाहिजे.

**– शरद पवार**

# ...तर बच्चू कडूंच्या आंदोलनाची ठिणगी महाराष्ट्रभर पडेल

## रास्ता रोको आंदोलनाचा खा. लंके यांचा इशारा





### अभी नही तो कभी नही, बच्चू भाऊंची महाराष्ट्राला गरज

प्रत्येकाने आपापल्या भागात आंदोलन केले पाहिजे. प्रत्येक दिवशी वेगवेगळे आंदोलन केले पाहिजे, असे खा. निलेश लंके म्हणाले. अभी नही तो कभी नही. बच्चू भाऊसमोर जर सरकार झुकल नाही तर कोणाच समोर झुकणार नाही. बच्चू भाऊंची महाराष्ट्राला गरज आहे, असेही निलेश लंके म्हणाले.

**अमरावती :** शेतकऱ्यांची कर्जमाफी आणि विविध मागण्यांसाठी प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी चार दिवसांपासून अमरावतीमध्ये अन्नत्याग आंदोलन सुरु केलं आहे. मनोज जरांगे पाटील, महादेव जानकर यांच्यापाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे खासदार निलेश लंके यांनी या आंदोलनस्थळी भेट देऊन बच्चू कडू यांच्या तब्बेतीचे विचारपूस **(पान ४ वर)**

# मराठा एसईबीसी आरक्षणाला स्थगिती नाही

## विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा मार्ग मोकळा; १८ व १९ जुलैला उच्च न्यायालयात होणार सुनावणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री





**मुंबई :** मराठा आरक्षणासंदर्भात दाखल झालेल्या विविध याचिकांवर बुधवारी एकत्रित सुनावणीस सुरुवात झाली. यावेळी मराठा समजाच्या १० टक्के एसईबीसी आरक्षणवर कुठलीही स्थगिती दिलेली नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. त्यामुळे मराठा विद्यार्थ्यांना एसईबीसी कोट्यातून प्रवेशाचा मार्ग मोकळा झाला आहे. आता पुढील सुनावणी पुढिल महिन्यत १८ व १९ जुलैला होणार आहे, अशी माहिती उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांनी दिली. १९ जुलै ला पुढची तारीख जाहीर केली जाणार आहे.

मराठा आरक्षणाच्या बाजुने आणि विरोधात याचिका दाखल आहेत. मुंबई उच्च न्यायालयात मराठा आरक्षणावरील सुनावणी झाली. बुधवारी वकिलांनी युक्तिवाद केला.

सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाला मे महिन्यात मराठा आरक्षणावरील सर्व याचिकांवर सुनावणी घेण्याचे निर्देश दिले होते. आरक्षणाच्या विरोधातील याचिकांमुळे उच्च शिक्षणातील मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना आरक्षण देण्यात अडचण येत असल्याचे समोर आले होते. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या वैधतेबाबतची नव्याने सुनावणी आजपासून मुंबई उच्च न्यायालयात होत आहे. मराठा आरक्षण वैध ठरणार की नाही? याची फैसला त्यात होणार आहे.

हायकोर्टाचे न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांच्या नेतृत्वाखालील विशेष त्रिसदस्यीय पूर्णपीठ सुनावणी घेत आहे. सुरुवातीला प्रकरण अंतरिम दिलास्यासाठी घ्यायचं की फायनल ऑर्डरसाठी यावर वकिल आणि न्यायमूर्ती यांच्यात युक्तीवाद सुरू झाला. यावेळी विरोधी वकिलांनी जो पर्यंत तारीख होत नाही तो पर्यंत स्टे द्यावा, असा युक्तिवाद केला. यानंतर फायनल सुनावणीसाठी प्रकरण घेण्यात यावं असा युक्तिवाद सरकारी वकिलांनी केला. **(पान ४ वर)**

# हजारो चाहत्यांच्या उपस्थितीत साहेबराव घाडगे पाटील यांच्यावर अंत्यसंस्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** हजारो चाहत्यांच्या उपस्थितीत साश्रू नयनांनी नेवासाफाटा येथील त्रिमूर्ती शैक्षणिक सैनिकी संकुलाचे संस्थापक श्री साहेबराव घाडगे पाटील यांच्यावर शोकाकुल वातावरणात बुधवारी दि.११ जून रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.अमर रहे...अमर रहे..., घाडगे पाटील साहेब...अमर रहे..अशा घोषणेने त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलाचा परिसर दुमदुमला होता.

मुंबई येथून पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास घाडगे पाटील यांचे पार्थिव त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलात आणल्यानंतर सकाळी ८ ते १० यावेळेत अंत्य दर्शनासाठी ठेवण्यात आले.घाडगे पाटील यांच्या पार्थिवाचे दर्शन घेतांना विद्यार्थी,पालक,कामगार,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग हंबरडा फोडतांना दिसत होता. सदरचे पार्थिव फुलांनी सजविण्यात आलेल्या रथात ठेवण्यात आले होते त्यानंतर टाळ मृदुंगाच्या गजरात येथील मुख्य क्रीडांगण असलेल्या मैदानावर आणण्यात आले.याठिकाणी बनविण्यात आलेल्या स्मारकावर पार्थिव ठेवण्यात आले.यावेळी एनसीसी कॅडेटच्या वतीने सलामी देत मानवंदना देऊन पुष्प चक्र अर्पण करण्यात आले. घाडगे पाटील यांची कन्या सौ.स्नेहलताई घाडगे-चव्हाण पाटील यांनी पार्थिवास अग्निडाग दिला.






यावेळी माजी मंत्री शंकरराव गडाख परिवाराच्या वतीने सौ.सुनीताताई गडाख,आमदार विठ्ठलराव लंघे पाटील परिवाराच्या वतीने सुनीलभाऊ लंघे पाटील,ज्ञानेश्वर उद्योग समूहाच्या वतीने माजी आमदार पांडुरंग अभंग,काशिनाथ अण्णा नवले,माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे,भाजपचे विधानसभा अध्यक्ष सचिन देसरडा,पंचायत समितीचे सहायक गटविकास अधिकारी सुरेश पाटेकर, श्रीकांत तिडके, शिवाजीराव काकडे,राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे किशोर अण्णा निर्मळ,पत्रकार संघटनेच्या वतीने सुधीर चव्हाण,मुळाचे अध्यक्ष नानासाहेब तुवर,खा. वाकचौरे मित्र मंडळाच्या वतीने बाळासाहेब सोनवणे, फाटके परिवाराच्या वतीने नानासाहेब फाटके,बेल्हेकर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेश बेल्हेकर,शरद काळे, तेलकुडगाव ग्रामस्थांच्या वतीने सतीश काळे,सचिन जगताप,यांनी साहेबराव घाडगे पाटील यांचे जीवनकार्य विषद करत श्रद्धांजली अर्पित केली.

यावेळी सांत्वन करण्यासाठी हजारो चाहत्यांचे आभार मानण्यासाठी घाडगे पाटील यांच्या पत्नी त्रिमूर्ती संकुलाच्या अध्यक्षा अँड.सुमतीताई घाडगे पाटील हया भावुक झाल्या त्या म्हणाल्या की त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलामध्ये बालविश्व निर्माण करण्यासाठी घाडगे साहेबांना अनेक त्यांच्या खंदया सहकाऱ्यांनी मोठी साथ दिली.शैक्षणिक क्षेत्रात क्रांती करणारे घाडगे पाटील साहेब हे त्रिमूर्तीचे पांडुरंग ठरले,त्यांनी गरीब गरजू व वंचित घटकांना न्याय देऊन मदत करण्याचा प्रयत्न केला,ते कर्मयोगी होते,कर्मभूमी ही त्यांची पूजा होती त्यासाठी **(पान ४ वर)**

### ■ संस्थेच्या हितासाठी शेवटच्या श्वासापर्यंत लढा..

संस्थेच्या कामानिमित्त मंगळवारी दि.६ जून रोजी मुंबई येथील मंत्रालयात श्री घाडगे पाटील साहेब हे गेले होते दुपारी मंत्रालयातील वॉश रुममध्ये फ्रेश होण्यासाठी गेले असता ते पाय घसरून फरशीवर पडले त्यामुळे त्यांच्या डोक्याच्या मागील बाजूस मेंदूला मार लागल्यामुळे त्यांचे निधन झाल्याचे त्यांच्या कुटुंबियांकडून सांगण्यात आले. शेवटच्या श्वासापर्यंत घाडगे पाटील यांनी संस्थेच्या हितासाठी लढा दिला.त्यांच्या निधनाची वार्ता काल सायंकाळच्या सुमारास वाऱ्यासारखी पसरल्याने नेवासा तालुक्यात अनेकांनी हळहळ करत शोक व्यक्त केला

## संपादकीय

# शिंदेसेनेचे 'ते सात' भ्रष्टाचारात हात..?

महायुतीमधील भाजपाचा मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेचे एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदाची तडजोड करत उपमुख्यमंत्री पदावर विराजमान होणे पसंत केले. त्यानंतर महायुतीमधील कुरघोडी अन् नाराजीनाट्य सुरु झाले अशातच आता शिवसेना शिंदे गटाचे नवनवीन मंत्री वेगवेगळ्या वादात आणि भ्रष्टाचाराच्या प्रकरणात अडकताना दिसत आहेत. स्वतः उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या एमएसआरटीसी खात्यावर ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील काही मोठे कंत्राट अधिक दराने दिल्याने सर्वोच्च न्यायालयाने फटकारले आहे. ज्यामुळे एकनाथ शिंदे यांच्यावर कंत्राट रद्द करण्याची नामुष्की ओढावली. त्याचबरोबर परिवहन मंत्री प्रताप यांच्या खात्यात एसटी ईबस खरेदी वादाचा विषय झाला आहे.

शिवसेना शिंदे गटाचे आणखी एक वजनदार मंत्री म्हणजे भरत गोगावले. फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी त्यांच्या खात्याला निधीच नाही यावरून तीळ पापड होत होत आहे. त्यातच या खात्यातील क्षमतेपेक्षा अधिक काम दिल्याने आता निधी नाही अशी स्थिती दिसत आहे. दुसरीकडे वादामुळे रायगडचे पालकमंत्रीपदाचे स्वप्न सध्यातरी अपूर्णच आहे. शिंदे गटाचे मंत्री संजय शिरसाटही सध्या वादाच्या भोवऱ्यात अडकले आहेत. सामाजिक न्याय खात्यात निधी नाही यावरून ओरड होत असतानाच मुख्यमंत्र्यांकडून जाहीर रित्या कुठेही निधी वळवला जात नाही अशी भूमिका घेतली गेली त्यातच शिरसाट यांचे संभाजीनगरमधील मुलाचे हॉटेल खरेदी प्रकरण, एमआयडीसीमधील भूखंड विषयांनी वाढत आहे. महत्त्वाचं म्हणजे शिरसाट यांना देण्यात आलेल्या एमआयडीसी भूखंडावरून उद्योग मंत्री उदय सामंत यांची सुद्धा राजकीय कोंडी होण्याची शक्यता आहे कारण हे खाते सामंत यांच्याकडे येते.

संजय राठोड यांच्याकडे असलेल्या जलसंधारण खात्याची मागील आठवड्यातच २०० वेगवेगळी काम मुख्यमंत्र्यांनी रद्द केली. नियमितपणा नाही आणि भ्रष्टाचाराच्या संशयावरून या खात्यांना स्टे आला आहे .त्याच वेळी संजय राठोड यांच्या खात्यात बदलांच्या अधिकाऱ्यावरून मोठ्या प्रमाणात अर्थ व्यवहार होत असल्याचा आरोप आता केला जात आहे अनेक प्रशासकीय अधिकाऱ्यांना एकाच जागेवर एक पद दीर्घकाळ देण्यामध्ये मोठे अर्थपूर्ण व्यवहार झाल्याचा आरोप विरोधक करत आहेत.

दरम्यान, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे हे हिंदी भाषेचा पर्याय या आधीच अडचणीत आले आहेत. त्यात शालेय शिक्षण खरेदी या विषयावरून दररोज आरोप होताना दिसतात, तर गुलाबराव पाटील पाणीपुरवठा मंत्रालय यांच्याकडे आहे केंद्रीय मंत्रालयाची हर घर पाणी योजना राज्यात योग्य अंमलबजावणी होत नाही म्हणून विरोधकांकडून त्यांच्यावरही आरोप होत आहेत. एकूणच शिंदे सेनेचे शिलेदार सध्या भ्रष्टाचाराच्या आरोपात अडकल्याने पक्षांमध्ये इनकमिंग सुरू तरी महायुतीत बार्गेनिंग पावर कमी होताना दिसत आहे. आता या सगळ्या अडचणीतून एकनाथ शिंदे कसा मार्ग काढतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# मेहेकरीफाटा येथील पुलाच्या कामाला गती पंधरा दिवसात काम पूर्ण होणार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मिरी :** नगर पाथर्डी रस्त्यावरील मेहेकरी फाटा येथे नवीन पूल बांधण्याचे काम प्रगतीपथावर असून या नवीन पुलामुळे कल्याण निर्मळ राष्ट्रीय महामार्गावरील प्रवास आणखी वेगवान होणार आहे. या नविण पुलाचे काम पंधरा दिवसात पूर्ण होणार असल्याचा विश्वास ठेकेदार देवकर यांनी व्यक्त केला आहे. भिंगार शहरा पासून पुढे मेहेकरी फाट्या पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण देखील नुकतेच पूर्ण करण्यात आले असून गेल्या अनेक दिवसांपासून मेहेकरी फाटा येथील पुलाचे काम देखील होणे महत्त्वाचे होते. पूर्वीचा पूल अरुंद आणि कमी उंचीचा असल्यामुळे पावसाळ्यामध्ये या ठिकाणी नदीला पूर आल्यानंतर तासंतास येथे खंडित व्हायची अरुंद फुलामुळे या ठिकाणी छोटे-मोठे अपघात देखील होत असायचे. परंतु नवीन पूल या ठिकाणी आता उभा राहत असल्यामुळे यापूर्वी घडणारे अपघात आता मात्र टळले जाणार आहेत. नवीन पुलाची रुंदी त्याचबरोबर उंची देखील वाढणार असल्यामुळे नगर पाथर्डी रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा मार्ग आणखी सुकर होणार आहे.

**वेळेत पूर्ण करणार,, पावसाळा सुरू झालेला आहे त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहन चालकांची गैरसोय होऊ नये म्हणून संपूर्ण यंत्रणा रात्रंदिवस या पुलाचे काम वेळेत पूर्ण करण्यासाठी व्यस्थ आहे. निश्चितपणे कॉलिटी आणि कॉन्टिटीचे महत्त्व लक्षात घेता पुढील पंधरा दिवसात पुलाचे काम निश्चितपणे पूर्ण होईल असा विश्वास कॉन्ट्रॅक्टर तुकाराम देवकर व्यक्त केला आहे.**



# शेतीच्या वादावरून माय लेकीला मारहाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** शेतीच्या वादावरून आरोपींनी दोघा माय लेकीला काठी व बूक्क्यांनी मारहाण केल्याची घटना दि. ६ जून रोजी दुपारच्या सुमारास राहुरी तालुक्यातील देसवंडी येथे घडली असून या घटनेतील मिना ज्ञानदेव शिरसाठ, वय ५५ वर्षे, रा. देसवंडी, ता. राहुरी, यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे कि, मिना शिरसाठ यांच्या नावावर देसवंडी शिवारात एक एकर दोन गुंठे शेती आहे सदर शेती शेजारी त्यांचे भावबंध सोपान एकनाथ शिरसाठ यांची शेती आहे.दि. ६ जून २०२५ रोजी दुपारी ४.३० वाजे दरम्यान मिना शिरसाठ व त्यांची मुलगी त्यांचे शेतामध्ये असतांना तेथे आरोपी आले. व मला म्हणाले की, तु आमच्या शेती खरेदीचे पैसे दे नाहीतर १० गुंठे शेती दे. असे म्हणाले असता शिरसाठ त्यांना म्हणाल्या की, मी तुम्हाला तेव्हाच रोख पैसे दिलेले आहेत. आता तुम्हाला १० गुंठे शेती देण्याचा काही संबंध नाही. असे म्हणालेचा आरोपींना राग आल्याने त्यांनी मिना शिरसाठ व त्यांच्या मुलीला काठीने व लाथा बुक्क्याने मारहाण केली. तसेच तुम्ही आम्हाला १० गुंठे शेती दिली नाहीतर तुम्हाला इथे शेती करु नाही, नाहीतर तुला येथेच गाडुन टाकु, अशी धमकी दिली.

या घटने नंतर मिना ज्ञानदेव शिरसाठ यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून आरोपी सोपान एकनाथ शिरसाठ, विकास सोपान शिरसाठ, मंदाबाई सोपान शिरसाठ, सर्व रा. देसवंडी, ता. राहुरी, यांच्यावर गुन्हा रजि. नं. ६४४/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ११५ ११८ (१), ३५१ (२), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे हे करीत आहेत.

# शहरातील समस्या मार्गी न लागल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा भाजपाचा इशारा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी नगरपरिषद हद्दीतील सर्व प्रभागातील नाली साफ सफाई, डास फवारणी व तणनाशक फवारणी स्ट्रीट व रस्त्याच्या समस्यां बाबत काल दि. ११ जून रोजी सकाळी भाजपच्या कार्यकर्त्यांनी मुख्याधिकारी यांच्या दालनात ठिय्या मांडत समस्यांचा पाढा वाचला. राहुरी येथील भारतीय जनता पार्टीच्या वतीने मुख्याधिकारी ज्ञानेश्वर ठोंबरे यांना काल दि. ११ जून २०२५ रोजी सकाळी निवेदन देण्यात आले. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, नगरपरिषद हद्दीत पावसाळ्यापुर्वी जेसीबी गाळ काढण्यात आला होता. पण जेसीबी ने तो गाळ पुर्णपणे काढण्यात आला नव्हता आणि काढलेला गाळ पावसामुळे पुन्हा तो नाल्यांमध्ये जावुन नाल्या तुंबल्या आहेत. कर्मचाऱ्याच्या मदतीने सदर गाळ काढण्यात यावा. तसेच शहरात डासांचे प्रमाण वाढुन रोगराई पसरत आहे. नगरपालीके मार्फत अद्याप पर्यंत रोगराईची फवारणी केलेली नाही. शहरामध्ये वाढलेले गवतांवर फवारणी अद्याप पर्यंत केली नसल्याने सदरचे तन खुप मोठ्या प्रमाणात वाढले असुन त्यापासुन साप, विंचु यांचे धोका निर्माण झालेला आहे. शहरातील कचरा गोळा करणाऱ्या घंटागाड्या, कचरा उचलणारे टॅम्पो यांचेकडे उचलला जाणारा कचरा वेळेवर उचलला जात नाही. त्यामुळे नागरीक त्रस्त झाले असुन सदरचा कचरा रस्त्यावर फेकला जातो. तसेच नगरपरिषद हद्दीत ग्रामीण भागात लावलेले स्ट्रीट लाईट हे वारंवार रिपेअर करुन देखील दिवसा चालु रात्री बंद अवस्थेत आढळुन आलेले आहेत. नगर-मनमाड रोडवरील स्ट्रीट लाईट ही पुर्णपणे बंद आहे. त्याचबरोबर शहरातील रस्त्यांची झालेली दुरावस्था व तसेच रस्त्यावर साठणाऱ्या पावसाच्या पाण्याची विल्हेवाट लावण्यात यावी. आदि समस्या बाबत राहुरी येथील भाजपच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन यांच्या दालनात ठिय्या मांडून समस्यांचा पाढा वाचला. येत्या आठ दिवसांत सर्व समस्या मार्गी न लागल्यास भाजपच्या वतीने तिव्र स्वरुपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी माजी उप नगराध्यक्ष आर आर तनपूरे, भाजप चे राहुरी मंडळाध्यक्ष विक्रम भुजाडी, संभाजी तनपुरे ,गणेश खैरे, सचिन मेहेत्रे,किशोर येवले, सतीश फुलसौंदर, राजेंद्र उंडे,राम अजित डावखर, अक्षय तनपुरे, झिशान शेख,दत्तू गायकवाड , दिनेश उंडे, सागर येवले , काकासाहेब आडागळे, व माजी नगरसेवक उपस्थित होते.

# शेडनेट प्रकल्पातून विद्यार्थी करणार रोपांची निर्मिती

## प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचा उपक्रम, कृषीच्या विद्यार्थ्यांना संधी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** प्रवरा कृषी शास्त्र संस्थेतील विद्यार्थ्यांना कृषी शिक्षणाचे ज्ञान प्रात्यक्षिकातून मिळावे म्हणून अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शेडनेटच्या माध्यमातून रोपांचे उत्पादन तयार करण्याचा प्रकल्प कार्यान्वित केला आहे. कृषी क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञान विद्यार्थ्यांना शिक्षण घेतानाच मिळावे या उद्देशाने प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या संकल्पनेतून या शेडनेट शेती प्रकल्प सुरू करण्यात आला संस्थेचे संचालक डॉ. उत्तमराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्पातून रोपांची निर्मिती करून शेतकऱ्यांच्या बांधापर्यत पोहचविण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना शेडनेट, पॉलिहाऊस मधील संरक्षित शेती बरोबर नवीन तंत्रज्ञान प्रत्यक्ष कृतीतून आणि त्यांच्या प्रायोगिक ज्ञानातून शिकता यावे विचाराने संस्थेने भव्य स्वरुपातील शेडनेटची उभारणी केली. मंत्री ना. विखे पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य या प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात येणार असून, नव्याने उभारण्यात आलेल्या शेडनेट हाऊस मध्ये ढोबळी मिरची, रंगीत ढोबळी मिरची, झुकिनी आणि झेंडू लागवडीचा शुभारंभ प्रा.डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक डॉ. उत्तमराव कदम, प्राचार्य प्रा.दिलीप महाले, डॉ.निलेश दळे , डॉ. आशिष क्षीरसागर , शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. डॉ. सुस्मिता विखे पाटील म्हणाल्या, प्रवरेच्या माध्यमातून विद्यार्थी पदवी घेऊन बाहेर पडतांना तो तंत्रज्ञानाभिमुख असला पाहिजे. या दृष्टीने प्रत्येक महाविद्यालयात शिक्षण घेत असतानाच त्या शिक्षणासोबतच त्यांना वेगवेगळे कौशल्य प्रदान केले जाण्यासाठी पुढाकार घेण्यात आला आहे.जिल्ह्यातील यातून भविष्यामध्ये रोजगार निर्मिती आणि आपल्या क्षेत्रात त्यांना करिअर करता येणार आहे. ज्या विषयात शिकले त्याचे सखोल ज्ञान त्यांना मिळून त्याचा उपयोग ते आपल्या व्यक्तिगत व्यवसायासाठी समाजासाठी करू शकतात. कृषी संलग्नित प्रवरा कृषी शास्त्र संस्थेच्या माध्यमातून परिसरातील शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञान हे उपलब्ध व्हावे, हा मानस मंत्री विखे पाटील यांचा आहे. त्यादृष्टीने प्रवरा कृषी शास्त्र संस्था वर्षापासून वेगवेगळे उपक्रम आपल्या शेती क्षेत्रावर राबवून शेतकऱ्यांना त्याची माहिती देत आहे. येणाऱ्या काळात या संस्थेच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय कृषी संस्था सुरू करण्याचा मानसही त्यांनी यावेळी व्यक्त केला. प्रारंभी डॉ. उत्तमराव कदम यांनी पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील हायटेक प्रकल्पाची माहिती देत विद्यार्थी, प्राध्यापक आणि संस्थेतील कर्मचारी यांच्या संयुक्त विद्यमाने प्रकल्प येणाऱ्या काळात शेतकऱ्यांना चांगला दर्जे दार भाजीपाला, फळबाग, त्याचबरोबर फुलझाडांची रोपे संस्थेच्या माध्यमातून उपलब्ध करून देईल. शेतकऱ्यांना आपल्या शेतीमध्ये घेत असलेल्या वेगवेगळ्या पिकांचे तंत्रज्ञान हे प्रत्यक्ष कृतीतून बघता येणार आहे. प्रकल्पाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शेडनेट उभारणी,लागवडीसाठी बेड उभारणी, लागवड तंत्र, खत, पाणी व्यवस्थापन,रोग-किड नियंत्रण, विक्री आणि पॅकिंग यांचे ज्ञान येथील मार्गदर्शनाखाली विद्यार्थी शिकत आहेत. यामुळे येणाऱ्या काळात प्रवरेच्या कृषी शास्त्र संस्थेत शिक्षण घेणारा विद्यार्थी हा सक्षमरित्या उभा राहण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर हा प्रकल्प परिसरातील शेतकऱ्यांसाठी हायटेक शेती तंत्रज्ञानाची माहिती देणारा ठरेल असेही प्रा. डॉ. कदम यांनी सांगितले.



# चक्क कटींगसाठी चाहत्याचा पो. नि. गलांडे यांना कॉल



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** येथील ठाण्याचे पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे यांना याच्या कार्य तत्परते मुळे अनेक जण त्यांना वेळोवेळी फोनवर दिवस रात्र संपर्क साधतात अन त्यांच्या प्रतिसादाला ते साथ पण देतात परंतु एका केश कर्तनालयातील न्हावी कटींग करत नाही म्हणून थेट पो नि गलांडे यांना तक्रार करून कटींग करून घेणाऱ्या गंमतीदार किस्सा शिर्डीत चर्चेचा ठरत आहे. रणजीत गलांडे हे शिर्डी पोलीस ठाण्याचे एक संवेदनशील अधिकारी म्हणून ओळखले जातात. त्यांचेवर समोर घडलेल्या एखाद्या घटनेचा इतका त्वरीत प्रभाव पडतो. त्याच बरोबर शिर्डी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कुणाचा ही रात्री अपरात्री फोन येवो त्यास अतिशय नम्रपणे कॉलला उत्तर देण्यास गलांडे कधीही तयार असतात. ही त्यांची खासीयत परंतु या स्वभावाचा कोण कधी फायदा घेईल. याचा प्रत्यय नुकताच निदर्शनास आला आहे. झाले असे की त्यांच्या एका चाहत्याला दिवसभर कामा निमीत कटींग दाढी करायला वेळ मिळत नव्हता. तो ज्या ठिकाणी कटींग करायचा तो न्हावी गर्दी आहे निवांत या असा प्रेमाने सांगायचा. गेली आठ दिवस हाच प्रकार सुरू होता . जून ला रात्री १० वाजून ३८ मिनीटे झाली होती. तो चाहता त्या दुकाना समोरून जात होता. दुकान उघडे होते आता आपला नंबर लागेल या आशेने गाडी थांबवून दुकानात घुसला. न्हावी म्हणाला माझे हे शेवटचे ग्राहक आहे मी तुमची कटींग करू शकत नाही उदया या. न्हाव्याच्या या वक्तव्याने तो चाहता त्याने थेट पो नि गलांडे यांना फोन केला. साहेबांनी कॉल घेतला साहेब जेवण करत होते. चाहत्याने त्याची व्यथा सांगताच समोरून गलांडे यांनी त्या न्हाव्याला माझा माणूस आहे, कटींग करून दे असे सांगितल्याने त्याने कटींग केली. शिर्डीचे पीआय हे किती संवेदनशील हे या प्रसंगातून दिसून येत असून शिर्डीत या प्रकाराची चर्चा आहे.

# सदगुरु नारायणगिरी महाराज संतपूजनाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा बुद्रुक शिवारातील सुरेगाव रस्त्यावर गुरुवर्य श्री उध्दवजी महाराज मंडलिक नेवासेकर यांनी स्थापित केलेल्या सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रममध्ये संतसेवक नामदेवराव शिंदे यांच्या वतीने आयोजित संतपूजन सोहळयाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी उपस्थित संत महंतांचे संतपूजन नामदेवराव शिंदे,प्रदीप शिंदे,प्रशांत शिंदे यांच्या हस्ते करण्यात या प्रसंगी नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर संस्थानचे विश्वस्त वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के, त्रिवेणीश्वर देवस्थानचे रमेशानंदगिरी महाराज,गोणेगाव चौफुला येथील रामकृष्ण आश्रमाचे प्रमुख वेदांताचार्य हभप भगवान महाराज जंगले, आळंदी येथील मृदुंग महर्षी युवराज महाराज देशमुख,पिचडगाव येथील माऊली आश्रमाचे प्रमुख हभप ज्ञानेश्वर महाराज हजारे, उध्दव महाराज मंडलिक यांचे पिताश्री विश्वनाथ महाराज मंडलिक,बहिरवाडी येथील हभप रामनाथ महाराज पवार,विजय महाराज खेडकर,हभप दत्तगिरी महाराज,भागवताचार्य हभप अंकुश महाराज जगताप,ज्ञानदीप वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गहिनीनाथ महाराज आढाव,बेलपिंपळगाव येथील हभप संजय महाराज सरोदे यांच्यासह वारकरी संप्रदायातील सेवेकरी यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

# पोलीस पाटील सयाराम बानकर उद्या नगर आकाशवाणीवर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**सोनई :** शनिशिंगणापूर येथील पोलीस पाटील ॲड. सयाराम तुकाराम बानकर यांची अहिल्यानगर आकाशवाणी केंद्रावर दिनांक १३ जून रोजी लोकजागर या कार्यक्रमांमध्ये मुलाखत आहे. त्यांची मुलाखत बटुळे यांनी घेतली असून उल्लेखनीय सेवा कार्यासाठी तसेच राज्यपाल पोलीस पाटील सेवा पुरस्कार मिळाल्याबद्दल ही मुलाखत असणार आहे. ही मुलाखत १३ रोजी सकाळी ८/४० प्रसारित होणार असून त्याचं पुनः प्रसारण संध्याकाळी सव्वा आठ वाजता होणार आहे. राज्य भरातील पोलीस पाटील सेवा कार्याबद्दल शासनाच्या वतीने नुकताच पोलीस पाटलाच्या सेवेबद्दल राज्यपालांच्या जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी महाराष्ट्र दिनी बानकर यांना पुरस्कार प्रदान केला. पोलीस पाटलांच्या अडचणी बद्दल ॲड बानकर कायम प्रयत्नशील असतात त्यांच्या या प्रयत्नाची दखल घेऊन या पुरस्कारासाठी शासनाच्या वतीने हा निवडण्यात आले.

# भारतीय सैन्य दलातील ज्ञानेश्वरने घेतला अखेरचा श्वास

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**कोपरगाव :** कोपरगाव तालुक्यातील डाऊच खुर्द येथील दौलत विठोबा गुरसळ यांचे सुपुत्र ज्ञानेश्वर उर्फ पांडुरंग दौलत गुरसळ वय ४२ यांनी भारतीय सैन्य दलात तब्बल १८ वर्षे सेवा पूर्ण केली. आता नाशिक येथे देवळाली कॅम्प मध्ये डी सी विभागात ते सेवा देत होते. त्याचे गुरुवारी हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले. म

भारतीय सैन्य दलात काम करत असताना त्यांनी विविध क्षेत्रांमध्ये आपली देशाप्रती असलेली निष्ठा बजावली. भारतीय सैन्य दलाकडून त्यांचा झाला होता. भारतीय सैन्य दलात भरती झाल्यानंतर किती वर्ष सेवा द्यायची याची मर्यादा ठरलेली असते. मात्र पंधरा वर्षाचा बॉण्ड झाल्यानंतर देखील तीन वर्ष अधिक सेवा त्यांनी भारतीय सैन्य दलात केली. वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी ते सैन्य दलात सामील झाले होती. देवळाली येथे त्यांची तब्येत बिघडल्याने त्यांना खाजगी रुग्णालयात दाखल आले तेव्हा डॉक्टरांनी त्यांना तीव्र हृदय विकाराचा झटका आल्याचे कारण देत त्यांचा मृत्यू झाला असल्याचे घोषित केले. त्यांच्या पार्थिवावर डाऊच खुर्द स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधी प्रसंगी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. त्यांच्या पश्चात आई ,वडील, पत्नी ,दोन भाऊ, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.

# नेत्र शस्त्रक्रिया शिबिर अंधकारमय जीवनात प्रकाशासाठी वरदान : गायकवाड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** शहरातुन नेत्र व नेत्र शस्त्रक्रिया श्री लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्ट शिर्डी व आर झुंनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल पनवेल मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने १४ महिन्यापूर्वी नेत्र चळवळीचा श्री गणेशा केला व त्या माध्यमातून महाराष्ट्रातील सर्व दूर जिल्ह्यातील गोरगरीब सर्वसामान्य वयोवृद्ध निराधार यांच्यापर्यंत मोफत केली जाणाऱ्या शस्त्रक्रिया व चांगल्या प्रकारची आरोग्य सुविधा व सेवाभाव महती महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचली आज जवळपास दीड हजार रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आली. रुग्णांनी केलेले समाधान हीच कामाची पावती असून या आयोजित केलेल्या वेळोवेळी शिबिरात हजारो रुग्णांनी तपासणी करून लाभ घेतला असून हे शिबिर न राहता एक आरोग्याची चळवळ ट्रस्टचे अध्यक्ष अरुणराव गायकवाड विश्वस्त संगीता गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणावर होत असताना मनाला मोठे समाधान वाटत असल्याचे विश्वस्त साईराज गायकवाड यांनी सांगितले. साईंच्या श्रद्धा सबुरी व आरोग्य सेवेचा मंत्र समकालीन साईभक्त श्री लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्टच्या माध्यमातून धार्मिक सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक आरोग्य विषयक विविध उपक्रम गेल्या अनेक वर्षापासून मोठे योगदान दिले असून आमच्या कामाची दखल देखील विविध सेवाभावी संस्था यांनी कामाचा केलेला सन्मान हिच कामाची मोठी पावती असल्याचे सांगताना शिर्डी येथुन सुरू झालेली चळवळ महाराष्ट्रात एक केन्द्र बिदु ठरली आहे खाजगी वैद्यकीय रुग्णालयात महागडी वैद्यकीय सेवा परवडत नाही म्हणून डोळ्याने दिसत नसताना आयुष्यात वृद्धपकाळाशी सामोरे जात मृत्यूला सामोरे जाणारे बघितलेले काही रुग्ण व मनात असलेले शल्य यामुळे या हे सुरू करण्याची संकल्पना यामुळे यासाठी ट्रस्टच्या माध्यमातून हा उपक्रम सुरू करण्यात आला मोफत शिबिर नेत्र शस्त्रक्रिया यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती प्रसिद्धी माध्यम सेवाभावी संघटना खेड्यापाड्यात जाऊन लोकांना माहिती दिली जाते त्यामुळे शिवराज भाग घेणाऱ्या रुग्णाची संख्या वाढत आहे यात ४० ते ७०या वयोगटातील स्त्री पुरुषांचा समावेश दिसून येतो केवळ न घेता या शिबिरात आरोग्याची काळजी डोळ्याची निगा उपचार व मार्गदर्शन याबाबत प्रबोधन देखील केली जात आहे त्यातून समाजामध्ये डोळ्यांचे आजार उपचार व मार्गदर्शन किती मोठे महत्त्व आहे हे देखील अधोरेखित होत आहे हे नेत्रदृष्टी शिबिर अंधारातून प्रकाशाकडे जाणारे ठरले आहे याबाबत बोलताना अध्यक्ष अरुण गायकवाड म्हणाले की नेत्र ही एक वैद्यकीय उपक्रम नसून अधत्व मुक्त समाजाच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले जात आहे या नेत्र शस्त्रक्रिया शिबिराचा प्रचार प्रसार महाराष्ट्रात होण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरू आहे



हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Bahasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, Emal ID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818

## द•ख•ल

## वृद्ध महिलेने ठाण मांडले रस्त्यावरच



**वडाळा महादेव :** श्रीरामपूर येथील नेवासा रोड रेल्वे ओव्हर ब्रिज परिसरात साधारण ७५ ते ८० या दरम्यान असलेल्या वयोवृद्ध आजीने रस्त्यावरच ठाण मांडले असून त्यांनी रस्त्यावरच विश्रांती घेतली. यावेळी बराच वेळ वाहतुकीची कोंडी झाली होती. परंतु वाहतूक सुरळीत करत वाहन चालकांनी सदर आजीची काळजी घेत वाहने हळूच बाजूने घेत आजीस हुलकावणी मारून आपली वाहने या ठिकाणावरून काढून घेतले. अगदी रस्त्याच्या मध्यावरच आजीने विश्रांती घेण्याचा निर्णय घेतला. परंतु वाहतुकीचे कोंडी होत असल्याने वाहन चालकांमधून मनस्ताप निर्माण झाला. यामुळे संबंधित विभागातील अधिकारी पदाधिकारी यांनी सदर आजी बाबत चौकशी करून आजीचे नातेवाईक यांना माहिती द्यावी अशी स्थानिक नागरिकांनी मागणी केली यामुळे दुर्दैवी दुर्घटना होऊ नये या संदर्भात काळजी घ्यावी परिसरात बराच वेळ वातावरण तणावग्रस्त झाले होते आजी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला परंतु आजीने ऐकले नाही.

## तरुणाला मारहाण

**राहुरी :** वरात सुरु असताना नाचायला चल, असे म्हणाल्याचा राग आल्याने आरोपींनी अजय पवार या तरुणाला शिवीगाळ करुन लाथा बूक्क्यांनी मारहाण केली. ही घटना राहुरी तालुक्यातील पिंप्री वळण येथे दि. ६ जून रोजी रात्रीच्या सुमारास घडली. अजय भानुदास पवार, वय २६ वर्षे, रा. पवार वस्ती, कॅनॉलचे जवळ खेडले परमानंद रोड, पिंप्री वळण, ता. राहुरी, या तरुणाने राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे कि, पिंप्री वळण येथे दि. ६ जून २०२५ रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास वरात चालु असताना तेथे आरोपी दारु पिवुन आले होते. त्यावेळी अजय पवार आरोपीला नाचायला चल असे म्हणाला असता त्याला शिवीगाळ करुन लाथा बुक्क्यानी मारहाण केली.त्यानंतर दि. ७ जून २०२५ रोजी दुपारी १ वाजे सुमारास अजय पवार व त्याची पत्नी त्यांच्या राहते घराच्या पाठीमागील शेतात घासाची भाजी घेत असताना तेथे आरोपी आले. त्यांनी काहीएक न बोलता अजय याला गलोरीच्या इचकीने (मुठ) मारुन जखमी केले. तसेच लाथा बुक्क्यानी मारहाण केली. नंतर तु परत मला भेट तुला जीवंत मारुन टाकतो, अशी धमकी दिली.अजय भानुदास पवार याच्या फिर्यादीवरून चेतन वसंत जाधव, रा. पिंप्री वळण, ता. राहुरी, व त्याचा मेव्हणा या दोघांवर गुन्हा दाखल झाला आहे.

# शरद पवार यांची डॉ. तनपुरे कारखान्यावर नर्सिंग होमला भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी तालुक्याची कामधेनू असलेल्या डॉ. तनपुरे कारखान्याची नुकतीच निवडणूक होऊन यामध्ये अरुण तनपुरे यांच्या जनसेवा मंडळावर सभासदांनी भरभरून विश्वास टाकून त्यांना प्रचंड मताधिक्याने एक हाती सत्ता देऊन तनपुरे कुटुंबावर परत एकदा तालुक्याने आपला विश्वास टाकला आहे . नुकताच काल डॉ. बाबुराव दादा तनपुरे यांच्या पुण्यतिथी निमित्त कारखान्याशी संलग्न असलेल्या विवेकानंद नर्सिंग कॉलेज येथे एक छोटा सोहळा आयोजित केला होता त्यावेळी या कार्यक्रमाचे औचित्य साधून राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांनी विवेकानंद नर्सिंग होम ल सदिच्छा भेट देऊन नवनिर्वाचित सदस्यांचे अभिनंदन केले यावेळी युवा नेते व नवनिर्वाचीत संचालक हर्ष तनपुरे यांचा वाढदिवस असल्याने शरद पवार यांनी हर्ष तनपुरे यांनाही आशीर्वाद दिला.

डॉ. बाबुराव दादा तनपुरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त शरद पवारांनी अभिवादन केले. याप्रसंगी खा. निलेश लंके, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, राहुरी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अरुण तनपुरे, 'प्रेरणा'उद्योग समूहाचे व पतसंस्थेचे चेअरमन सुरेशवाबळे, रावसाहेब चाचा तनपुरे, हर्ष तनपुरे आदी मान्यवर उपस्थित होते.


(छाया-राजेंद्र परदेशी)

डॉ. तनपुरे कारखाना उभारणीत बाबुराव दादांचे मोठे योगदान असून दादांचे ते स्वप्नच होते व त्या स्वप्नातून निर्माण झालेला वारसा व त्यांचे विचार पुढे नेण्यासाठी मी निश्चित तुमच्या विश्वासास पात्र राहणार असल्याचा विश्वास यावेळी अरुण तनपुरे यांनी उपस्थितांना दिला.याप्रसंगी साई आदर्शचे संस्थापक चेअरमन, शिवाजीराव कपाळे, माजी उपनगराध्यक्ष अण्णासाहेब चोथे, 'आदर्श'चे चेअरमन सुधाकर कदम, आबासाहेब वाळुंज, माजी नगरसेवक आदिनाथ कराळे, बाळासाहेब उंडे, प्रकाश भुजाडी, डॉ. तनपुरे कारखान्याचे माजी सेक्रेटरी विजय डौले, इंद्रभान पेरणे, चंद्रकांत पानसंबळ, दत्तात्रय कवाणे, ज्ञानेश्वर खुळे,ज्ञानेश्वर कोळसे, सुनिल मोरे, अशोक उर्हे, प्रमोद तारडे, कृष्णा मुसमाडे, अरुण ढुस , बाबासाहेब सोनवणे, वैशाली तारडे, सूर्यकांत भुजाडी, भारत वारुळे, बाळासाहेब खुळे, विजय तमनर, डॉ. विश्वास पाटील, डॉ. वीर, संतोष आघाव, महेश उदावंत, अरुण ठोकळे, डॉ. जयंत कुलकर्णी, भास्कर ढोकणे, किसनराव जवरे, पप्पू माळवदे आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा काल वर्धापन दिन असल्याने माजी मंत्री प्राजक्त तनपुरे त्या वर्धापन दिनास अनुपस्थित असल्याची चर्चा होती. परंतु डॉ. तनपुरे कारखान्यावर या कार्यक्रमानिमित्त शरद पवार यांच्या समवेत माजी मंत्री प्राजक्त तनपुरे हे पवार यांच्याच गाडीत बसून आल्यामुळे सर्वांच्याच भुवया उंचावल्या होत्या.

# पावसाने ओढ दिल्याने चाराटंचाई, मेंढपाळ परतीच्या मार्गावर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** परिसरात गेल्या १० दिवसापासून पावसाने उघडीप दिल्यामुळे परिसरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न येत्या काही दिवसात गंभीर होण्याची शक्यता आहे तसेच सध्या जनावरांसाठी चाराटंचाई ही जाणवण्यास सुरुवात झाली आहे. पुणतांबा परिसरात अवकाळी पावसामुळे जे थोडेफार उगवत उगवलेले होते ते सध्या पिवळे पडून जळण्यास सुरुवात झाली आहे.

मान्सून पूर्व पावसामुळे परिसरात खरीप पिकासाठी शेतीच्या मशागती तातडीने करण्यात आल्या तसेच अवघे पाच टक्के शेतकरी वर्गाने सिंचनाची सोम व पावसाची शक्यता गृहीत धरून खरीप पिकांच्या पेरण्या केल्या त्यातील बरीच पिके उगवून आली आहेत. मात्र पावसामुळे ही पिके सुद्धा धोक्यात आली आहे.

येत्या आठ दिवसात पावसाने हजेरी लावली नाही तर ही पिकेही हातातून जाण्याची शक्यता आहे. परिसरात सरासरी अंदाजे साडेचार ते पाच इंच पावसाची नोंद झालेली आहे सध्या परिसरातील विहीरींच्या पातळीत वेगाने लक्षणीय घट होत आहे. चारा टंचाईमुळे परिसरात आलेल्या मेंढपाळांनी परतीची वाट धरलेली आहे. ज्यांच्या कडे जे थोडेफार पशुधन आहे त्यांना सुध्दा आता विकत चारा घेण्याची वेळ आली आहे.

# गुटखा विक्री करणाऱ्या दोघांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** अवैधरित्या सुगंधी तंबाखू-गुटखा विक्री करणाऱ्या दोन इसमाविरुद्ध नेवासा पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदरची कारवाई नेवासा पोलीस स्टेशनचे परिविक्षाधीन डीवायएसपी संतोष खाडे यांनी केली आहे.

नेवासा फाटा राजमुद्रा चौक येथील सुपर पान स्टॉलचे बाजूला दोन इसम सुगंधी तंबाखू गुटखा विक्री करत आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने पोलीस स्टाफ व पंचासमक्ष सदर ठिकाणी जाऊन छापा टाकला असता सदर टपरीच्या आडोशाला दानिश रियाज पठाण,सईद शौकत पटेल दोन्ही. रा.नेवासा खुर्द हे पिशवीमध्ये सुगंधी तंबाखू / गुटखा विकतांना मिळून आले सदर गुटका तंबाखू एकूण ३ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल मिळून आला.सदरचा मुद्देमाल पोलीस हवालदार राठोड यांनी जप्त करून वरील दोन इसमा विरुद्ध पोलीस ठाणे नेवासा येथे प्रचलित कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरची कामगिरी जिल्हा पोलीस अधिक्षक श्री सोमनाथ घाग्रे, अप्पर पोलीस अधिक्षक श्री वैभव कुलबर्गे,शेवगाव विभागाचे डीवायएसपी सुनील पाटील यांकच्या मार्गदर्शनाखाली परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक श्री संतोष खाडे यांनी केली. या कारवाईत पोलीस हवालदार संतोष राठोड, पोलीस कॉन्स्टेबल भारत बोडके, पोलीस कॉन्स्टेबल सलमान शेख,पोलीस कॉन्स्टेबल सुनील पालवे, पोलीस कॉन्स्टेबल दहिफळे हे पथक सहभागी झाले होते



# श्रीरामपूरकर ८० वारकऱ्यांसह सायकलवर निघाले पंढरीला



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपुर :** आषाढी वारी निमित्त २० जून ते २२ जून दरम्यान श्रीरामपूर ते श्रीक्षेत्र पंढरपूर सायकल वारीचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती श्रीरामपूर सायकलिंग क्लबचे प्रमुख डॉ. संकेत मुंदडा यांनी दिली.

श्रीरामपूर सायकलिंग क्लब च्या वतीने यावर्षी ही पंढरपूर सायकल वारीच्या नियोजना करण्यात आले आहे.सायकलिंग वारी यशस्वी पार करण्यासाठी त्याचाच भाग म्हणून सायकलिंगच्या सरावासाठी आतापर्यंत देवगड, सरलाबेट, नेवासा, संगमनेर, गणपती ताहराबाद, पुणतांबा, राहुरी कारखाना, लोणी, कोल्हार, गणेश खिंड, शिवनेरी किल्ला,पळशी ता.पारनेर,देवळाली प्रवरा, शिर्डी आदी ठिकाणच्या देवस्थानांना भेट दिली आहे. दर रविवारी साधारण १०० कि.मी. सायकल प्रवासाचा, सराव करण्यात येत आहे.

जागतिक पर्यावरण दिनाच्या नमित्ताने आज संगमनेर येथील श्री गणपती मंदिरात जाऊन क्लबच्या सदस्यांनी पंढरपूर सायकल प्रवास सुखकर होण्यासाठी श्री गणेशाला साकडे घालण्यात आले तसेच श्रीरामपुर ते पंढरपूर सायकल वारी शुक्रवारी दि. २० जून रोजी पहाटे ५ वाजता शहरातील श्रीराम मंदिर चौकातून या सायकल वारी सोहळ्याचे शहरातील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत प्रस्थान होणार आहे. या वर्षी सायकल वारी चे द्वितीय वर्ष असून जवळपास ८० पेक्षा जास्त जणांनी सहभाग नोंदवला आहे. त्यामध्ये ६-७ महिलांचाही सहभाग आहे. दि. २० जून रोजी संध्यकाळी करमळा येथे मुक्काम आहे, तर दि. २१ जून रोजी टेंभुर्णी मार्गे पंढरपूर येथे पोहचणार आहे. व पंढरपूर येथे दी. २२ जून ला होणाऱ्या राज्यस्तरीय सायकल रिंगण सोहळ्यात भाग घेणार आहे.

या वर्षी संपूर्ण महाराष्ट्रातून सायकलस्वार पंढरपुरात एकत्र होणार आहे या मध्ये राज्यातिल विविध ८७ सायकलिंग क्लबच्या सायकलपटूंचे संमेलन व वारकऱ्यांप्रमाणे सायकलस्वारांचा रिंगण सोहळा २२ जूनला होणार आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, जिल्हा परिषद व तुकडी अहिल्यानगर, पोट तुकडी व तालुका श्रीरामपुर पैकी श्रीरामपुर नगरपालिका हद्दीतील मंजुर ले-आऊट मधील बिगर शेती प्लॉट सर्व्हे नं. ११८/१ब पैकी सि.स.नं. २१५० पैकी मंजुर ले आऊट प्लॉट नं. ८ यांसी फायनल प्लॉट नं. ५५६ पैकी क्षेत्र २०७ चौ.मी यांसी चतुः सिमा रेकॉर्ड ऑफ राईटप्रमाणे सदर मिळकत ही सध्याचे खरेदीदार सौ. ज्योती सोमनाथ गाडेकर, रा. श्रीरामपुर यांनी श्री. किरण काशिनाथ परदेशी यांचेकडुन दि.५/११/२०१६ रोजी खरेदी केलेली आहे व श्री. किरण काशिनाथ परदेशी यांनी सदर मिळकत ही दि. २३/०७/२०१३ रोजी सौ. राखी श्रीनिवास बिहाणी यांचेकडुन खरेदी केलेली आहे. तसेच सौ. राखी श्रीनिवास बिहाणी यांनी सदर मिळकत श्री. अशोक फकिरचंद शाह यांचेकडुन दि. ११/०३/२००४ रोजी रजि. खरेदीखत नं. ६०७/२००४ अन्वये खरेदी केलेली असुन सदर खरेदीखतान्वये खरेदीदारांचे नावाचे रेकॉर्ड सिटी सर्व्हे व सात बारा उता-यास वेळोवेळी नोंद झालेली आहे. असे असताना आमचे अशिल नोटीस देणार सौ. ज्योती सोमनाथ गाडेकर यांना आयडीबीआय बँक शाखा श्रीरामपुर यांचेकडुन गृह कर्ज घेणे असल्याने त्याकरीता सदरील मिळकतीचे वेळोवेळी झालेले खरेदीखताचे ओरीजनल प्रत आवश्यक होती व आहे. परंतु प्रथम खरेदीदार सौ. राखी श्रीनिवास बिहाणी यांचे कडुन दि. ११/०३/२००४ रोजीचे रजि. खरेदीखत नं. ६०७/२००४ हे आम्ही घेतले होते व सदरील खरेदीखताची प्रत आमच्या ताब्यात होती. परंतु सदरील खरेदीखत हे घराचे सामान नविन ठिकाणी हालवित असताना सदरील खरेदीखत हे गहाळ झालेले असुन, शोधाशोध करुनही ते मिळुन आलेले नाही. तरी सदरील खरेदीखताबाबत कोणास काही सांगावयाचे असल्यास अथवा त्याबाबत कोणाचा आक्षेप असल्यास नोटीस प्रसिध्द झालेपासुन ८ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात खालील पत्त्यावर अथवा आयडीबीआय बँक शाखा श्रीरामपुर यांचेकडे आक्षेप कळवावा ही नोटीस दिली असे.

श्रीरामपुर
ता. ११/०६/२०२५
नोटीस देणार
सौ. ज्योती सोमनाथ गाडेकर

**ॲड.संदिप का.चोरमल**
वॉर्ड नं.१, श्रीरामपूर,
निवास-नवीन पाण्याच्या
टाकीजवळ, श्रीरामपूर

## पाहिजेत

### शिवाजीराव पवार कॉलेज ऑफ फार्मसी, पाचेगाव करिता खालील पदे भरणे आहेत

**Application for the post of B Pharm course**

| Sr No | Post | Qualification | Vacancy |
|---|---|---|---|
| 1 | **Principal** | M Pharm PhD | 01 |
| 2 | **Professor** | M Pharm PhD | 01 |
| 3 | **Associate Professor** | | |
| | Pharmaceutics | M Pharm PhD | 01 |
| | Pharmaceutical Chemistry | M Pharm PhD | 01 |
| | Pharmacology | M Pharm PhD | 01 |
| 4 | **Assistant Professor** | | |
| | Pharmaceutics | M Pharm | 05 |
| | Pharmaceutical Chemistry | M Pharm | 05 |
| | Pharmacology | M Pharm | 04 |
| | Pharmacognosy | M Pharm | 02 |
| | Pharmacy Practice | M Pharm | 02 |
| 5 | **Librarian** | B Lib/ M Lib | 01 |
| | | **Total:** | **24** |

**Application for the post of M Pharm course**

| Sr. No. | Post | Qualification | Vacancy |
|---|---|---|---|
| 1 | **Associate Professor** | | |
| | Pharmaceutics | M Pharm PhD | 01 |
| | Pharmaceutical Chemistry | M Pharm PhD | 01 |
| | Pharmacology | M Pharm PhD | 01 |
| | Pharmacognosy | M Pharm PhD | 01 |
| | Pharmaceutical Quality Assurance | M Pharm PhD | 01 |
| 2 | **Assistant Professor** | ( M Pharm with more than 5 year Experience) | |
| | Pharmaceutics | M Pharm | 01 |
| | Pharmaceutical Chemistry | M Pharm | 01 |
| | Pharmacology | M Pharm | 01 |
| | Pharmacognosy | M Pharm | 01 |
| | Pharmaceutical Quality Assurance | M Pharm | 01 |
| | | **Total:** | **10** |

इच्छुक उमेदवाराने आपला बायोडेटा, शैक्षणिक कागदपत्रे, अनुभव प्रमाणपत्रे, २ पासपोर्ट फोटो, आधार कार्ड, पॅन कार्ड या सर्व कागदपत्रांचे 01 झेरॉक्स प्रत खालील दिलेल्या कार्यालयाच्या पत्यावर दिनांक १३.0६.२०२५ पर्यन्त समक्ष अथवा पोस्टाने पाठवावे. तसेच मुलाखतीसाठी दि. १४.0६.२०२५ रोजी खालील पत्यावर उपस्थित राहावे.
संपर्कासाठी क्रमांक. ७६२०१५६३६६, ९४२२८०१४३१, ८६६८२९२३१८
संपर्कासाठी पत्ता- शिवा ट्रस्ट शैक्षणिक संकुल, पाचेगाव, ता.नेवासा, जि.अहिल्यानगर ४१३ ७२५

# अतिक्रमणग्रस्त कुटुंबांचा आक्रोश; इच्छा मरणाची मागितली परवानगी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** मौजे निपाणीवडगाव (ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) येथील प्रवरा डाव्या कालव्यालगत गेल्या ३०-४० वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या ८० ते ९० मागासवर्गीय, आदिवासी व अन्य वंचित कुटुंबांवर अतिक्रमण हटवण्याचा धोका निर्माण झाला आहे. यासंदर्भात संबंधित विभागाकडून सात दिवसांची अंतिम नोटीस देण्यात आल्याने या भागातील नागरिकांमध्ये भीती आणि उद्विग्नता वाढली आहे.



या पार्श्वभूमीवर स्थानिक रहिवासी भागचंद अभिमान नवगिरे यांनी देशाच्या राष्ट्रपती मा. द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे निवेदन पाठवले असून, जर अतिक्रमण नियमित करण्याचा निर्णय झाला नाही, तर इच्छा मरणाची परवानगी द्यावी, अशी मागणी त्यामध्ये करण्यात आली आहे.

नवगिरे यांनी पत्रात नमूद केले आहे की, संबंधित कुटुंबे अनेक दशकांपासून त्या ठिकाणी राहत असून, त्यांना ग्रामपंचायतीमार्फत वीज, पाणी, रस्ते आदी सर्व नागरी सुविधा मिळाल्या आहेत. शासनाचे सर्व कर व पट्टेही वेळेवर भरले जात आहेत. तसेच यापूर्वी दलित वस्ती सुधार योजनेतूनही विकासकामे झाली आहेत.तरीही अचानक अतिक्रमण काढण्याची प्रक्रिया राबविण्यात येत आहे आणि कोणतीही पुनर्वसन व्यवस्था न करता हे कुटुंबे बेघर होणार आहेत. हे संपूर्णतः अन्यायकारक असून अशा कृतीने लोकशाहीचे मूल्य धोक्यात येत असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.आमच्यावर होणाऱ्या अन्यायामुळे आम्ही मानसिकदृष्ट्या खचलेलो असून, शासनाने जर वेळेत योग्य तो निर्णय घेतला नाही, तर आमच्यासाठी जगणे अशक्य होईल, असे नवगिरे यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे.

# डॉ. दादासाहेब तनपुरे यांचे जिल्ह्याच्या विकासात योगदान : भाऊ नवले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** डॉ. दादासाहेब तनपुरे यांचे केवळ तालुक्याच्या नव्हे तर जिल्ह्याच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान राहिलेले आहे ,असे प्रतिपादन अकोला येथील जनलक्ष्मी पत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भाऊ पाटील नवले यांनी केले .

गुहा येथील प्रेरणा पतसंस्था व मल्टिस्टेट च्या वतीने संस्थेच्या मुख्य कार्यालयात डॉ. दादासाहेब तनपुरे यांच्या पुण्यतिथी निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश वाबळे समारंभाचे अध्यक्षस्थानी होते.प्रमुख भाषणात भाऊ पाटील नवले म्हणाले, डॉ. दादासाहेब तनपुरे यांनी राहुरी सहकारी साखर कारखाना उभा केला.



त्याचबरोबर जिल्ह्यातील अन्य साखर कारखान्यांच्या उभारणीतही त्यांनी मार्गदर्शन केले .मुळा प्रवरा वीज सहकारी संस्था स्थापन करून आशिया खंडातील पहिला प्रयोग यशस्वी केला .तसेच मुळा धरणाच्या निर्मितीतून राहुरीच नव्हे तर जिल्ह्यात जिरायती भागाला पाणी मिळाले .त्यामुळे शेती समृद्ध झाली. त्यांच्या विकासाच्या कामामुळे आजही त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे. तनपुरे सहकारी साखर कारखान्याशी संलग्न शिक्षण संस्था उभारल्या. त्यामुळे शिक्षणाची गंगा तालुक्यात खेड्यापाड्यात पोहोचली .यावेळी डॉ. दादासाहेब तनपुरे यांच्या प्रतिमेस उपस्थित मान्यवरांनी अभिवादन केले.जनलक्ष्मी पतसंस्था संचालक कैलास शेळके, राहुरी तालुका ट्रक ट्रान्सपोर्टचे मा.चेअरमन आप्पासाहेब कोहकडे, संचालक ज्ञानदेव हारदे व सभासद, कर्मचारी वृंद यावेळी उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, डि.अ.नगर सब डि.व तालुका राहाता पैकी लोणी बु. येथील गट नंबर ५२३/१८ पैकी बिनशेती प्लॉट जागा त्यातील प्लॉट नंबर ३० क्षेत्र ० हे.०२ आर, पैकी पुर्वेकडील क्षेत्र ० हे.०१ आर, आकार १२.७० पैसे यासी चतुःसिमा पुर्वेस बहिरट यांची मिळकत दक्षिणेस बंडू विखे यांची मिळकत, पश्चिमेस प्लॉट नं.३० पैकी उर्वरित ०१ आर क्षेत्र, उत्तरेस अंतर्गत १३ फुट रुंदीचा रस्ता येणेप्रमाणे चतुः सिमापुर्वक बिगर शेती प्लॉट जागा मिळकत व त्यातील संपुर्ण वागवहिवाटीचे हक्कासह ही मिळकत प्लॉटचे मालक जिजाबाई भाउसाहेब वाडगे रा.लोणी बु. ता. राहाता यांचे कब्जे वहिवाटीची व मालकी हक्काची आहे. सदर मिळकती संबंधी सौ. प्रियंका संदिप सुरासे यांचे बरोबर जमीन विकी संबंधी व्यवहार ठरले आहे व त्याप्रमाणे तसा विसार दिलेला आहे व लवकरच खरेदीखताचा व्यवहार करण्याचे ठरले आहे वर नमूद मिळकत ही निर्वेध, निष्कर्जी असून तीवर कोणताही दान, गहान, लिज, लिन, बक्षिस, अन्नवस्त्र पोटगी व वित्तीय संस्थेचा कर्ज बोजा नाही असा विश्वास व भरोसा आमचे अशिलांना दिलेला आहे. सबब सदरची नोटीस प्रसिध्द होताच ८ दिवसाचे आत वरील मिळकतीवर कुणाचाही कसलाही हक्क अधिकार बोजा असल्यास संबंधीतानी आमचे कार्यालयात लेखी स्वरुपात कळवावे लेखी हरकत न आल्यास मिळकत निर्वेध, निष्कर्जी असून तीचेवर कोणाचाही कोणताही बोजा नाही असे समजून आमचे अशिल कायम खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील मग कुणाचीही तक्रार ऐकूण घेतली जाणार नाही. सबब कुणाचीही फसगत होवू नये म्हणून सदरची जाहिर नोटीस प्रसिध्द केली असे.
दिनांक १२/०६/२०२५

आमचे अशिल

**ॲड. विखे नितीन पंडीतराव**
रा.लोणी सोनगावरोड, खंडोबा मंदीरपाठीमागे लोणी बु.,
ता. राहाता जि.अहमदनगर
(अशिल-सौ. प्रियंका संदिप सुरासे रा.मिरी ता. पाथर्डी तर्फे व करीता)

## राहुरी नगरपरिषद, राहुरी
## पाणीपुरवठा विभाग
## निविदा सूचना

जा.क्र.कावि १०/१८३/-/२०२५ दि.११/०६/२०२५

राहुरी नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडील करावयाच्या कामांसाठी द्वि लिफाफा पद्धतीने योग्य त्या वर्गवारीत नोंदणीकृत ठेकेदार/पुरवठादार/ संस्था यांचेकडून निविदा/दरपत्रक मागविणेत येत आहे. नगरपरिषदेच्या सूचना फलकावर पाहण्यास उपलब्ध आहेत. निविदेसोबत वेळेवेळी करण्यात येणारे बदल (शुद्धिपत्रक) अथवा मुदतवाढ सूचना नगरपरिषदेच्या सूचना फलकावर पाहण्यास उपलब्ध राहतील. नमूद कामांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | बयाणा रक्कम (रु.) | निविदा फॉर्म फी (रु.) |
|---|---|---|---|
| १ | राहुरी नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागासाठी दैनंदिन दुरुस्तीकरिता डीआयएमएस साहित्य तसेच Sluice valve पुरविणे | १०००/- | ५००/- |
| २. | राहुरी नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागासाठी विविध जलकुंभावर मीटर पट्टी बसविणे | १०००/- | ५००/- |
| ३. | राहुरी नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागासाठी जलशुद्धीकरण केंद्र येथील पंप हाऊसमधील मीटरचे कॅलिब्रेशन करणे | १०००/- | ५००/- |

**निविदा पद्धतीचा तपशील**

| | |
|---|---|
| निविदा विक्री व सादर करणे | दि.१२/०६/२०२५ सकाळी ११.०० ते दि.२०/०६/२०२५ सायं. ५.०० पर्यंत |
| निविदा सादर करण्याची अंतिम मुदत | दि.२०/०६/२०२५ सायं. ५.०० पर्यंत |
| निविदा उघडणे (शक्य झाल्यास) | दि.२३/०६/२०२५ सकाळी ११.०० नंतर |

**स्वाक्षरीत/-**
**(ज्ञानेश्वर ठोंबरे)**
**मुख्याधिकारी, राहुरी नगरपरिषद, राहुरी**

पान १ वरुन

## एआय शेतीत क्रांती घडवणार : शरद पवार

खात्याचा मंत्री म्हणून मी १० वर्ष काम केलं. महाराष्ट्रामध्ये सुद्धा महाराष्ट्राचा शेती मंत्री म्हणून काही वर्ष काम केलं. सबंध देशामध्ये शेतीच्या क्षेत्रात जे काही बदल झाले, संशोधनं झाली त्याच्याशी सुसंवाद ठेवण्याचं काम मी सातत्याने त्या काळात केलं होतं. पूर्वी संगणक साक्षरतेबद्दल जशी जागृती केली तसेच काम आता कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बाबतीत हाती घेतले आहे.आर्टिफिशियल इंटेलिजन्स या तंत्रज्ञानामार्फत अनेक क्षेत्रांमध्ये चमत्कार करता येतील. शेतीच्या क्षेत्रात करता येतील, उद्योगाच्या क्षेत्रात करता येतील, आरोग्याच्या क्षेत्रामध्ये मेडिसिन्स या भागामध्ये करता येईल आणि हे काम आपण करायचंय. कालच आम्ही लोकांनी पुण्याला 'वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट' येथे एक सभा बोलावली होती. महाराष्ट्रातील १५० कारखाने सहकारी असो किंवा खासगी असो. त्यांचे चेअरमन, कृषी अधिकारी यांची बैठक घेतली. महाराष्ट्राचे तीन मंत्री त्या ठिकाणी निमंत्रित केले शेतीमंत्री, अर्थमंत्री यांना त्याच्यात सहभागी केलं. महाराष्ट्रामध्ये एक मोठा कार्यक्रम घेण्याचा आम्ही निर्णय घेतलेला आहे.सुरुवातीला महाराष्ट्रमध्ये आमच्याकडे नोंद झालेले १० हजार शेतकरी आहेत. त्यांच्या शेतीमध्ये, पिकांमध्ये आम्ही कृत्रिम बुद्धिमत्तेचा सहभाग करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याचे प्रयोग आम्ही गेले ३ वर्ष करत होतो आणि त्याच्यात आम्हाला यश आलं. आम्ही महाराष्ट्राच्या अनेक कारखान्यांमध्ये संस्थांना हे कळवलं की, आम्ही एआयचा वापर करून शेती करतो ती बघायला या! त्याचं पीक बघा आणि आज त्या ठिकाणी उभं पीक तुम्हाला बारामतीला बघायला मिळेल. काय फरक आहे? आज आपण ऊस लावतो. सुरुचा ऊस लावतो, आडसालीचा लावतो. एक तर १२ महिन्यांचं किंवा १० महिन्यांचं पीक किंवा एक पीक १६ महिन्यांचं, १८ महिन्यांचं काढता येतं. आम्ही या पिकांचा कालावधी एआय मार्फत ९ च्या आसपास आणत आहोत. ९ महिन्यामध्ये ते पीक झालं पाहिजे. तुम्ही जाऊन ते पिक बघू शकाल की, आज तुमच्या दारातला ऊस त्याला कांडी किती असतील? त्याला कांडी असतील ९ ते १२. पण एआयच्या मदतीने ऊस लावला त्याची कांडी २० ते २२ इतकी आहे. त्याची उंची ही जवळपास १४ फुटांच्या वर आहे. त्यामध्ये सुक्रोजचं प्रमाण हि ३०% नी अधिक आहे.

## मराठा एसईबीसी आरक्षणाला स्थगिती नाही

मराठा आरक्षणाच्या सुनावणीबाबत बोलताना महाराष्ट्राचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षणाला आधीच अंतरिम दिलासा आहे. मग पून्हा सुनाणी घेण्यात अर्थ नाही, आता अंतिम सुनावणीला सुरूवात करायला हवी. त्यावर न्यायमूर्ती घुगे यांनी म्हटले की, मराठा आरक्षणाच्या विरोधात अनेक याचिका आहेत.त्यामुळे आपण सर्वांनी एकत्र बसून विरोधकांची बाजून नेमकं कोणं मांडणार हे ठरवा. विरोधी वकिल प्रदीप संचेती म्हणाले की, प्रत्येक याचिकाकर्त्याने विविध विषय वाटून घेतले आहे. प्रत्येकाला आपलं मत मांडायचं आहे. त्यामुळे प्रत्येकाला आपलं मत मांडण्याचा अधिकार द्यायला हवा. त्यावर न्यायमूर्ती घुगे यांनी १८ व १९ जुलै रोजी युक्तिवाद करण्यासाठी सुनावणी घेण्याचे जाहीर केले. तोपर्यंत मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना एसईबीसी प्रवर्गातून प्रवेश घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## हजारो चाहत्यांच्या उपस्थितीत साहेबराव घाडगे पाटील यांच्यावर अंत्यसंस्कार

त्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत काम केले,त्यांच्या अकस्मात जाण्याने त्रिमूर्तीचा लढवय्या योद्धा हरपला असल्याची भावना व्यक्त केली. यावेळी झालेल्या श्रद्धांजली सभेचे सूत्रसंचालन त्रिमूर्ती संकुलाचे प्रा.अशोकराव गाडे सर यांनी केले संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानाने सामुदायिक श्रद्धांजली अर्पित करण्यात आली.यावेळी झालेल्या अंत्यसंस्कार प्रसंगी घाडगे पाटील परिवारातील सर्व सदस्य,सर्वपक्षीय नेते पदाधिकारी,डाॅक्टर,वकील,इंजिनियर,पत्रकार,विद्यार्थी,एनसीसी कॅडेटचे सैनिक,विविध संस्था,विद्यालयाचे शिक्षक, शेतकरी, शेतमजूर आजी माजी अधिकारी यांच्यासह हजारोंच्या संख्येने बहुजन समाज उपस्थित होता.

## ...तर बच्चू कडूंच्या आंदोलनाची ठिणगी महाराष्ट्रभर पडेल

केली. तसेच त्यांच्या या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. सरकारने बच्चू भाऊच्या आंदोलनाची दखल घेतली पाहिजे. हे जाड कातड्याचे गेंड्याचे सरकार आहे. त्याला काही फरक पडत नाही. या आंदोलनाची ठिणगी महाराष्ट्र भर पडली पाहिजे, असे मत व्यक्त करून राज्यभर रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा खासदार लंके यांनी दिला.

## पालिका,पंचायतींना प्रभाग रचनेचे आदेश

आदेश देण्यात आले आहेत. त्यामध्ये प्रभागांची रचना कशी करायची आणि लोकसंख्येचे काय निकष लावायचे याचे स्पष्ट निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत.महाराष्ट्रातील महापालिकांची प्रभाग रचना करण्याबाबतचे आदेश जारी करण्यात आल्यानंतर मुंबईमध्ये जुन्याच प्रभागानुसार निवडणुका होणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. त्यानुसार मुंबई महानगरपालिकेमध्ये २२७ एकसदस्यीय प्रभाग रचना करण्यात येणार आहे. तर पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, नवीमुंबई, पिंपरी चिंचवड, छत्रपती संभाजीनगर, यासह इतर सर्व महापालिकांमध्ये चार सदस्यांचे प्रभाग असणार आहेत.मुंबईमध्ये आधी २२७ प्रभाग होते. महाविकास आघाडी सत्तेत आल्यानंतर त्यामध्ये वाढ होऊन २३६ प्रभाग करण्यात आले. पुन्हा महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर २२७ प्रभाग करण्यात आले. त्याला आव्हान सर्वोच्च न्यायालयात देण्यात आलं होतं. पण ती याचिका फेटाळण्यात आली. त्यामुळे मुंबईमध्ये २२७ प्रभाग असणार आहेत.

# शेतकऱ्यांकडून 'क्या हुआ तेरा वादा' आंदोलन राज्यभर




**वैजापूर :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून निवडणुकीच्या काळात सरकारकडून देण्यात आलेल्या शेतकरी कर्जमाफी व लाडक्या २१०० रुपये या आश्वासनांची पूर्तता न केल्याने सरकारला आठवण देण्यासाठी सरकार क्या हुआ तेरा वादा हे आंदोलन राज्यभरात पुकारण्यात आले आहे. विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी दिलेल्या निर्देशानुसार शिवसेना ठाकरे कडून बुधवार रोजी दुपारी बारा वाजेच्या सुमारास डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरातून तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. दरम्यान शिवसैनिकांनी सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी केली सरकार क्या हुआ तेरा वादा... अशा घोषणा देत शेतकऱ्यांची कर्जमाफी लाडक्या बहिणींचे २१०० रुपये कधी देणार असा प्रश्नप्रसंगी शिवसेनिकांनी उपस्थित केला यावेळी तहसीलदार यांना निवेदन देखील देण्यात आले.

यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख सचिन वाणी,विधानसभा संघटक मनाजी मिसाळ,शहरप्रमुख प्रकाश चव्हाण, तालुकासंघटक मनोज गायके,युवासेना जिल्हाप्रमुख विठ्ठल डमाळे, उपजिल्हाप्रमुख अनिल न्हावले, उपजिल्हाप्रमुख अक्षय साठे,उपतालुकाप्रमुख अँड रमेश सावंत,नंदकिशोर जाधव,कडुतात्या सोनवणे,बाळासाहेब बडक, अण्णा पवार, राहुल साळुंखे,संकेत वाणी,उपशहरप्रमुख शिवाजी जाधव,रवींद्र पगारे,मनोज त्रिभुवन,शौकत शाह,रवींद्र हौसरे,विलास धने,उज्वल कदम,राजू नवले,चंद्रभान हजारे,भगवान शिंदे,दिगंबर वाघचौरे, सिराज शेख,गब्बू पठाण,काकासाहेब मिसाळ ,बाजीराव पवार,सुनील ठोंबरे,बापू ठोंबरे,गणेश शिंदे,गणेश पवार, गोकुळ वाघ,लक्ष्मण सोळसे,अशोक दाजीबा पगारे,बाळासाहेब मिसाळ, उबेद इनामदार, अमजद शेख, कपिल पगारे, नामदेव त्रिभुवन, सोमनाथ त्रिभुवन, सुरेश आलुले, शेख अकील शेख गफार, सतीश बागुल, शेख इरफान, आवेज खान आदीसह शिवसैनिक व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





## अहिल्यानगर व संभाजीनगर जिल्ह्यांना जोडणाऱ्या बंधाऱ्याच्या मजबुतीचे काम सुरू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान :** अहिल्यानगर व छत्रपती संभाजीनगर या दोन्ही जिल्ह्यांना जोडणाऱ्या कोल्हापूर टाईप बंधाऱ्याच्या मजबूतीकरणाचे काम जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रयत्नातून सुरू झाले असून योगीराज सदगुरू गंगागिरीजी महाराज यांच्या १७८ व्या अखंड हरीनाम सप्ताहानिमित्ताने येणाऱ्या लाखो भाविकांची येण्याजाण्याची गैरसोय होऊ नये या अनूषंगाने हे काम करण्यात येत आहे.

वैजापूर तालुक्यातील शनिदेवगाव येथे योगीराज सदगुरू गंगागिरीजी महाराज यांचा १७८ वा अखंड हरीनाम सप्ताह संपन्न होणार आहे. या सप्ताहास गोदापट्ट्यासह संपूर्ण महारराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने भाविक भक्त या सप्ताहास हजेरी लावतात. अहिल्यानगर जिल्ह्यातील भाविक भक्तांना सप्ताहस्थळी जाण्यासाठी गोदावरी नदीवर असणाऱ्या कोल्हापूर टाईप बंधाऱ्याचा वापर करावा लागणार असून सदर बंधाऱ्याची अतिशय दयनीय अवस्था झालेली आहे. सदर बंधाऱ्यास कठडे नसल्याने ठिकठिकाणी या बंधाऱ्यास मोठमोठे खड्डे पडले आहे. यामुळे अनेकदा दुचाकीस्वार या बंधाऱ्यावरून नदीपात्रात पडण्याच्या घटना घडल्या आहे. याच अनूषंगाने नूकतेच राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शनिदेवगाव येथे होणाऱ्या अखंड हरीनाम सप्ताहाच्या सप्ताहस्थळाची पाहणी केली. यावेळी त्यांनी वैजापूर तालुक्याचे आ.प्रा.रमेश बोरनारे यांचेसह जलसंपदा अधिकाऱ्यासहीत या कठडे नसलेल्या बंधाऱ्याची पाहणी करून त्वरीत काम करण्याच्या सूचना दिल्या. त्यानूसार बंधाऱ्याच्या कामास लागलीच सुरूवात करण्यात आली आहे. मजबूत कॉंक्रीटीकरण करताने बाजूचे कठडे कॉंक्रीटीकरणात एकरूप झाले पाहीजे असा आदेश उपस्थित अभियंत्यांना दिला आहे.

या बंधाऱ्याच्या कामास सुरूवात केल्याने शनिदेवगाव सप्तक्रोशी सप्ताह कमेटीचे अध्यक्ष महंत रामगिरी महाराज, उपाध्यक्ष महंत हरिशरणगिरी महाराज, सप्तक्रोशी सप्ताह कमेटी, कार्यकर्ते, भाविक, ग्रामस्थ आदींनी जलसंपदामंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले आहे.

**तब्बल पंधरा वर्षापासून रखडलेल्या सुमारे २८२ कोटी रूपये अंदाजपत्रकीय तरतूद असणाऱ्या गोदावरी नदीवरील शनिदेवगाव उच्च पातळी बंधाऱ्याचे भूमीपुजन गंगागिरीजी महाराज यांच्या १७८ व्या सप्ताहात करण्यात यावे अशी अपेक्षा अहिल्या नगर व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गोदापट्यातील तालुक्यातील शेतकरी, ग्रामस्थांकडून जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांचेकडे केली जात आहे.**

## शिवसेनेच्या आंदोलनांतर्गत गंगापूरमध्ये भव्य ट्रॅक्टर मोर्चा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर :** राज्य शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणांवर आणि निवडणुकीपूर्वी दिलेल्या परंतु अद्याप अपूर्ण राहिलेल्या आश्वासनांवर सवाल उपस्थित करत शिवसेना उबाठा गटाच्या वतीने बुधवारी गंगापूर येथे 'क्या हुआ तेरा वादा' या आंदोलनाच्या अंतर्गत गंगापूर तहसील कार्यालय येथे भव्य ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात आला.

गंगापूर शहरतील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून मोर्चाची सुरुवात झाली. शेतकऱ्यांनी आपल्या ट्रॅक्टरवर आंदोलनाचे फलक लावले होते. क्या हुआ तेरा वादा, शेतकऱ्यांचा सातबारा कोरा झालाच पाहिजे, शेतकऱ्यांचं देणं फेडा, अशा घोषण देण्यात आल्या . रस्त्याच्या दुतर्फा नागरिकांनी या मोर्च्याचे स्वागत केले.

मोर्चाचा समारोप तहसील कार्यालयासमोर झाला. यावेळी तहसीलदार नवनाथ वगवाड यांना शेतकऱ्यांच्या



मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या निवेदनात प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची अंमलबजावणी, पीकविमा योजनांतील अडचणी, अपुऱ्या वीजपुरवठ्याची समस्या, सिंचनाच्या सोयी आणि कृषी धोरणांबाबत सरकारने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी जोरदार मागणी करण्यात आली.

## निधन वार्ता..

### लक्ष्मीबाई म्हसे



**राहुरी :** राहुरी तालुक्यातील कोंढवड येथील लक्ष्मीबाई सूर्यभान म्हसे (वय ९०) यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्या जालिंदर म्हसे, नर्सिंग होमचे माजी अध्यक्ष उत्तमराव म्हसे व शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आण्णासाहेब म्हसे यांच्या मातोश्री तर दत्ता म्हसे, शिवसेनेचे राहुरी तालुकाप्रमुख सचीन म्हसे व सुदर्शन म्हसे यांच्या आजी होत.

### सखाहरी दवंगे



**कोपरगाव :** तालुक्यातील मळेगांवथडी येथील प्रगतशिल शेतकरी सखाहरी किसनराव दवंगे (८८) यांचे निधन झाले. त्यांच्या मागे एक मुलगा, एक मुलगी, सुन, नातवंडे असा परिवार आहे. कोपरगांव तालुका मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष प्रा. साहेबराव दवंगे यांचे ते वडील होते. त्यांच्या पार्थीवावर कोपरगांव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यांत आले.

गंगापूरच्या आमदारांचा स्तुत्य उपक्रम

## शिक्षकांना स्वखर्चाने 'फोनिक इन मराठी' प्रशिक्षण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही दर्जेदार शिक्षण मिळावे आणि इंग्रजीसारखी अवघड वाटणारी भाषा सुलभ व्हावी, यासाठी गंगापूरचे आमदार प्रशांत बंब यांनी एक स्तुत्य पुढाकार घेतला आहे. त्यांनी स्वखर्चातून आपल्या मतदारसंघातील जिल्हा परिषदेच्या ४५० हून अधिक शिक्षकांना फोनिक इन मराठी या अभिनव शिक्षण पद्धतीचे प्रशिक्षण दिले आहे.

फोनिक इन मराठी ही पद्धत अकोला जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिखलगाव येथील शिक्षक मनोजकुमार भगत यांनी संशोधित केली असून, ही पद्धत विद्यार्थ्यांना मातृभाषेतून इंग्रजी वाचन शिकवण्याची एक क्रांतिकारी प्रणाली आहे. इंग्रजी मुळाक्षरांना कृती आणि विशेष सांकेतिक आवाज दिल्यामुळे विद्यार्थी त्या आवाजाच्या आधारे सहजतेने वाचन करू शकतात. त्यामुळे इंग्रजी वाचन ही प्रक्रिया मुलांसाठी खेळासारखी होते.

आमदार बंब यांनी या प्रशिक्षणाचा उद्देश सांगताना स्पष्ट केले की, गावागावातल्या शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलांनाही दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे. इंग्रजी ही भाषा त्यांच्या आत्मविश्वासासाठी आणि भविष्यातील संधींसाठी महत्त्वाची आहे. 'फोनिक इन मराठी' पद्धतीमुळे ही भाषा शिकणं खूप सोपं होतं. त्यामुळेच मी शिक्षकांना हे प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला.

या उपक्रमामुळे गंगापूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील हजारो विद्यार्थ्यांना इंग्रजी शिकणं अधिक सुलभ होणार आहे. ग्रामीण भागात शिक्षणात नवचैतन्य निर्माण करणाऱ्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.शिक्षण क्षेत्रातील ही क्रांती निश्चितच इतर जिल्ह्यांसाठीही प्रेरणादायक ठरेल.


## नशिबाची परिक्षा

गुरुवार दि. १२ जून २०२५

**मिलनम डे**
उदय-अस्त — सिंगल ५-१-९ मजबुत

१७९ / २७८ / ३७७ — ७-० — १९० / २८० / ४६०
जोड: ७३-५०-१९-४२-०८

**कल्याण**
उदय-अस्त — सिंगल ९-४-५ मजबुत

१२९ / ४८० / २२८ — २-३ — १२० / ६७० / ३००
जोड: २०-६३-१४-९८-३७

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त — सिंगल ४-७-९ मजबुत

३४६ / ६७० / ३३७ — ३-९ — १२६ / १८० / ९००
जोड: ३१-०९-४५-८६-९२

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| 31/03/2025 to 05/04/2025 | 128 12 336 | 460 04 356 | 880 66 367 | 178 61 560 | 169 62 138 | 235 02 679 |
| 07/04/2025 to 12/04/2025 | 180 91 588 | 247 31 119 | 789 44 239 | 277 63 670 | 345 23 238 | 469 93 689 |
| 14/04/2025 to 19/04/2025 | 257 40 389 | 270 96 268 | 169 62 570 | 169 62 570 | 489 15 168 | 359 76 240 |
| 21/04/2025 to 26/04/2025 | 247 35 500 | 469 91 335 | 149 44 248 | 299 08 459 | 490 34 789 | 257 46 268 |
| 05/05/2025 to 10/05/2025 | 135 98 116 | 470 04 112 | 136 03 158 | 123 62 138 | 158 47 269 | 257 45 258 |
| 12/05/2025 to 17/05/2025 | 233 82 336 | 569 00 389 | 278 74 590 | 288 83 157 | 389 08 468 | 690 57 160 |
| 19/05/2025 to 24/05/2025 | 900 99 360 | 470 04 112 | 123 62 138 | 257 41 155 | 135 98 116 | 789 44 239 |
| 26/05/2025 to 31/05/2025 | 148 30 145 | 259 61 128 | 470 16 457 | 125 81 678 | 790 65 690 | 247 38 170 |
| 02/06/2025 to 07/06/2025 | 229 34 455 | 899 62 138 | 778 21 470 | 244 02 336 | 255 23 247 | 110 24 248 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *


# पत्नी पीडित पुरुषांनाही संरक्षण मिळावे!



औरंगाबादेतील वाळूंज भागातील पत्नीपीडित पुरुषांच्या आश्रमात काही पत्नीपीडित पुरुषांनी वटपौर्णिमेच्या आदल्या दिवशी पिंपळपूजन करून पिंपळपौर्णिमा साजरी केली. हे पुरुष दरवर्षी पिंपळपौर्णिमा साजरी करतात. आमच्या बायकांनी आम्हाला इतका त्रास दिला आहे की आम्ही त्यांच्यासोबत सात जन्मच काय सात सेकंदही संसार करू शकत नाही म्हणूनच आम्हाला अशा प्रकारच्या बायका देण्यापेक्षा कायमस्वरूपी मुंजा ठेव अशी प्रार्थना ते यम आणि मुंजाला करतात. हा प्रकार काहीसा विचित्र वाटत असला तरी खरा आहे. पुरुषही कौटुंबिक हिंसाचाराचे बळी ठरतात यावर अजूनही अनेकांचा विश्वास बसत नाही याला कारण आहे आपली पुरुष प्रधान संस्कृती. पुरुषच महिलांवर अत्याचार करतो, त्यांचा मानसिक छळ करतो हेच आजवर आपण पाहत आलो आहोत पण आता काळ बदलला आहे. पुरुषही महिलांच्या अत्याचाराला बळी पडत आहे. आज कितीतरी पुरुष महिलांचा मानसिक अत्याचार सहन करत आहेत. पत्नी आपल्यावर अत्याचार करते आपला मानसिक छळ करते हे जर समाजात माहीत झाले तर आपलीच नाचक्की होईल या भीतीने अनेक पुरुष तो अत्याचार मुकाट्याने सहन करतात. ज्यांना हा अत्याचार सहन होत नाही ते आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात.

काही महिन्यांपूर्वी बंगळुरू मध्ये एका कंपनीत अभियंता असलेल्या ३४ वर्षीय अतुल सुभाष या तरुणाने पत्नीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी या तरुणाने आपल्यावरील आपबिती ९० मिनिटांचा व्हिडिओ काढून तसेच ४० पाणी सुसाईड नोट लिहून सांगितली. या तरुणाला त्याच्या पत्नी आणि सासरच्यांनी हुंडाबळीच्या चुकीच्या आरोपाखाली तरुंगामध्ये पाठवले होते. काहीही चूक नसताना या तरुणाला तुरुंगात जावे लागले. न्यायालयात तो स्वतःचं निर्दोषत्व सिद्ध करू शकला नाही. समाजात त्याची बदनामी झाली त्यामुळे आलेल्या नैराश्यातून त्याने आत्महत्या केली. अर्थात अशी आत्महत्या करणारा अतुल सुभाष हा पहिला तरुण नाही याआधीही अनेक तरुणांनी पत्नीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्या आहेत. आताही काही दिवसांपूर्वी पुणे जिल्ह्यातील उरुळी येथे एका तरुणाने याच कारणाने आत्महत्या केल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचनात आली. महिलेचा पती व त्याच्या कुटुंबियांकडून होणारा छळ रोखण्यासाठी ४९८ ( अ ) हा कायदा करण्यात आला. महिलांना संरक्षण देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या या कायद्याचा अलीकडे मोठ्या प्रमाणात दुरुपयोग होऊ लागला आहे. या माध्यमातून पती आणि सासरच्या लोकांविरुद्ध वैयक्तिक सुड उगवला जात आहे. महिलांनी त्यांच्या संरक्षणासाठी केलेल्या कायद्याचा अशाप्रकारे दुरुपयोग करू नये अशी टिप्पणी माननीय सर्वोच्च न्यायालयाने देखील केली आहे. तरीही या कायद्याचा दुरुपयोग कमी होत नाही. पत्नीने पती विरुद्ध तक्रार दिली तर त्याची तातडीने दखल घेतली जाते. पत्नीवर अन्याय करणाऱ्या पतीला तात्काळ अटक केली जाते पण पतीला पत्नी विरुद्ध कारवाई करायची असेल, तर आपल्या देशात कौटुंबिक हिंसाचार अधिनियमना सारखा कायदा उपलब्ध नाही. सध्या असलेला कौटुंबिक अधिनियम संरक्षण कायदा पुरुषांना संरक्षण देत नाही. महिलांप्रमाणेच पत्नी पीडित पुरुषांनाही संरक्षणाचा अधिकार मिळावा यासाठी सरकारने कौटुंबिक हिंसाचार अधिनियम कायद्यात दुरुस्ती करून पत्नी पीडित पुरुषांना संरक्षण द्यावे.

– श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

द • ख • ल

## राहुरी विद्यापीठात गरुड फाउंडेशनच्या वतीने पुरस्कार वितरण संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** राहुरी येथील विद्यापीठाच्या प्रांगणात गरुड फाउंडेशनच्या वतीने भव्य पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यात समाजाच्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रहार दिव्यांग संघटना श्रीगोंद्याचे राजेंद्र यांना 'राष्ट्रीय समाज भूषण पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. समाजातील सातत्यपूर्ण व उल्लेखनीय कार्याची दखल घेत गरुड फाउंडेशनच्या वतीने त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. कार्यक्रमाला खासदार निलेश लंके, माजी मंत्री प्राजक्ता दादा तनपुरे, डी. वाय. एस. पी. भांड , गरुड फाउंडेशनचे अध्यक्ष, पाध्यक्ष व इतर मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. कार्यक्रमात डॉ. सोमनाथ देवकाते यांना देखील त्यांच्या समाजसेवा, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातील मोलाच्या योगदानाबद्दल विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पुरस्कार स्विकारल्यानंतर मान्यवरांनी आपल्या मनोगतातून समाजासाठी सतत कार्यरत राहण्याची ग्वाही दिली. हा संपूर्ण सोहळा अत्यंत शिस्तबद्ध व उत्साही वातावरणात पार पडला.




## काष्टी गावात कृषीदुतांनी रांगोळीतून साकारला गावाचा नकाशा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**घारगाव :** येथील श्री दत्तकृपा शैक्षणिक ग्रामविकास शिक्षण संस्थेच्या कृषी महाविद्यालयातील कृषीदूतांनी काष्टी येथे अनोखा उपक्रम राबवत गावाचा नकाशा रांगोळीच्या माध्यमातून साकारला. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत ग्रामीण जागरूकता कृषी कार्यानुभव व औद्योगिक जोड प्रकल्प २०२५-२६अंतर्गत हा उपक्रम पार पडला. या उपक्रमात कृषीदूतांनी ग्रामपंचायत कार्यालयात गावाचे सर्वसामान्य नकाशे यात जलकुंभ, सरकारी कार्यालयांचे स्थान, साक्षरता तक्ता, वार्षिक पीक तक्ता, उत्पादन तक्ता, मातीचे प्रमाण तक्ता, सामाजिक नकाशा, रस्त्याचा नकाशा, रहदारीचा नकाशा यांचा समावेश होता. गावाच्या विविध बाबींचे चित्रण करणाऱ्या या रांगोळ्यांना ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनीही या अनोख्या उपक्रमाचे कौतुक केले. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एच. कार्यक्रम समन्वयक प्रा. जे. एस. राठोड आणि कार्यक्रम अधिकारी प्रा. के. के. पाठक यांचे मार्गदर्शन लाभले. कृषीदूत स्वामी राजेश्वर, गिरगावकर ओंकार, घोडेचोर यश, भालेराव ऋषिकेश, दौंडकर ओंकार, कुरुंद चैतन्य, बोरसे मनोज यांनी या उपक्रमात महत्त्वाची भूमिका बजावली. यावेळी काष्टी येथील ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे ग्रामस्थांमध्ये कृषी, जलसंधारण व सामाजिक विकासाविषयी नवीन जागृती निर्माण झाली असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.




## संघर्ष जीवनाचा''कथासंग्रहाचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते चोंडीत प्रकाशन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव -** श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी (गणेशा) येथील प्रा.राम सोनवणे लिखीत संघर्ष जीवनाचा या कथासंग्रहाचे प्रकाशन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सभापती प्रा.राम शिंदे हस्ते अहिल्यादेवी होळकर ३०० व्या जंयती निमित्त जामखेड तालुक्यातील चौंडी येथे अहिल्यादेवी यांना जन्म गावी करण्यात आले.प्रा.सोनवणे यांनी अतिशय खडतर परिस्थितीतून शिक्षण घेवून विनाअनुदानित तत्वावर ज्युनिअर कॉलेजवर ज्ञानदानाचे पवित्र असे कार्य केले असून २० टक्के अनुदान मिळले.जे अनुदान मिळाले ते महायुतीमुळेच म्हणून मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री सभापती प्रा.राम शिंदे यांच्या कथासंग्रहाचे प्रकाशन व्हावे अशी प्रा.सोनवणे यांची प्रबळ इच्छा होती ती अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मगावी चौंडी येथे प्रकाशन झाल्याने ते आनंददायी झाले आहेत. प्रा. सोनवणे यांच्या जीवनात आलेले जे वेगवेगळे अनुभव आहेत ते यांनी कथेच्या रुपात मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. विना पगारी जीवन कसं असते त्या शिक्षकांना किती समस्यांना तोंड लागते याचे देखील विवेचन प्रा.सोनवणे यांनी मांडले आहे.हे प्रकाशन घडवून आणण्यासाठी बाळासाहेब ठाकरे शिवसेना शिंदे गटाचे श्रीगोंदा तालुका अध्यक्ष नंदकुमार ताडे, भारतीय जनता पार्टीचे युवा नेते प्रा.विजय शेलार , ह्रदय घोडके यांचे बहुमोल योगदान लाभले.



# 'श्रीगोंदयात महाऑनलाईन'मुळे दाखल्यांचा महागोंधळ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :-** श्रीगोंदयात 'महाऑनलाईन' पोर्टलच्या सर्व्हरमधील तांत्रिक बिघाडामुळे दाखले मिळवण्याची प्रक्रिया एक डोकेदुखी ठरली असून, पालकांना तलाठी कार्यालयापासून ते सेतू केंद्रांपर्यंत हेलपाटे मारावे लागत आहेत.शाळा-महाविद्यालयांची प्रवेश प्रक्रिया ऐन भरात असताना, आवश्यक विविध दाखल्यांसाठी पालक आणि विद्यार्थ्यांना प्रचंड मनस्ताप करावा लागत आहे. जून महिना म्हटलं कि शाळा महाविद्यालय सुरु होण्याचा महिना त्यासाठी पालकांची होणारी धावपळ हे अनेकदा सर्वानी पहिले आहे. शाळेसाठी नॅशनलिटी, डोमासाईल तसेच नॉन क्रमिलीयर अश्या अनेक दाखल्याची महाविद्यालयांत प्रवेशासाठी गरज पडते मात्र सेतू कार्यालयाचे सर्व्हर अनेकदा बंद असल्यामुळे पालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. सर्व्हर बंद आणि रात्री उशिरा सुरू होत असल्याने, सेतू कार्यालयातील कर्मचाऱ्यांवरही अतिरिक्त कामाचा बोजा पडला असून, तालुक्यात 'महाऑनलाईन'मुळे दाखल्यांचा अक्षरशः 'महागोंधळ' उडाल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे.त्यामुळे यावर तात्काळ उपायोजना करवून विद्यार्थानाचे नुकसान होऊ नये यासाठी सरकारने हि सुविधा सुरळीत करून देण्याची मागणी जोर धरताना दिसत आहे .पालक-विद्यार्थ्यांचे हाल, वेळेचा दाखले मिळवण्यासाठी पालक आणि विद्यार्थ्यांना अनेकांना आपला रोजचा रोजगार बुडवून यासाठी वेळ द्यावा लागतो. अनेक दिवस चकरा मारूनही दाखले वेळेत मिळत नसल्याने पालकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. सेतू कार्यालयांमधील प्रचंड गर्दी आणि त्यामुळे होणारी गैरसोय नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. महाऑनलाईन प्रणालीतील हा गोंधळ तातडीने दूर करून सर्व्हरची क्षमता वाढवावी, जोरदार मागणी पालक आणि विद्यार्थ्यांकडून होत आहे. जोपर्यंत ही तांत्रिक समस्या पूर्णपणे सुटत नाही, तोपर्यंत प्रशासनाने पर्यायी व्यवस्था करून दाखले वेळेवर मिळतील याची काळजी घ्यावी, जेणेकरून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवेशावर विपरित परिणाम होणार नाही. शासनाने डिजिटल सुविधा देताना त्या अधिक कार्यक्षम, सोप्या आणि अखंडित कशा राहतील याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आहे. ाय आहे महाऑनलाईन सेवा ? 'महाऑनलाईन' ही महाराष्ट्र सरकारची एक डिजिटल सेवा आहे. या डिजिटल सेवेतून विविध सरकारी योजना आणि मोबाईल ॲप्लिकेकशनदरे नागरिकांना शासकीय सेवांमध्ये सहभागी होण्याची सुविधा पुरवते. या महाऑनलाईनडरे विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती योजनांसाठी अर्ज करणे, प्रवेश प्रक्रिया (तांत्रिक, व्यावसायिक, कृषी शिक्षण इ.), कृषी उपकरणांसाठी अनुदान, शेतकऱ्यांसाठी राज्यातील भरती प्रक्रियेसाठी अर्ज, कौशल्य विकास आणि रोजगार योजना, सामाजिक कल्याण, आरोग्य विमा, पेंशन योजना इ. सेवा दिल्या जातात.

# फिनिक्स फाऊंडेशनचा नेत्रदान संकल्प ग्रामीण भागात ठरतोय दीपस्तंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर:** जागतिक दृष्टीदान दिनानिमित्त फिनिक्स सोशल फाऊंडेशनने नागरदेवळे येथे केलेल्या मोफत नेत्र तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात ४३० रुग्णांची तपासणी झाली असून ५९ शिबीरार्थींवर पुण्यात मोतीबिंदूच्या मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. फाऊंडेशनच्या सामाजिक कार्याची दखल घेत जालिंदर बोरुडे यांची राष्ट्रीय अंधत्व निवारण समन्वय समितीच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना पोलीस निरीक्षक प्रियांका आठरे म्हणाल्या, सामान्य दृष्टीहीनांसाठी फिनिक्स फाऊंडेशन हा खऱ्या अर्थाने देवदूत ठरतो आहे. बोरुडे यांच्या कार्याला समाज व शासनाकडून योग्य तो सन्मान मिळायला हवा. या वेळी फिनिक्सचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे, माजी जिल्हा परिषद सदस्य शरद झोडगे, पोलीस कॉन्स्टेबल प्रियांका पवार, संजय ताजने, इंजि. वैभव दानवे, इंजि. बोरुडे, मोहन कुऱ्हे यांच्यासह मोठ्या संख्येने



ग्रामस्थ आणि राज्यातील शिबिरार्थी उपस्थित होते. नेत्रदानातून नवदृष्टीचा संकल्प

शिबिराचे प्रास्ताविक करताना बोरुडे म्हणाले, शेतकरी व गरजू ज्येष्ठ नागरिकांचे जीवन उजळवण्याचे कार्य आम्ही गेली ३३ वर्षे करत आहोत. प्रत्येक महापुरुषांची जयंती- पुण्यतिथी आणि सण-उत्सव समाजोपयोगी उपक्रमांनी साजरे करणे ही आमची परंपरा झाली आहे. व अवयवदानाच्या चळवळीतून अनेकांना नवदृष्टी मिळाली आहे. माजी जि.प. सदस्य शरद झोडगे यांनी फिनिक्सच्या कार्याची प्रशंसा करत शिबिरासाठी ५१ हजार रुपयांची मदत जाहीर केली. त्यांनी सांगितले की, ग्रामस्वच्छतेपासून सुरू झालेली ही चळवळ नेत्रदानापर्यंत पोहोचली असून, लाखो नागरिकांचे जीवन या माध्यमातून उजळले आहे. समर्पित कार्यासाठी बोरुडे यांचा सन्मान फाऊंडेशनच्या कार्यामुळे एक सामाजिक चळवळ उभी राहिली आहे. त्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या जालिंदर बोरुडे यांची राष्ट्रीय अंधत्व निवारण समितीच्या राज्य अध्यक्षपदी निवड ही ग्रामीण भागातून उगम पावलेल्या सेवाभावी कार्याची पावती मानली जात आहे. या निवडीबद्दल नागरदेवळे ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. शिबिर यशस्वी होण्यासाठी सागर खरपुडे यांनी सूत्रसंचालन केले. आभार बोरुडे यांनी मानले. गौरव बोरुडे, ओम बोरुडे, जय बोरुडे, जगदीश बोरुडे, विशाल भिंगारदिवे, गिरीश पाटील, अनिल बनसोडे आणि दत्ता दळवी यांनी संयोजनात मेहनत घेतली.

## खरवंडी कासार येथील व्यापाऱ्यास लुटले, सुमारे ८९ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी:**तालुक्यातील खरवंडी कासार येथील व्यापारी प्रमोद बबनराव अंदुरे (वय-४३,रा.खरवंडी कासार) व त्यांच्या सोबत असणाऱ्या आणखी एकाला अज्ञात चार जणांनी अडवत महामार्गावरील हॉटेल दिपाली जवळ ८९ हजार रुपयांची लूट केल्याची घटना सोमवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडली.याबाबत पाथर्डी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रमोद अंदुरे यांचे खरवंडी कासार येथे भांड्याचे दुकान आहे.९ जून रोजी ते आणि बाबासाहेब पवार हे दोघे भांडी खरेदीसाठी अहिल्यानगर येथे गेले होते.तिथे त्यांनी सिद्धेश्वर इंटरप्रायझेस व जनरल स्टोअर्स गंजबाजार येथून माल खरेदी केला.खरेदी करून रात्री ९.३० वाजता ते खरवंडीकडे परत निघाले.रात्री साधारणतः ११ वाजता ते माळी बाभुळगाव रोडवरील एका हॉटेलवर जेवण्यासाठी थांबले.जेवण झाल्यानंतर त्यांनी पुन्हा प्रवास सुरू केला.मध्यरात्री बाराच्या सुमारास चांदगाव फाट्या जवळ,समोरून दोन मोटारसायकली त्यांना आडव्या आल्या.त्या मोटारसायकलवर ३ ते ४ अनोळखी तरुण होते.त्यांनी मास्क लावलेले होते.त्यांनी अंदुरे यांना दमदाटी करत जबरदस्तीने त्यांच्याकडील मोबाईल,रोख रक्कम व अंगठ्या हिसकावून घेतल्या.तसेच त्याच्या सोबत असलेले बाबासाहेब पवार यांचाही मोबाईल आणि रोख रक्कम लुटण्यात आली.यामध्ये रेडमी कंपनीचा अंदाजे ११ हजारांचा किंमतीचा मोबाईल, व्हिवो कंपनीचा अंदाजे ६ हजार रुपये किंमतीचा मोबाईल,दोन सोन्याच्या दहा ग्रॅम वजनाच्या अंगठ्या अंदाजे किंमत हजार रुपये व रोख रक्कम ३२ हजार रुपये असा एकूण लुटीचा आकडा ८९ हजार रुपये इतका आहे.या प्रकारानंतर दोघांनी खरवंडी गाठले आणि तत्काळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला आहे.चोरट्यांचा माग काढण्यासाठी सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरू आहे.

## वटपौर्णिमेला चैन स्नॅचिंगचा डाव उधळला; दोघे गजाआड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** वटपौर्णिमेच्या दिवशी चैन स्नॅचिंगच्या उद्देशाने शहरात फिरणाऱ्या दोघा सराईत गुन्हेगारांना तोफखाना पोलिसांनी सापळा रचून अटक केली. या दोघांकडून चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, त्यांनी याआधीही सोनसाखळी चोरी केल्याची कबुली दिली आहे. वटपौर्णिमेच्या दिवशी महिला मोठ्या संख्येने सोन्याचे दागिने घालून वडाच्या पूजेसाठी बाहेर पडतात, हे लक्षात जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी शहरभर पेट्रोलिंगचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने तोफखाना पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या नेतृत्वाखाली विविध पथके तयार करण्यात आली होती. १० जून रोजी नामदेव चौकात गस्त घालणाऱ्या पथकाला दोन संशयित इसम एक विना क्रमांकाची काळ्या रंगाची शाईन मोटारसायकल चालवताना आढळले. दोघांनी



हेल्मेट परिधान होते व चेहरा लपवला होता. त्यांच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी त्यांचा पाठलाग करून त्यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी आपली नावे समीर गुलाब शेख (वय ३८, रा. वाळुंज पंढरपूर, जि. छत्रपती संभाजीनगर) व अमर चिलु कांबळे (वय २९, रा. मुकीदपूर, झोपडपट्टी, ता. नेवासा) अशी सांगितली. विश्वासात घेऊन केलेल्या सखोल चौकशीत दीड महिन्यापूर्वी गुलमोहर रोड परिसरात एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण चोरी केल्याची कबुली दिली. यांच्याकडून एक शाईन मोटारसायकल, दोन हेल्मेट, मोबाईल फोन अशा एकूण ७९, हजार रुपयांच्या मुद्देमालाची जप्ती करण्यात आली. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना अटक केली आहे. या कारवाईसाठी पोलीस उपनिरीक्षक पाटील तपास करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि. आनंद कोकरे, पो.उ.नि. शैलेश पाटील आणि त्यांच्या पथकाने केली.

## जिल्ह्यातील ९ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या

### एसपी घार्गे यांची पहिली अंतर्गत बदल प्रक्रिया

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी नुकतेच जिल्हा अंतर्गत बदल्यांचे आदेश काढले असून, नऊ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये सहा पोलीस निरीक्षक (झख) आणि तीन सहाय्यक पोलीस निरीक्षक (अझख) यांचा समावेश आहे. एसपी घार्गे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर ही पहिलीच बदल प्रक्रिया राबवण्यात आली आहे. या अंतर्गत बदल्यांमध्ये पुढील अधिकाऱ्यांचा समावेश आहे: पाथर्डीचे पोलीस निरीक्षक संतोष रामचंद्र मुटकुळे यांची बदली शेवगाव येथे करण्यात आली आहे.नियंत्रण कक्षातील सोपान पाराजी शिरसाट यांना कर्जत येथे नियुक्ती मिळाली आहे. दशरथ निंबा चौधरी यांची बदली श्रीरामपूर येथून जामखेड येथे करण्यात आली आहे. विलास पुजारी यांना घारगाव येथून पाथर्डी येथे पाठवण्यात आले आहे. रामकृष्ण महादु कुंभार यांची बदली नियंत्रण कक्ष येथून कोपरगाव येथे झाली आहे.अरुण काशिनाथ धनवडे यांना नियंत्रण कक्ष येथून श्रीरामपूर येथे पाठवण्यात आले आहे.हेमंत शिवाजी थोरात, जे स्थायी गुन्हे शाखेत कार्यरत होते, त्यांची बदली घारगाव येथे झाली आहे. विजय झंजाड यांना खर्डा येथून मिरजगाव येथे बदली करण्यात आली आहे. उज्वलसिंह नवलसिंह राजपुत यांची बदली तोफखाना येथून खर्डा येथे करण्यात आली आहे. तसेच, जामखेड येथील पोलीस निरीक्षक महेश विष्णु पाटील यांची बदली जामखेड ठाणे येथे झाली आहे. पोलीस विभागामधील ही अंतर्गत फेरबदल कार्यक्षमतेत सुधारणा व प्रशासनिक संतुलन राखण्यासाठी केल्याचे सांगण्यात आले. याआधी जिल्ह्यातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदल्या पूर्ण झाल्या होत्या. आता अधिकाऱ्यांच्या स्तरावर फेरबदलांची प्रक्रिया पार पडली आहे.

# तलाठी मंडळ कार्यालयाच्या जागेतील अतिक्रमण काढण्याच्या आश्वासनानंतर उपोषण मागे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मिरी :**पाथर्डी तालुक्यातील करंजी येथील तलाठी व मंडल कार्यालयाची पाच गुंठे जागेची मोजणी करुन या जागेतील अतिक्रमण कोणतीच कारवाई केली नसल्याने येथील ग्रामस्थांनी दि. ११ जुन रोजी पुन्हा पाथर्डी तहसिल उपोषण सुरु केले होते. मात्र या जागेवरील अतिक्रमण हटविण्याचे आश्वासन दिल्यानंतर ग्रामस्थांनी उपोषण मागे घेतले.

पाथर्डी तालुक्यातील करंजी हे कल्याण-निर्मळ महामार्गावरील मोठे गाव आहे. येथील तलाठी व मंडल कार्यालयासाठी नविन इमारतही मंजुर झाली आहे. येथील तलाठी मंडल कार्यालयाची पाच गुंठे जागा आहे. १९८६ साली प्रांताधिकारी यांनी हुकुमही काढला होता. सात बारा उताऱ्यावर शासनाची नोंद असलेल्या जागेची मोजणी करुन घ्यावी यासाठी येथील ग्रामस्थांनी तहसिलसमोर उपोषणही केले होते.



त्यानंतर या जागेची भुमि अभिलेख कार्यालयाकडुन मोजणीही केली. जागेची मोजणी होऊन पंधरा दिवस उलटुन गेले तरी या जागेवरील अतिक्रमण कोणतीही कारवाई करण्यात न आल्याने ग्रामस्थांनी आज दि. ११ जुन रोजी सकाळी ११ वाजता पाथर्डी येथील तहसिल कार्यालयासमोर उपोषण सुरु केले होते. पाथर्डीचे तहसिलदार नाईक यांनी उपोषणकर्त्याशी चर्चा करुन या जागेतील अतिक्रमण लवकरच हटविण्यात येईल असे आश्वासन दिल्यानंतर ग्रामस्थांनी आपले उपोषण अखेर मागे घेतले. यावेळी पाथर्डी तालुका आरपीआय अध्यक्ष राजगुरु, करंजीचे माजी उपसरपंच नवनाथ आरोळे, बाबासाहेब मोरे, तक्षशिला ट्रस्टचे अध्यक्ष विश्वास क्षेत्रे, सुधीर आरोळे, लाजरस क्षेत्रे, कैलास क्षेत्रे, अझर पठाण, धर्मा क्षेत्रे, संदिप क्षेत्रे, तुषार क्षेत्रे, आकाश क्षेत्रे, संकेत क्षेत्रे, सुनिल भावलेसह अनेक कार्यकर्ते हजर होते.

**करंजी येथील मंडल व तलाठी कार्यालयाच्या जागेची मोजणी होऊन पंधरा दिवस गेले होते मात्र अतिक्रमणाबाबत कोणतीही कारवाई झाली नव्हती, तहसिलदार यांनी त्वरित कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. या जागेवरील अतिक्रमण न काढल्यास आमचे आंदोलन चालुच राहील**

**विश्वास क्षेत्रे**
**(अध्यक्ष तक्षशिला ट्रस्ट)**

**भुमि अभिलेख कार्यालयाने या जागेची मोजणी केलेली आहे. या जागेवरील अतिक्रमणाबाबत आपण महामार्ग खात्यास तसेच सार्वजनिक बांधकाम खात्यास पत्र दिलेले लवकरच कार्यवाही होईल**

**उध्दवराव नाईक**
**(तहसिलदार पाथर्डी)**

## मंदिराची जागा वेगळीच दिशाभूल करून लोकांच्या भावनेशी खेळ

### शिवसेनेच्या तालुकाध्यक्षांकडून पदाचा गैरवापर ;- बापू माने

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा:** मी व्यवहार केलेली जागा ही राममंदिराची नाही, त्या जागेचा आणि राममंदिराचा काहीही संबंध नाही तसे सिद्ध झाल्यास मी होणाऱ्या कायदेशीर कारवाईस तयार आहे माने यांनी ताडे यांच्यावर गंभीर आरोप केले राममंदिराच्या नावाखाली मुळ वारसदारांची नावे कमी करण्यासाठी नंदकुमार ताडे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जवळचा कार्यकर्ता आणि त्यांच्या पक्षाचे तालुकाध्यक्ष पदाचा गैरवापर करत शिवसेनेच्या लेटरपॅडवर तहसीलदारांना पत्र देऊन त्यांच्यावर आपल्या पदाचा दबाव टाकण्याचा प्रयत्न केला आहे असा आरोप करत सदर लेडरपॅडवर दिलेले त्यांनी पत्रकारांना दाखवले तसेच या प्रकाराबाबत नंदकुमार ताडे यांना शिवसेनेच्या तालुकाअध्यक्षपदावरून हटवण्याची मागणी माने यांनी यावेळी केली. शहरात ताबेमारीचे प्रकार सूरु असतानाच आता शहरातील बाजारतळावरील राम मंदिराच्या जागेवरून नवा वाद सुरु झाला आहे सदर राम मंदिराच्या जागेची बापू माने यांनी धर्मादाय आयुक्तांच्या परवानगी शिवाय खरेदी केल्याचा आरोप शिवसेना शिंदे तालुकाध्यक्ष नंदकुमार ताडे यांनी करत त्याबाबत प्रशासनाकडे तक्रार केली होती, त्यावर प्रतिक्रिया देण्यासाठी बी एम ग्रुपचे अध्यक्ष बापुशेठ माने यांनी पत्रकार परिषद आयोजित केली होती यावेळी त्यांच्यासोबत सदर राममंदिर जागेचे मूळ वारसदार चंद्रनंदन सारंग ताडे हे देखील उपस्थित होते . याबाबत संबंधित लोकांशी पत्रव्यवहार केल्याचे माने यांनी सांगितले तसेच ताडे यांनी सुद्धा नंदकुमार ताडे यांच्यावर गंभीर आरोप केले त्यांनी सांगितले की नंदू ताडे यांनी आपल्या पदाचा गैरफायदा घेत सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे राममंदिराच्या मठाच्या जागेचे सि.स.नं.२०४८मध्ये खरे कायदेशीर विश्वस्त व मालक यांना लपवून ठेवले आहे सहायक धर्मादाय आयुक्त यांची दिशाभूल करत शपथेवर खोटे कागदपत्र तयार केलेलं आहेत.

# मोहटादेवी ट्रस्टच्या वतीने सेवानिवृत्त शिक्षक भाऊसाहेब पालवे यांचा सन्मान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** तालुक्यातील मोहटे येथील श्री जगदंबा सार्वजनिक ट्रस्ट संचालित रेणुका विद्यालयाचे इंग्रजी विषयाचे शिक्षक भाऊसाहेब पालवे वयोमानानुसार नुकतेच सेवानिवृत्त झाले.त्यांचा श्री मोहटादेवी देवस्थान समितीच्या वतीने सन्मान करण्यात आला. तालुक्यातील मोहटे येथील रेणुका विद्यालयाचे शिक्षक भाऊसाहेब पालवे यांनी विद्यालयात गेली ३० वर्षे इंग्रजी विषयाचे ज्ञानदानाचे कार्य केले.आपल्या प्रदीर्घ सेवेत त्यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी अथक परिश्रम घेतले. त्यांच्या व निष्ठावान सेवेसाठी श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्टच्या वतीने त्यांचा मोहटादेवी गडावर विशेष सत्कार करण्यात आला.यावेळी मोहटादेवी संस्थेचे विश्वस्त



मोहटादेवी ट्रस्टच्या वतीने भाऊसाहेब पालवे यांचा सन्मान करण्यात आला.

तथा शाळा समिती अध्यक्ष बाळासाहेब दहिफळे,शशिकांत दहिफळे,मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे,रेणुका विद्यालयाचे मुख्याध्यापक बाबासाहेब दहिफळे,शिक्षक रवींद्र तापकीर यासह आदी कर्मचाऱ्यांच्या वतीने भाऊसाहेब पालवे यांचा शाल,शिफळ,पुष्पहार देऊन करण्यात आला.यावेळी मुख्याध्यापक बाबासाहेब दहिफळे म्हणाले,पालवे सर यांनी आपल्या सेवेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या जीवनात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांची कामा प्रती असलेली निष्ठा आणि समर्पण भाव निश्चितच अनुकरणीय आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ शिकवले च नाही तर त्यांच्यावर संस्कार ही केले.पालवे सर यांनी आपले विचार व्यक्त करतांना आपल्या मागील आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले,सहकाऱ्यांकडून माझ्या प्रत्येक कामात साथ मिळाली म्हणूनच मी माझी जबाबदारी पूर्ण करू शकलो.

# शोरूममधून रोकड गायब; तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** सावेडी येथील एका नामांकित ब्रँडच्या कपड्यांच्या शोरूममधून तब्बल २ लाख ३० हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना आली असून, या प्रकरणी शोरूम मॅनेजरच्या तक्रारीवरून दोघा कर्मचाऱ्यांविरोधात फसवणुकीचा गुन्हा तोफखाना पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. आरोपी अद्याप फरार असून, पोलिसांनी त्यांचा शोध सुरू केला आहे. सदर घटना ॲपेक्स हॉस्पिटलजवळील यू.एस. पोलो शोरूममध्ये घडली. या शोरूमचं व्यवस्थापन वैशाली इंटरप्रायजेस या फ्रँचायझी कंपनीकडे असून, याचे मॅनेजर रविराज दत्तात्रय (वय ३१, रा. कोल्हापूर) यांनी फिर्याद दिली आहे. तक्रारीनुसार, साहील अजयराव रिसोडकर (रा. अमरावती) हे शोरूममध्ये मॅनेजर होते, तर अक्षय मच्छिंद्र तुंगार (रा. सावेडी) हे सेल्स स्टाफ म्हणून कार्यरत होते. १८ मे २०२५ पासून सीएमएस कंपनीमार्फत होणाऱ्या रोकड भरती प्रक्रियेत अनियमितता आढळून आली. ३ जून रोजी साहील रिसोडकर अचानक गायब झाला, ही बाब सेल्स स्टाफने फोनवरून व्यवस्थापनाला कळवली. कंपनीने सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता, साहील आणि अक्षय दोघांनी मिळून शोरूमच्या ड्रॉवरमधील रोकड काढून नेल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर व्यास यांनी दिलेल्या तक्रारीवरून फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला. या दोघांनी संगनमत करून २ लाख ३० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप तोफखाना पोलीस याप्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू केला आहे.

दखल

## ढवळपुरी येथे संत कबीर प्रकटदिनानिमित्त सत्संग मेळाव्यात ५०० रक्तदात्यांचे रक्तदान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**भाळवणी :** संत कबीर यांच्या ६२८ व्या प्रकट दिनानिमित्त ढवळपुरी सतलोक आश्रम येथे जगदुरु तत्त्वदर्शी संत रामपाल जी महाराज यांनी प्रकट दिवस तसेच विशाल भंडारा बरोबर तिन दिवस धार्मीक कार्यक्रमाचे आयोजन केले.




ढवळपुरी (ता. पारनेर) येथे सत्संग मेळाव्यात रक्तदान शिबीर प्रसंगी डॉ. प्रशांत सिनारे व त्यांचा स्टाफ. छाया : अभिजीत कपाळे, भाळवणी.

ढवळपुरी (ता. पारनेर) येथील सतपाल महाराज यांनी शंभर एकराच्या परीसरात तीन दिवस या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. यामध्ये अखंड पाठ, विशाल भंडारा, निशुल्क नाम दीक्षा, हुंडामुक्त विवाह, प्रदर्शन तसेच विशाल सत्संग कार्यक्रमाचे भव्य असे आयोजन दि. ०९,१०,११ जून असे तीन दिवस या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रामधून मोठ्या प्रमाणात भक्तगणांनी सत्संगाचा लाभ घेतला. तसेच तीन दिवस या ठिकाणी भक्तगण मुक्कामी होते. याठिकाणी मोफत भंडाराचे आयोजन केले आहे. दि. १० जून रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात जवळपास ५०० ते ७०० रक्तदात्यांनी रक्तदान केले. भाळवणी येथील युनिटी क्रिटीकल केअर मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटलच्या वतीने डॉ. प्रशांत सिनारे यांनी रक्तदान शिबिराचे आयोजन या निमित्ताने केले होते. तसेच हॉस्पिटलच्या वतीने येथे येणाऱ्या भाविकांना मोफत रुग्णसेवा दिली. महाराष्ट्रामधील हा दुसऱ्यांदा सत्संग मेळावा भरला वीस वर्षांपूर्वी ह्या मेळाव्याचे आयोजन झाले होते. या ठिकाणी भाविकांसाठी सुविधाही अतिशय उत्तम प्रकारे करण्यात आली. या सत्संग मेळाव्यामध्ये सामुदायिक विवाह सोहळा ही मोठ्या उत्साहात पार पडला.

## राज्यस्तरीय पुरस्काराने सुखदेव चितळकर सन्मानित

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**भाळवणी :-** ढवळपुरी येथील सामाजिक कार्यकर्ते व दुर्गेश्वरी दुध संस्थेचे संस्थापक चेअरमन सुखदेव चितळकर यांना त्यांच्या सामाजिक, तसेच कृषी पुरक व्यवसायाच्या कामाची दखल घेत गरुड फौंडेशनच्या वतीने राज्यस्तरीय 'समाजभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**माझ्या आजपर्यंतच्या सामाजिक, राजकिय, कृषी संलग्नित कार्याची दखल गरुड फौंडेशन च्या वतीने मिळालेला पुरस्कार पुढील वाटचालीसाठी नवा उत्साह निर्माण करणारा आहे. – सुखदेव चितळकर. (चेअरमन, दुर्गेश्वरी दुध संकलन केंद्र)**

या पुरस्काराचे वितरण राहुरी कृषी विद्यापीठ येथे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, शिवसेना रावसाहेब खेवरे, विजय तिने, रामचंद्र थोरात आदि मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी सर्वश्री नामदेव देवकाते, बबनराव देवकाते, अशोक कुटे, बापुराव देवकाते, अशोक गावडे, बाबु गावडे, माजी ग्रामपंचायत सदस्य सुनिता चितळकर, संगिता खेमनर, रंजना चितळकर, प्रेम चितळकर आदि उपस्थित होते.




राहुरी कृषी विद्यापीठ येथे पुरस्कार स्वीकारताना सुखदेव चितळकर व इतर मान्यवर. छाया : अभिजीत, भाळवणी.

# श्रीगोंदयात गौण खनिजाची खुलेआम चोरी सुरु ; प्रशासनाचे दुर्लक्ष

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** तालुक्यात चोरट्या मार्गाने वाळू उत्खनन वाहतूक करून त्याची दुप्पट दराने विक्री केली असून वाळू व्यतिरिक्त माती, मुरूम ,डबर याचे अवैध उत्खनन करून शासनाच्या महसुलाची दिवसाढवळ्या चोरी केली जात आहे. त्यामुळे महसूल विभागाने दक्षता ठेवून गौण खनिज संपत्तीचे उत्खनन अवैध वाहतूक रोखण्याची मागणी सर्वसामान्य नागरिकांमधून होताना दिसत आहश्रीगोंदा तालुक्यातील विविध भागात जवळपास सगळीकडेच बांधकामे जोरात सुरू आहेत त्यासाठी लागणाऱ्या वाळू आणि मोठ्या प्रमाणात खुलेआम तस्करी सुरू आहे. अनेक परिसरातून वाळूची मोठ्या प्रमाणात तस्करी करून दामदुप्पट दराने त्याची विक्री केली जात आहे त्यामुळे बांधकाम व्यावसायिक देखील कोणत्याही प्रकारची शहानिशा न करता मिळेल त्या भावात वाळू आणि मुरूम यांची खरेदी करतात या सर्व प्रकारामुळे महसूल विभागाचे मोठे नुकसान होत आहे. वाळू विक्रीतून मिळणारा महसूल एक प्रकारे चोरीच होत आहे असे म्हणणे काही वावगे ठरणार नाही हा महसूल शासनाच्या तिजोरीत जमा न होता वाळू तस्करांच्या खिशात जात आहे बांधकामावर वाळू बरोबर मुरमाची सुद्धा तेवढीच गरज आहे पायाभरणी झाल्यानंतर कॉलम मध्ये भरण्यासाठी मुरमाची अत्यंत



आवश्यकता आहे त्यामुळे मुरमाचेही दर तेवढेच वाढलेले आहेत त्यामुळे भरून मुरमाची वाहतूक करणे तस्करांना परवडत नसल्याने रात्रीच्या वेळी शासनाच्या जमिनीवर अवैध उत्खनन करून मुरमाची चोरी होत आहे वीट भट्टी साठी लागणारी माती सुद्धा शासनाच्या सरकारी जमिनीतून अवैध उत्खनन करून वाहतूक केली जात आहे या सर्व अवैध प्रकाराला महसूल विभागातील काही भ्रष्ट अधिकारी तेवढे जबाबदार आहेत काही भ्रष्ट अधिकारी माफीयांचे आर्थिक हितसंबंध असल्याने ते या प्रकाराकडे रीतसर कानाडोळा करत आहेत वाळू मुरूम माती वाहतूक करणारे बहुतांश वाहने ही विना नंबरची आहेत अहिल्यानगर जिल्ह्यात गौण खनिज संपत्तीची मोठ्या प्रमाणात चोरट्या मार्गाने वाहतूक होत असताना महसूल प्रशासनाचे अधिकारी धृतराष्ट्राची भूमिका घेत आहेत महसूल कर्मचाऱ्यांनी रात्रपाळीला नदीकाठी जाऊन पाळत ठेवण्याची गरज तसेच गावागावातील तलाठी यांनी रात्रीला तक्ष राहून वाळू मुरूम मातीचे वाहतूक होणाऱ्या वाहनांना पकडून दंडात्मक कारवाई केल्यास या प्रकाराला आळा बसेल नाही तर शासनाची कोट्यावधी रुपयाची संपत्ती चोरट्या मार्गाने विल्हेवाट लावून माफिया गब्बर झाल्याशिवाय राहणार नाहीत.

# कचरामुक्त उरुळी कांचन दोन एकर जागा देणार: के.डी.कांचन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**उरुळी कांचन** - ीम्स युवा सोशल फाउंडेशनच्या ''कचरा मुक्त उरुळी कांचन'' या संकल्पनेला पाठिंबा देताना आम्ही देवस्थानच्या मालकीची दोन एकर जागा देऊन भरीव सहकार्य करू असे आश्वासन देवस्थानचे सचीव व कार्यक्रमाचे अध्यक्ष के.डी.कांचन यांनी दिले.ते ड्रीम्स युवा फाउंडेशन आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन प्रसंगी बोलत होते. ८जून रोजी ड्रीम्स युवा सोशल फाउंडेशन संचलित उरुळी कांचन ग्रामस्वच्छता अभियान ग्रुपच्या वतीने जागतिक रक्तदान दीन आणि जागतिक पर्यावरण दीन एकत्रित संपन्न करताना विक्रमी ७६८बाटल्या रक्त संकलित करुन सुमारे ४ हजार देशी झाडांच्या रोपांचे वृक्षारोपण करण्याचा संकल्प प्रातिनिधीक स्वरूपात काही रोपे सोडण्यात आला . या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून बायफचे उपाध्यक्ष डॉ. जयंत खडसे , हवेलीचे वनपरिक्षेत्र अधिकारी सुरेश वरक , उरळीकांचन चे सरपंच मयुर कांचन , उपसरपंच स्वप्नीषा कांचन ,वनपरिक्षेत्र अधिकारी प्रमोद रासकर, राजाराम कांचन, महादेव तु.कांचन, भाऊसाहेब ल. कांचन, संतोष ह. कांचन, अमितबाबा कांचन, युवराज कांचन, गणेश



टिळेकर, चौधरी, राजेंद्र टिळेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी सुरेश वरक यांनी वन क्षेत्रात वृक्ष लागवड आणि संवर्धन कार्यासाठी आवश्यक ती पूर्ण मदत करण्याचे आश्वासन दिले. प्रमुख पाहुणे डॉ.जयंत खडसे यांनी मागील १० वर्षांत ड्रीम्स युवा सोशल फाउंडेशनच्या वतीने राबविण्यात आलेले ग्राम स्वच्छता अभियान आणि जनजागृती याची दखल घेत, उरुळी कांचन गावातील घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारणीसाठी भागीदार म्हणून सहभागी होतानाच कचरामुक्त उरुळी कांचन करण्यासाठी ''बायफ'' एक संस्था म्हणून तंत्रज्ञान विषयक सहकार्य करेल असे सांगितले. अध्यक्षीय भाषणात प्रा. के.डी. कांचन यांनी दुसऱ्यांदा दानशूरपणा दाखवत गावाच्या विकासात अग्रेसर असल्याचे दाखवून दिले. या अगोदरही त्यांनी देवस्थानची सुमारे साडेसात एकर जागा कांचनच्या पिण्याच्या पाणीपुरवठा योजनेच्या कामासाठी देऊन भरीव सहकार्य केलेले आहे. रक्तदान शिबिरामध्ये एकूण ७६८ रक्तदात्यांनी रक्तदान केले, त्यापैकी२१ महीला रक्तदाते होते. रक्तदान शिबिरासाठी तर्पण ब्लड बँक, ससून रक्त पेढी, स्पंदन ब्लड बँक आणि महा ब्लड बँक यांनी सहकार्य केले. शिबीराचे विशेष आकर्षण म्हणजे दात्री सेवाभावी संस्थेच्या वतीने रक्ताच्या रोगावरील उपचारासाठी रक्तपेशींची जुळणी करण्यासाठी स्वॅब चाचणी शिबीर राबविले. दात्री ही आंतरराष्ट्रीय पातळीवर रक्ताच्या कर्करोगाबद्दल जनजागृती आणि शिबीरांचे आयोजन करणारी भारतातील अग्रणी संस्था आहे. या शिबीरात २६५ रक्तदात्यांनी स्वॅब दिले. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन ग्रामदुत ऋषिकेश भालेराव, प्रास्ताविक ग्रामदुत गणेश कोलते आणि आभार ग्रामदुत स्वरुप झाडगे यांनी व्यक्त केले.

## महसूल लोक अदालतीत ४६ प्रकरणांची तडजोड



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पाबळ :** शिरूर तहसिल कार्यालयात आयोजित महसूल लोक अदालतीला नागरिकांकडून मोठा प्रतिसाद लाभला. तहसील स्तरावर नोंदणीकृत ३६३ प्रकरणांपैकी तब्बल ०० नागरिकांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून आपली प्रकरणे मांडली. यामधून एकूण ४६ प्रकरणांचा यशस्वीपणे निपटारा करण्यात आला असून, ही सर्व प्रकरणे आपसी सहमतीने निकाली काढण्यात आली.निपटार्यात सामील झालेल्या प्रकरणांमध्ये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील कलम १५० अंतर्गत ३३ प्रकरणे, कलम १५५ अंतर्गत १० प्रकरणे, मामलेदार कोर्ट ॲक्ट अंतर्गत कलम ५ मधील २ प्रकरणे आणि अतिक्रमण दर्भातील कलम १३८ अंतर्गत १ प्रकरणाचा समावेश होता. प्रकरणे निकाली काढण्यासाठी दोन्ही पक्षांमध्ये सकारात्मक संवाद साधण्यात आला त्यातून तडजोडनामा करून समाधानकारक निपटारा करण्यात आला.या लोक अदालतीस तहसीलदार बाळासाहेब मस्के,म महसुल नायब तहसीलदार प्रकाश मुसळे, तसेच महसूल विभागाचे इतर अधिकारी आणि कर्मचारी यांनी मार्गदर्शन केले. प्रकरणांवर कार्यवाही करताना प्रत्येक अर्जदारास न्याय मिळावा यासाठी प्रशासकीय यंत्रणा सजग राहिली होती. लोक अदालतीमुळे अनेक जुन्या आणि प्रलंबित प्रकरणांना गती असून, नागरिकांनी देखील या प्रक्रियेबाबत समाधान व्यक्त केले आहे. यामुळे महसूल खात्याच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता आणि लोकाभिमुखता अधिक दृढ झाल्याचे चित्र दिसून आले आहे. प्रलंबित राहिलेल्या इतर प्रकरणांवरही टप्प्याटप्प्याने सुनावण्या घेऊन न्याय देण्याचा महसूल विभागाचा प्रयत्न असल्याचे तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांनी स्पष्ट केले. नागरिकांच्या सहकार्याने महसूल लोक अदालतीचा उपक्रम अधिक राबवण्यात आला आहे.

# मंचर येथील सराईत गुन्हेगार नागपूर कारागृहात स्थानबध्द

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**निरगुडसर :** मंचर (ता. पोलीस स्टेशन हद्दीतील पवन सुधिर थोरात (वय २५ वर्षे रा. मंचर, ता. आंबेगाव), या सराईत गुन्हेगार असून त्याचेवर खुन, खुनाचा प्रयत्न, खंडणी, गर्दीमारामारी, अपहरण, अवैध वाळूचोरी, अवैध शस्त्रबाळगणे यासारखे गंभीर स्वरूपाचे एकूण १२ गुन्हे दाखल आहेत. तसेच मंचर पोलीस स्टेशन व खेड पोलीस स्टेशनने त्याचेवर यापुर्वी मोका अंतर्गत कारवाई आहे. पवन सुधिर थोरात याला वेळोवेळी गुन्हयात अटक करण्यात आली असून तो जामीनावर आलेवर प्रतिबंधात्मक कारवाई देखिल करण्यात आली आहे. परंतू त्याचे वर्तनूकीत कोणत्याही प्रकारची सुधारणा होत नव्हती, सामान्य लोकांचे मनात त्याचेविषयी भिती निर्माण झाली होती. त्याचेवर वेळीच कायदयाचे बंधन राहावे तसेच त्याचे गुन्हेगारीला, विघातक कृत्यांना आळा बसावा घालण्याकरीता सुधिर थोरात याला जेलमध्ये स्थानबध्द करणेबाबत पोलीस निरीक्षक मंचर पोलीस स्टेशन यांनी, मा. पोलीस अधिक्षक सो पुणे ग्रामीण यांचे मार्फतीने मा जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे प्रस्ताव पाठविला होता. दि. ९/६/२०२५ रोजी मा जिल्हाधिकारी सो पुणे यांनी पवन सुधिर थोरात याचे स्थानबध्देचे आदेश पारीत केले असून पवन थोरात यास ताब्यात घेवून कारागृह नागपूर येथे जमा करण्यात आले आहे. मंचर पोलीस हद्दीत जो कोणी कायदयाचे उल्लंघन करील, जनतेमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करील अशा सर्व गुन्हेगारांवर मंचर पोलीस स्टेशन लक्ष ठेवून आहे. त्यांचेवर देखिल अशा प्रकारे योग्य कारवाई करण्यात येणार असल्याचे मंचर पोलीसांनी सांगितले. सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक संदिपसिंग गिल, पोलीस अधिक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पो. अधिकारी अमोल मांडवे, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीकांत कंकाळ, पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर (स्थानिक गुन्हे शाखा ), सहा पोलीस निरीक्षक सुनिल बडगुजर, पोलीस उपनिरीक्षक यशवंत यादव, सहा. पोलीस उपनिरीक्षक राजेश नलावडे, नितीन बनकर, पोलीस ह. संजय नाडेकर, शेखर भोईर, प्रणयकुमार उर्किडे, शरद कुलवडे, आढारी, पोलीस अंमलदार अविनाश दळवी, योगेश रोडे, अजित पवार, तुषार अर्जुन, लखन माने यांनी केली आहे.

# महाराज जाधव आळंदीभुषण वारकरी पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** वारकरी शिक्षण संस्थेचे संस्थापक सदगुरु मारोतीबोवा गुरव आळंदीकर यांच्या ८२ व्या पुण्यतिथी सोहळ्याचे औचित्य साधुन समस्त गुरव परिवार व आळंदीकर ग्रामस्थ यांच्या वतीने सदगुरु मारोतीबोवा गुरव यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा आळंदी भुषण वारकरी पुरस्कार वेदांत सत्संग समितीचे डॉ.नारायण महाराज जाधव यांना देऊन गौरविण्यात आले असल्याचे आयोजक संकेत वाघमारे यांनी सांगितले. याप्रसंगी आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ, माजी नगराध्यक्ष राहुल चिताळकर पाटील, माजी उपनगराध्यक्ष नंदकुमार कुऱ्हाडे, माजी सभापती डि. डि.भोसले पाटील, भाजपा नेते डॉ.राम गावडे, भाजपा शहराध्यक्ष किरण येळवंडे, विलास वाघमारे, अनिल वाघमारे, ज्ञानेश्वर जाधव, विश्वंभर पाटील, संकेत वाघमारे उपस्थित होते. महाराज जाधव मुळचे नगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील कर्जुले हरिया येथील रहिवाशीआहेत. घरात वारकरी संप्रदायाचा वारसा



असल्याने त्यांची पावले आळंदीकडे अध्ययनासाठी वळाली. येथे आल्यानंतर सद्गुरू जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेत संत साहित्याचा अभ्यास सुरू केला. आळंदीतील गोपाळपुरा येथे केवल्य आश्रमामधील आनंदस्वामी ऊर्फ दन्तेस्वामी यांच्याकडे बरेच वर्षे राहून वारकरी पद्धतीचे घेतले. एकनाथी भागवत, विचारसागर, ज्ञानेश्वरी, वृत्तीप्रभाकर, पंचदशी अशा अनेक ग्रंथांवर त्यांचे प्रभुत्व आहे. त्यांनी वारकरी शिक्षण देणारी संस्था आळंदीत उभी करून शेकडो कीर्तनकार, प्रवचनकार, साधकांना घडविण्याचे काम केले आहे.

# शिरदाळे परिसरात बटाटा लागवडीची लगबग

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लोणी धामणी :** आंबेगाव तालुक्यातील शेवटचे टोक असलेले शिरदाळे परिसरामध्ये पेरणी अंतिम टप्प्यात आली असून यंदा देखील बटाटा लागवडीकडे शेतकऱ्यांचा कमी कल असल्याचे पाहायला मिळत आहे.संपूर्ण मे महिन्यात झालेल्या भरपूर पावसामुळे शेतकरी वर्ग आनंदी असून पावसाने सुरवात चांगली केल्यामुळे आणि तीन दिवसांची उघडीप दिल्यामुळे ९० टक्के पेरणी पूर्ण झाली असून पुढील दोन दिवसात १०० टक्के पेरणी पूर्ण होणार आहे.ज्या क्षेत्रावर बटाटा लागवड करायची आहे तेच क्षेत्र बाकी आहे. परंतु यंदा देखील बटाटा लागवडीत मोठी घट होणार असल्याचे पाहायला मिळत आहे.बाबाजी चौधरी,निवृत्ती मिंडे,सुरेश तांबे,कचर तांबे हे शेतकरी वगळता बाकी शेतकऱ्यांची लागवड ही प्रमाणात असणार आहे.तर भांडवल खर्च जास्त असल्यामुळे आणि उत्पन्न कमी यामुळे बटाटा लागवडीकचे प्रमाण कमी झाल्याचे कांताराम तांबे,कोंडीभाऊ



शिरदाळे (ता.आंबेगाव ) येथे ट्रॅक्टरच्या साह्याने बटाटा लागवड करताना शेतकरी. ( छायाचित्र राजु देवडे )

तांबे,राघू रणपिसे,संभाजी सरडे,केरभाऊ तांबे या शेतकऱ्यांनी सांगितले.

तर शेतीला पूरक असणारा दुग्धव्यवसाय वाढल्यामुळे शेतात जनावरांचा चारा मग त्यामध्ये मका करण्यावर शेतकऱ्यांचा कल असल्याचे दूध उत्पादन शेतकरी शुभम तांबे,सचिन तांबे,ज्ञानेश्वर तांबे,सुरेश तांबे शेतकऱ्यांनी सांगितले. त्याचबरोबर सोयाबीन,उडीद,मूग, वाटाणा आणि भुईमूग पेरणी करण्यात आली असल्याचे मचिंद्र चौधरी,तात्याभाऊ चौधरी,निवृत्ती तांबे या शेतकऱ्यांनी सांगितले. पाऊसमान चांगले झाल्यामुळे शेतकऱ्यांचा ट्रॅक्टरच्या साहाय्याने मशागत करण्यावर भर असून बैलांची शेती बुडीत झाल्याचे पाहायला मिळत आहे.त्यामुळे ट्रॅक्टर व्यावसायिकांना भरपूर मागणी असून पेरणीसाठी ट्रॅक्टर अपुरे पडत असल्याचे ट्रॅक्टर व्यावसायिक बाळासाहेब रणपिसे,भुपेंद्र तांबे,श्रीकांत मिंडे,सुहास चौधरी,संतोष तांबे यांनी सांगितले.

**तर बटाटा लागवडीला भांडवल जास्त असल्यामुळे कमी प्रमाणात लागवड होत असून पीक हातात येईपर्यंत गोळाबेरीज केली तर हातात येणारे उत्पन्न हे देखील खूप कमी असते.शिवाय मजुरांचा तुटवडा खतांच्या महागलेल्या किंमती यामुळे देखील एकेकाळी बटाटा आगार अशी ओळख असलेले आमचे शिरदाळे गावातील शेतकरी बटाटा करायला म्हणावे तशी हिम्मत करत नाहीत.**

**मयुर संभाजी सरडे,**
**माजी उपसरपंच शिरदाळे**

## उरुळी कांचन महावितरण शाखेचा भोंगळ कारभार वरिष्ठ अधिकारी कारवाई करणार का ?

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**उरुळी कांचन :-** उरुळी येथील आश्रम रोडवरील जैन मंदिर नजीक असलेल्या रोहित्राचे फ्युज बॉक्स जमिनीपासून अवघ्या दोन ते अडीच फुट उंचीवर आहे. अगदी लहान मुल पण त्यामधील फ्युज पर्यंत सहज पोहोचू शकेल अशी त्या बॉस्कची अवस्था ! या बॉक्सला एक दार नाही तर एक दार सताड उघडे असून फ्युजपण उघडे आहेत, या परिसरात करणारे वायरमन अथवा कनिष्ठ अभियंता यांना या धोकादायक बाबीची कल्पना नाही का ? असा सवाल उपस्थित झाला आहे. या ठिकाणी काही अपघात वा दुर्घटना झाल्यावरच महावितरणचे डोळे उघडणार आहेत का असा प्रश्न जनतेला पडला आहे. काही कर्मचारी नियमाप्रमाणे मुख्यालयात वास्तव्यास



रहात नसल्याने त्यांच्या कार्यक्षेत्रात जर रात्री अपरात्री विजेचा काही झाला तर तो दुरुस्त करण्यासाठी ते उपलब्ध असत नाहीत, त्यामुळे ग्राहकांना गैरसोयीचा सामना करावा लागतो पावसाळ्यापूर्वी आवश्यक त्या ठिकाणी दुरुस्तीची व देखभालीची कामे पूर्ण केल्याचा डांगोरा पिटवीत अधिकारी व कर्मचारी वरिष्ठांच्या पुढे आपल्या कामाची वाहवा करून घेताना स्पर्धा करतात, पण पुढे हीच केलेली कामे किती तकलादू व दिखाऊ याचा प्रत्यय साधा पाऊस पडला तरी वीज जाण्याने नागरिकांना येतो व हाच घोटाळा वीज वितरणच्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना कधी कधी चार चार तास सापडत नाही अशी अवस्था या भागात सातत्याने घडत असल्याने या भागातील ग्राहक कमालीचे त्रस्त झाले असून या बाबत कोणाकडे दाद मागायची या विवंचनेत आहेत ! वीज गोंधळाने महावितरणच्या उरुळी कांचन शाखेच्या कारभारावर परिसरातील शेतकरी व वीज ग्राहक प्रचंड नाराज असून, यवत वरून कोरेगांव मुळ सब स्टेशन पर्यंत येणाऱ्या ३३ के.व्ही. लाइनचा घोटाळा कायम स्वरुपात केंव्हा दुरुस्त होणार या विवंचनेत ग्राहक आहेत. नवीन वीज कनेक्शनसाठी कार्यालयात माराव्या लागणाऱ्या फेऱ्या, अनामत रक्कम भरून देखील वीजजोड मिळण्यात होणारा ट्रान्सफार्मरच्या दुरुस्तीसाठी पहावी लागणारी वाट अशा विविध समस्यांमुळे येथील वीज ग्राहकांनी महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामावर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. स्थानिक कनिष्ठ अभियंता ग्राहकांशी नीट बोलत नाहीत, योग्य उत्तर देत नाहीत, त्यांच्या समस्यांची उकल करत नाहीत तर उर्मटपणे बोलून ग्राहकांना नाराज करतात असा आरोप माजी जिल्हा परिषद सदस्य अशोक यांनी केला आहे.

द•ख•ल

## बोल्हेगावमध्ये मध्यरात्री युवकावर रॉडने हल्ला, महिलांनाही मारहाण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** बोल्हेगाव येथील गणेश चौक परिसरात मंगळवार, १० जूनच्या मध्यरात्री १: ३०वाजेच्या सुमारास एका युवकावर लोखंडी रॉडने हल्ला करण्यात आला. त्याचबरोबर त्याच्या आई व बहिणींनाही मारहाण करत गंभीर दिल्याचा प्रकार घडला. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यश आदिक भोसले (वय १८) याने दिलेल्या फिर्यादीनुसार, तो आपल्या आई कविता भोसले आणि बहिणी आकांशा व रुतुजा यांच्यासोबत बोल्हेगावात भाड्याच्या घरात राहतो. त्याची बहीण आकांशा हिचा काही महिन्यांपूर्वी राजेश शशिकांत कुतावंत याच्याशी विवाह झाला सध्या ती माहेरी राहत आहे. घरगुती वादातून आकांशाच्या सासरच्या लोकांनी थेट घरात घुसून हल्ला केल्याचा आरोप आहे. पुजा शशिकांत कुतावंत (नणंद), राजेश कुतावंत (पती), संगीता कुतावंत (सासू) आणि सिद्धू (पूर्ण नाव उपलब्ध नाही) या चौघांनी मध्यरात्री घरात शिरून प्रथम वाद घातला. त्यानंतर पुजा हिने यशच्या डोक्यात लोखंडी रॉडने घाव त्यामुळे त्याला गंभीर दुखापत झाली. त्याला तातडीने सिव्हिल हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले.या हल्ल्यात यशच्या आई आणि बहिणींनाही लाथाबुक्यांनी मारहाण करण्यात आली. शिवाय तुमचं एक एक करून संपवतो अशी जीवे मारण्याची धमकी देत हे चौघे घटनास्थळावरून पसार झाले. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या पोलीस उपनिरीक्षक अमोल गायधनी करीत आहेत.

## अल्पवयीन मुलीस फूस लावून नेणारा आरोपी अखेर अटकेत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** तालुक्यातील साकत खुर्द येथून अल्पवयीन मुलीस फुस लावून पळवणाऱ्या आरोपीला नगर तालुका पोलिसांनी कोल्हापूरमधून अटक केली आहे. कल्याण रामकिसन वाघमोडे (वय २१, रा. भातकुळगाव, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे आहे. न्यायालयाने आरोपीला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. ही धडक कारवाई साहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. साकत खुर्द येथून एक अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाल्याने नगर तालुका पोलीस ठाण्यात अज्ञाताविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासाच्या दरम्यान तांत्रिक पुराव्यांच्या आधारे कल्याण वाघमोडे याच्यावर संशय पोलिसांनी कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील कसबा सांगवी येथे सापळा रचून आरोपी व पीडित मुलगी दोघांनाही ताब्यात घेतले. प्राथमिक चौकशीत आरोपीने पीडित मुलीसोबत शारीरिक संबंध ठेवल्याची कबुली दिली आहे.ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. उपनिरीक्षक भरत धुमाळ, सहाय्यक फौजदार रमेश गांगर्डे, पोलीस हवालदार आबासाहेब झावरे व शरद वांढेकर यांनी कारवाईत महत्त्वाची भूमिका बजावली. पुढील तपास नगर तालुका पोलीस करत असून, आरोपीवर पोस्को कायद्यासह संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## भाग्योदय मंगल कार्यालय लवकरच सुरु होणार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** कोरोना काळापासून बंद असलेले केडगाव येथील भाग्योदय मंगल कार्यालय लवकरच नागरिकांसाठी खुले करण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त यशवंत डांगे यांनी महापालिकेकडून येथे स्वच्छता मोहीम राबवून प्राथमिक कामे सुरू झाली आहेत. आमदार संग्राम जगताप यांच्याकडे परिसरातील नागरिकांनी या कार्यालयाबाबत तक्रार केली होती. त्यानुसार आमदार जगताप यांनी याचे पुनरुज्जीवन करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले होते. या पार्श्वभूमीवर महापालिकेने मंगळवारी (१० जून) स्वच्छता मोहीम राबवून संपूर्ण कार्यालय स्वच्छ केले. मोठ्या प्रमाणावर साचलेला कचरा आला आणि जेटिंग मशिनच्या सहाय्याने कार्यालय धुतले गेले. परिसरातील नागरिकांनीही या मोहिमेत सहभाग घेतला. सध्या कार्यालयातील शटर, वीजपुरवठा आणि इतर किरकोळ दुरुस्त्यांची कामे सुरू आहेत. ती पूर्ण होताच कार्यालय पुन्हा वापरासाठी खुले करण्यात येणार असल्याचे आयुक्त डांगे यांनी स्पष्ट केले.

# शहीद स्मारक हे प्रेरणेचे व देशभक्तीचे पवित्र स्थान ठरेल : मेजर जनरल विक्रम वर्मा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** देशाच्या सुरक्षेसाठी प्राण अर्पण करणाऱ्या वीर जवानांच्या बलिदानाचे स्मरण व त्यातून प्रेरणा मिळावी यासाठी उभारण्यात आलेले शहीद हे एक पवित्र स्थान ठरेल, असा विश्वास मेजर जनरल विक्रम वर्मा यांनी व्यक्त केला. शहरातील सैनिक लॉनमध्ये झालेल्या शहीद स्मारक अनावरण समारंभात ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, ब्रिगेडियर सुनील कुमार, पद्मश्री पोपटराव पवार, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा कल्याण अधिकारी सागर कोरडे, रोटरी क्लबचे डॉ. प्रसन्न देवचक्के आदी मान्यवर उपस्थित होते. मेजर जनरल वर्मा म्हणाले, ‘‘देशसेवा ही सर्वोच्च सेवा आहे. जवान आपल्या सुख-दुःखाकडे दुर्लक्ष करत सीमांवर देशासाठी लढतात. त्यांच्या बलिदानाची जाणीव प्रत्येक नागरिकाने ठेवली पाहिजे. सेवानिवृत्त सैनिकांनी तरुणांना सैन्यात भरती होण्यासाठी प्रेरित करावे. महिलांचाही लष्करात सहभाग वाढत अहिल्यानगरच्या सैनिकी वसतीगृहातील विद्यार्थिनींनी अधिकारी होण्याचा निर्धार करावा.‘‘ ते पुढे म्हणाले की, ‘‘सेवानिवृत्ती ही फक्त लष्करातून असते, देशसेवेतून नव्हे. माजी सैनिकांनी अनुभवाच्या आधारे समाजोपयोगी उपक्रम हाती घ्यावेत. शहीद कुटुंबीयांच्या अडचणी प्रशासनाने संवेदनशीलतेने हाताळाव्यात.‘‘ ५१ शहीद जवानांच्या स्मरणार्थ स्मारक जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी सांगितले की, जिल्ह्यातील ५१ जवानांनी देशासाठी दिले असून त्यांच्या स्मरणार्थ हे स्मारक उभारण्यात आले आहे. हे स्मारक जिल्हावासीयांना प्रेरणा देणारे ठरेल. विद्यार्थिनींच्या वसतीगृहाच्या नूतनीकरणासाठी ४ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. ध्वजदिन निधी संकलनातही जिल्हा आघाडीवर असून यंदाही गतवर्षीपेक्षा जास्त निधी संकलनाचा संकल्प केला आहे. वशेष पंधरवड्यातून समस्यांचे निराकरण१६ ते ३० जून दरम्यान सैनिक त्यांच्या कुटुंबीयांसाठी विशेष पंधरवडा आयोजित करण्यात येणार असून विविध शासकीय विभागांच्या माध्यमातून त्यांच्या अडचणी सोडविल्या जाणार आहेत, अशी माहिती डॉ. आशिया यांनी दिली. सैनिकांचा त्याग व प्रेरणादायी वारसा – ब्रिगेडियर कुमार ब्रिगेडियर सुनील कुमार म्हणाले, ‘‘शहीद स्मारकातून येणाऱ्या पिढ्यांना सैनिकांचे बलिदान, साहस, व देशभक्तीची प्रेरणा मिळेल. आपल्यासाठी त्यांनी सर्वस्व याची जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे.‘‘ हिवरेबाजार मॉडेल गाव संकल्पना – पद्मश्री पवार पद्मश्री पोपटराव पवार यांनी जवानांच्या स्मृती जपणाऱ्या या स्मारकाचे कौतुक करत प्रशासन व लष्कराच्या मदतीने गाव



दत्तक घेऊन आदर्श गाव उभारण्याचा प्रस्ताव मांडला. माजी सैनिकांच्या समस्या सोडवण्यासाठी लवकरच बैठक घेण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. जनतेची मागणी पूर्ण – कोरडे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी सागर कोरडे यांनी सांगितले की, १ शहीद जवानांच्या स्मरणार्थ स्मारक उभारण्याची नागरिकांची मागणी होती, ती आज पूर्ण झाली. या स्मारकातून प्रेरणा व कर्तव्याची जाणीव जनतेला मिळेल. कार्यक्रमात मान्यवरांनी शहीद स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहिली. लष्करातर्फे शहीद जवानांना मानवंदना देण्यात आली. वीरमाता, वीरपिता, वीरपत्नी सन्मान करण्यात आला. स्मारकाच्या उभारणीत मोलाची भूमिका बजावणाऱ्या व्यक्तींचा विशेष सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन डॉ. अमोल बागुल यांनी केले तर आभार कल्याण संघटक चंद्रकांत शिंदे यांनी मानले. कार्यक्रमास वीरमाता, वीरपत्नी, वीरपिता, माजी सैनिक, कल्याण संघटक, वसतीगृह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आगाराच्या दुरावस्थेविरोधात बैठा सत्याग्रह आंदोलन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या येथील आगाराच्या दुरावस्थेच्या विरोधात बुधवारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ग्राहक संरक्षण समितीचे तालुकाध्यक्ष अरविंद सोनटक्के यांच्या नेतृत्वाखाली बसस्थानकावर बैठा सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. पाथर्डी आगाराला नवीन बस गाड्या मिळाव्यात, जुना बस स्थानकावर महिला प्रवाशांसाठी शौचालयाच्या अभावामुळे होणाऱ्या हाल अपेष्टां होत असून व परिसरात प्रमुख तीर्थक्षेत्र असल्याने जिल्हाभरातून अनेक भाविक



भक्त येथे येतात.मात्र या ठिकाणी सुरक्षा, स्वच्छता,शौचालय तसेच जुन्या आणि नव्या बस स्थानकावर सीसीटीव्ही कॅमेरे यांसारख्या मूलभूत सुविधा नाहीत.यामुळे प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.प्रशासनाला जाग आणण्यासाठी आमचा लढा सुरू राहून,येथे असलेल्या उणीवा आणि सोयीसुविधा जो पर्यंत पूर्ण होत नाही तोपर्यंत लढा सुरूच राहील असे यावेळी अरविंद सोनटक्के म्हणाले. या मागण्यांची गांभीर्याने दखल घेत आगार व्यवस्थापक आरिफ पटेल यांनी लेखी आश्वासन दिले की,जुन्या बसस्थानकावर स्वच्छतागृहाची कामे दहा दिवसांत सुरू केले जातील.सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी वरिष्ठ कार्यालयाशी पत्रव्यवहार सुरू आहे.याशिवाय, मागील दोन महिन्यांत पाथर्डी आगाराला दहा नवीन बसेस मिळाल्या असून आणखी वीस मिळाव्यात यासाठी प्रयत्न सुरू आहेत.आंदोलनकर्त्यांनी प्रशासनास सहकार्य करावे,असे आवाहनही करण्यात आले.यावेळी शिवशंकर राजळे,बंडू पाटील बोरुडे,सुभाष हंडाळ,अण्णा हरेर,सचिन नागापूरे,हुमायून आतार,विष्णुपंत पवार,नवनाथ चव्हाण यासह प्रवासी आंदोलनात सहभागी झाले होते.

## बसस्थानकात चोरी करणारी महिला पोलिसांच्या ताब्यात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शहरातील बसस्थानकांत प्रवाशांच्या गळ्यातील सोन्याचे चोरणाऱ्या महिलेला कोतवाली पोलिसांनी काल (ता. १०) दुपारी ताब्यात घेतले. तिच्याकडून कोतवाली पोलिसांनी चोरीचे १७ग्रॅम सोने हस्तगत केले. गुरुवारी (ता. ५) राजश्री भोंडवे या जामखेडला जाण्यासाठी स्वस्तिक चौकात बसमध्ये बसत होत्या. त्यावेळी अज्ञात व्यक्तीने त्यांच्या गळ्यातील मिनीगंठण लंपास केले. या संदर्भात त्यांनी कोतवाली पोलिसांत फिर्याद दिली होती. त्यानुसार पोलिसांनी माहिती मिळवली. त्या आधारे संशयित महिलेला पोलिसांनी माळीवाडा बसस्थानकातून ताब्यात घेतले. तिच्याकडे अधिक विचारपूस केली असता तिने गुन्ह्याची कबुली दिली. तिने चोरीच्या सोन्याची लगड करून बुरुडगाव येथील रेखा भोसलेकडे ठेवायला दिले होते. त्यानुसार पोलिसांनी रेखा भोसलेला बोलावून घेतले. तिने चोरीचे सोने पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. चोरी करणारी महिला ही असल्याने पोलिसांनी तिला बाल कल्याण समिती समक्ष हजर केले आहे.

# उदरमल घाटाच्या अर्धवट कामाला मुहुर्त मिळेना

## काम सोडून वर्षभरापासून ठेकेदार गायब

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**मिरी :** कोल्हार उदलमल घाट रस्ता हा अनेक वर्षाच्या प्रतीक्षेनंतर या कामाला मोठा निधी उपलब्ध करण्यात आला.

मागील एक वर्षांपूर्वी या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले मात्र या रस्त्याचे काम अर्धवट सोडण्यात आल्याने वाहनधारकांना वाहने चालविताना त्रास सहन करावा लागत आहे. कोल्हार गावापासून ते घाट प्रारंभी पर्यंत काही प्रमाणात ह्या रस्तावर खडी टाकली परंतु डांबर टाकून रोलींग करायचे संबंधित ठेकेदार विसरली की काय असा प्रश्न सामान्य वर्गातून उपस्थित होत आहे. हा घाट रस्ता तयार झाल्यानंतर वाहनधारकांना वाहतूक करणे सोयीचे ठरनार असल्याचे स्वप्न अखेर स्वप्नच राहिले. या मार्गाच्या कामात त्रुटी असल्यामुळे तसेच या मार्गाचे अर्धवट झाल्यामुळे वाहनधारकांना अडचण होत आहे. पाथर्डी शेवगाव व नगर या तीन तालुक्यांना जोडणारा महत्त्वाचा कोल्हार घाट रस्ता मागील काही तीन वर्षापासुन दयनीय अवस्थेत आहे. मागील दीड वर्षांपूर्वी या रस्त्याला मंजुरी मिळाली व निधीही उपलब्ध झाला रस्त्याचे काम सुरूही झाले परंतु ठेकेदारांनी हा रस्ता अर्धवट का सोडलाय याची गुढ अजूनही उमगले नाही.या रस्त्याचा सर्वाधिक त्रास शेतकरी विद्यार्थ्यांसह वाहनधारकांना सहन करावा जागत आहे. त्यामुळे सर्वत्र नाराजीचा सुर उमटत आहे. पाथर्डी शेवगाव व नगर तालुक्यातील हजारो शेतकरी आपला शेतमाल विक्रीसाठी नगर मार्केटला आणतात. अनेक विद्यार्थी कामगार शिक्षणासाठी कामानिमित्त नगरला ये जा करत परंतु या मुख्य घाट रस्त्यावर जागोजागी खड्डे पडल्यामुळे नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. या खड्ड्यांचा सर्वाधिक त्रास चिमुकल्या विद्यार्थ्यासह वाहनधारकांना सहन करावा लागत आहे. या खड्यामुळे सतत या रस्त्यावर लहान मोठे अपघात घडत आहेत. या अपघातामुळे अनेकांना कायमचे अपंगत्व आले असून अनेकजण मणक्याच्या दुर्धर आजारांनी ग्रस्त झाले आहे. वारंवार मागणी करुनही रस्ता केला जात नसल्यामुळे नागरिक संतप्त झाले आहेत. त्यामुळे या रस्त्याची तत्काळ दुरुस्ती करण्यात यावी, अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा विद्यार्थ्यांच्या पालकांनी दिला आहे. या घाट रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी कोल्हार उदलमल चिचोंडी शिराळ धारवाडी गीतेवाडी डोंगरवाडी डमाळवाडी मोहोज मांडवे राघूहिवरे कडगाव मिरी येथील नागरिकांची हा प्रमुख मार्ग असल्यामुळे येथील नागरिकांची नियमित या रस्त्यावर वर्दळ असते महत्वपूर्ण कामासाठी येथिल नागरिकांना या रस्त्यावरुन ये जा करावी लागते. रस्त्यावरील खड्डे चुकविण्याच्या नादात अनेकवेळा अपघात झाले आहेत. गरोदर महिलांना दवाखान्यात उपचारासाठी घेऊन जाणाऱ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे. त्यामुळे विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांचे हाल होत आहेत. सार्वजनिक विभागाच्या अधिकाऱ्यांनी या गंभीर समस्यांकडे लक्ष देऊन तत्काळ रस्ता दुरूस्त करावा, अशी मागणी येथील नागरिक करीत आहेत.

मागील चार महिन्यापूर्वी जय हिंद सेवा फाउंडेशन च्या माध्यमातून मी सार्वजनिक बांधकाम विभागाला पावसाळ्यापूर्वी रस्त्याचे काम पूर्ण करा असे निवेदन दिले होते.अन्यथा आंदोलन करू असा इशाराही दिला होता. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आठ दिवसात रस्त्याचे काम सुरू करू व पावसाळ्यापूर्वी रस्ता पूर्ण करू असे आश्वासन दिल्यामुळे मी आंदोलन न करता दोन महिने वाट पाहिली.तक्रार करूनही प्रशासन दखल घेत नाही. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या रस्त्याचे काम पूर्ण करावे. अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

## पोलिस उपनिरीक्षक विष्णू लामखडे यांचे पोलिस दलातील कार्य सेवाभावी रामराव पवार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**निघोज:** निघोज व परिसराचा नावलौकिक मुंबई महानगरीत करण्यासाठी निघोज गावचे पोलिस उपनिरीक्षक विष्णू लामखडे यांनी मोठ्या प्रमाणात योगदान दिले असून पोलिस दलात ३४ वर्षे कार्यरत राहताना सेवाभाव कसा असावा याचे उत्तम उदाहरण लामखडे यांनी घालवून दिले असल्याचे गौरवोद्गार संत निळोबाराय विद्यालयाचे प्राचार्य रामराव पवार यांनी व्यक्त केले आहे. निघोज येथील विष्णू शंकर लामखडे यांनी गेली ३४ वर्षे मुंबई व शहरांमध्ये पोलिस दलात पोलीस ते पोलिस उपनिरीक्षक या पदावर कार्यरत राहीले ते नुकतेच सेवानिवृत्त झाले. निघोज येथील कपिलेश्वर मंगल कार्यालयात निघोज ग्रामस्थ, मुंबईकर मंडळ तसेच लामखडे परिवार त्यांचे आप्तेष्ट नातेवाईक मित्र मंडळ यांच्या वतीने त्यांचा सेवानिवृत्त सेवापूर्ती निमित्ताने सत्कार व सन्मान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्राचार्य पवार होते. यावेळी माजी पंचायत समितीचे सदस्य डॉ.भास्करराव शिरोळे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे माजी कोषाध्यक्ष ज्ञानेव लंके, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ, सरपंच चित्राताई वराळ पाटील, माजी सरपंच ठकारामशेठ लंके, शिवबा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अनिल शेटे, मुंबई येथील व्यवसायीक राजूशेठ वराळ पाटील, बाळासाहेब लंके, श्री.स्वामी समर्थ ट्रस्टचे अध्यक्ष अनिल आवारी, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त शंकरराव लामखडे, मेजर अमोल ठुबे, जिल्हा सहकारी बँकेचे तालुका विकास अधिकारी प्रभाकर लाळगे, प्रा.रामराव लामखडे, अर्जुन वराळ, बबनराव पठारे, मेजर शिवाजीराव लोखंडे , पारनेर तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष भास्करराव कवाद, निघोज व्यापारी असोसिएशनचे विश्वस्त लहूशेठ गागरे, प्रसिद्ध सुत्रसंचालक शरद ठुबे तसेच अहिल्यानगर,पुणे, मुंबई भागातील मित्र परिवार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सेवानिवृत्त पोलिस उपनिरीक्षक लामखडे यांचा विवीध संस्था तसेच व्यक्ती आणी पत्रकार संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. सेवानिवृत्त पोलिस उपनिरीक्षक विष्णू लामखडे यांनी सांगितले की, राज्यातील जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा मातेच्या दस्पर्शाने पुनित झालेल्या निघोज नगरीत आपण आलो याचा आपल्याला अभिमान आहे. लहानपणाचा गेली पन्नास वर्षांपूर्वीचा काळ आठवला तर अंगावर काटा येतो. कष्टाळू आई वडील त्यांनी आपल्या शिक्षणासाठी घेतलेले परिश्रम, नातेवाईक व मित्र परिवार यांनी दिलेले



पाठबळ, आपण पोलिस दलात जाऊन देशाची सेवा करावी ही पहिल्यापासून अपेक्षा असल्याने पोलिस दलात भरती झालो. गेली चौतीस वर्षे मुंबई उपनगरी शहरांमध्ये म्हणजे मुंबई महानगरीत सेवा करताना सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवीत त्यांच्यावर झालेला अन्याय दूर करीत मला खऱ्या अर्थाने सामाजिक कामांच्या माध्यमातून सेवाभाव करता आला हे मी माझे भाग्य समजतो. माता मळगंगा देवीच्या आशीर्वादाने पोलीस ते पोलिस उपनिरीक्षक या पदावर काम करण्याची संधी मिळाली. मुंबई स्थायीक असणाऱ्या अहिल्यानगर,पुणे जिल्ह्यातील मुंबईत मोठ्या प्रमाणात संपर्क झाला. सामाजिक काम कशाप्रकारे करु शकतो याची माहिती पोलीस दलात झाली. आपण सेवानिवृत्त झालो असलो तरी सामाजिक कामांच्या माध्यमातून निघोज आणी परिसरात सेवाभाव करण्याचा संकल्प असल्याचे लामखडे साहेब यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद ठुबे यांनी केले शेवटी लहूशेठ गागरे यांनी केले.

## घारगाव कृषी महाविद्यालयाच्या कृषीकन्यांनी साकारला रांगोळीतील गाव नकाशा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :-** श्री दत्तकृपा ग्रामविकास शिक्षण संस्थेच्या कृषी महाविद्यालयातील कृषीकन्यांनी कोळगाव (ता. घारगाव) येथील ग्रामपंचायतीच्या प्रांगणात रांगोळीच्या माध्यमातून गावाचा नकाशा साकारून एक वेगळा व अभिनव उपक्रम राबवला. या उपक्रमाचे पंचक्रोशीतील शेतकऱ्यांसह ग्रामस्थांनी भरभरून कौतुक केले. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत ग्रामीण जागरूकता कृषी कार्यानुभव व औद्योगिक जोड प्रकल्प २०२५-२६या कार्यक्रमांतर्गत हा उपक्रम आला. या उपक्रमात कृषीकन्यांनी गावातील जलकुंभ, सरकारी कार्यालये, साक्षरता तक्ता, वार्षिक पीक तक्ता, उत्पादन तक्ता, मातीचा प्रमाण तक्ता, सामाजिक नकाशा, रस्ते नकाशा, रहदारी नकाशा आदी घटकांचा समावेश असलेला नकाशा रांगोळीच्या माध्यमातून साकारला. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एच. निंबाळकर, कार्यक्रम समन्वयक प्रा. जे. एस. राठोड व कार्यक्रम अधिकारी एस. एस. फुंदे यांचे मार्गदर्शन लाभले. कृषीकन्या अस्मिता इंपाळ, वीर कावेरी, बंडे मेघा व बनसोडे प्रज्ञा यांनी हा उपक्रम यशस्वीपणे पूर्ण केला. या वेळी कोळगाव ग्रामपंचायतीचे सदस्य, गावकरी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावातील सर्व महत्त्वाची माहिती रांगोळीच्या माध्यमातून मिळाल्यामुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. तसेच असे शैक्षणिक व उपक्रम वारंवार राबवावेत, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.




# कान्हूर मेसाई येथे खरीप पूर्व पीक नियोजन, शेतकरी मेळावा उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पाबळ :**कान्हूर मेसाई येथे कृषी व किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने टी.व्ही एस कंपनीच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला. ‘कृषी संकल्प अभियान २०२५’ अंतर्गत खरीप पूर्व पीक नियोजन व शेतकरी मेळाव्याचे आयोजन आले. यावेळी शेतकऱ्यांना विविध खरीप पिकांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी कृषी विज्ञान केंद्र, नारायणगाव येथील विषयतज्ज्ञ डॉ. राहुल घाडगे, शास्त्रज्ञ डॉ. सतीश यादव, डॉ. प्रांजली गेडाम,उपकृषी अधिकारी अशोक गायकवाड, प्रगतिशील शेतकरी, ग्रामपंचायत सदस्य व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. राहुल घाडगे यांनी शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी माती परीक्षण, व योग्य बीज प्रक्रिया करून पेरणी करण्याचे महत्त्व समजावून सांगितले. ,

तसेच युरिया ब्रिकेटचा योग्य वापर, माती परीक्षणाचे महत्त्व आणि माती परीक्षण अहवालानुसार खत व्यवस्थापन याबाबत सविस्तर माहिती दिली. सहाय्यक कृषी अधिकारी अर्चना वागदरे यांनी शासनाच्या विविध कृषी योजनांची माहिती दिली. या कार्यकामाचे आयोजन टी. व्ही. एस कंपनीचे सोमनाथ काटकर, पवळे, मालन जाधव व ग्रामस्थ यांच्या सहकार्याने करण्यात आले. याप्रसंगी कान्हूच्या सरपंच आशिया तांबोळी, राष्ट्रवादी सरचिटणीस बबन शिंदे, मा. सरपंच बंडू पुंडे, सोपान पुंडे, दिपक तळोले, अनिल शिंदे, प्रकाश पुंडे, समाजसेवक शहाजी दळवी आदी शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

‘‘महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवड करावी. कृषी योजनांचा लाभ घ्यावा. अर्चना वागदरे, सहाय्यक कृषी अधिकारी, शिरूर ‘‘शेतकऱ्यांनी माती परीक्षण करणे गरजेचे आहे. आपल्या शेतातील माती तपासूनच खते द्यावीत. सर्व पिकांच्या मार्गदर्शनासाठी कृषी विज्ञान केंद्र नारायणगाव शेतकऱ्यांच्या कायम सेवेत आहे.

**डॉ. राहुल घाडगे, विषयतज्ज्ञ, कृषी विज्ञान केंद्र नारायणगाव**



दैनिक
# राष्ट्र सह्याद्री





## बेलापुरात साडेतेरा लाखांचा गुटखा जप्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** शहर व तालुका पोलिसांच्या संयुक्त पथकाने बेलापूरमध्ये छापा टाकून १३ लाख ५२ हजार रुपयांचा गुटखा व ५ लाख रुपये किंमतीचा आयशर टेम्पो असा एकूण १८ लाख ५२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी आपल्या कारकीर्दीची सुरुवात श्रीरामपूरमध्ये केली होती, आता जिल्हा पोलीस अध्यक्ष अधीक्षक पदाचा कार्यभार स्वीकारताच ठोस कारवाईची सुरुवातही श्रीरामपूरमधून केली आहे.बेलापुरातील साई पेट्रोलपंप जवळील एका घरासमोर उभे असलेल्या टेम्पो (क्रमांक एमएच ०७ एफ ३१००) तपासणी केली असता त्यात गोवा कंपनीचा, राज्यात बंदी असलेला गुटखा आढळून आला. कारवाईदरम्यान दोघेजण घटनास्थळावरून पळून गेले, इतर दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे.पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी ही माहिती दिली. उपनिरीक्षक संदीप मुरकुटे यांच्या पथकाने ही कारवाई केली. त्यानंतर अन्न व औषध प्रशासन अधिकाऱ्यांना घटनास्थळी पाचारण करण्यात आले. रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. बेलापूर परिसरात यापूर्वीही गुटखा साठवणुकीच्या व विक्रीच्या घटना उघडकीस आलेल्या आहेत. अन्न व औषध प्रशासनानेही अशा कारवाई केल्या आहेत. मात्र आता पोलीस अधीक्षक घार्गे यांच्या नेतृत्वाखाली ही प्रथमच ठोस कारवाई झाली आहे.दरम्यान याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात अन्नसुरक्षा अधिकारी अहिल्यानगर राजेश नामदेव बडे यांनी फिर्याद दाखल केली आहे, यातील आरोपी आरिफ विनोद शेख वय ३० राहणार बेलापूर बुद्रुक उर्दू शाळेजवळ, सोमनाथ संपत शिंदे वय २४ राहणार पाहुणे नगर बेलापूर बुद्रुक यांना ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पाथरे खुर्द येथे बेकायदा खताचा साठा जप्त

## कृषी विभागाची कारवाई; एकाविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील पाथरे खु. येथे, कृषी विभागाने केलेल्या कारवाईत मोठ्या प्रमाणात बनावट खतांचा साठा जप्त केला असून या प्रकरणी संदीप यमाजी जाधव रा .पाथरे खु. यांच्याविरुद्ध अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ आणि रासायनिक खते (नियंत्रण) आदेश, १९८५ तसेच भारतीय न्याय संहिता, २०२३ अंतर्गत विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अहिल्यानगर येथील खत निरीक्षक तथा जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक राहुल बाळासाहेब ढगे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांना १० जून, २०२५ रोजी मिळालेल्या गुप्त माहितीनुसार पाथरे खु. येथील चैतन्य हार्डवेअर ( वळण रोड , पाथरे खु.) मध्ये विनापरवाना



खतांचा साठा असून त्यांची बेकायदा विक्री केली जात आहे.

या गुप्त माहितीच्या आधारे, राहुल ढगे यांनी राहुरी तालुका कृषी अधिकारी बापूसाहेब अण्णासाहेब शिंदे आणि कृषी अधिकारी गणेश नारायण अनारसे यांच्या पथकासह चैतन्य हार्डवेअर, वळण रोड, पाथरे खु., तालुका राहुरी, जिल्हा अहिल्यानगर येथील गोदामावर छापा टाकला.या छापा मध्ये सापडलेला खतांचा पंचनामा करण्यात आला त्यामध्येगोदामात विक्रीसाठी ठेवलेल्या ५० किलोच्या गोण्या, १० किलोच्या बादलीतील खते आणि १ लिटरमधील द्रव खते मोठ्या प्रमाणात आढळून आली. संदीप यमाजी जाधव (वय ४२, रा. पाथरे खु., ता. राहुरी, जि. अहिल्यानगर,) यांची चौकशी केली असता, त्यांच्याकडे खते विक्री आणि साठवणुकीचा कोणताही परवाना नसल्याचे समोर आले. तसेच त्यांनी खत खरेदीची बिले किंवा साठा नोंदवही (पुस्तक) यासारखी कोणतीही आवश्यक कागदपत्रे सादर केली नाहीत.

या कारवाईत एकूण रु. ७,४९,७३०/- किमतीचा खतांचा साठा जप्त करण्यात आला, ज्यात विविध प्रकारच्या कृषी उत्पादनांचा समावेश आहे:कृषी समृद्धी ७८ पावडर (५० किलो, ७५ गोणी) - रु. ४१,२५०, कृषी समृद्धी ७८ पावडर (५० किलो, ६५ गोणी) - रु. ४८,७५०, पोटॅश दाणेदार बायोफर्टिलायझर (५० किलो, ४२ गोणी) - रु. ४४,१००, किसान कॉटन आणि मका स्पेशल ऑरगॅनिक खत (५० किलो, ५२ गोणी) - रु. ५४,६००, ट्रायकोन ऑर्बिट (१० किलो, ४८ बकेट) - रु. ४६,०८०, सुपर बुस्टर (१ लिटर, ६ बॉटल) - रु. ५,१००, रुद्र पॉवर (१ लिटर, ४९५ बॉटल) - रु. ५,०९,८५०.

संदीप यमाजी जाधव यांनी विनापरवाना आणि नियमबाह्य पद्धतीने खतांचा साठा करून त्यांची विक्री केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे, त्यांना विक्री बंद करण्याचे आदेश बजावण्यात आले असून हा साठा इतरत्र हलवू नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.पुढील तपास राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलीस करत आहेत .

## महापालिकेसह १२ पालिकांच्या निवडणुकीची पूर्वतयारी सुरू

### प्रभागरचनेचा कार्यक्रम जाहीर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर महापालिकेसह जिल्ह्यातील बारा नगरपालिका व नगरपंचायतींच्या प्रभागरचनेचा कार्यक्रम शासनाने जाहीर केला आहे. त्यामुळे महापालिका आणि नगरपालिका निवडणुकीची पूर्वतयारी सुरु झाली आहे.

गेल्या तीन वर्षापासून नगरपालिका आणि महापालिकेच्या निवडणुका रखडल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने सप्टेंबरपर्यंत निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार शासनाच्या नगरविकास विभागाने राज्यातील ड वर्ग महापालिका आणि नगरपालिकांची प्रभागरचना करण्याचे आदेश जारी केले आहेत.

यामध्ये जिल्ह्यातील अहिल्यानगर महापालिकेचा समावेश आहे. याशिवाय संगमनेर, कोपरगाव, शिर्डी, राहाता, श्रीरामपूर, पाथर्डी, शेवगाव, श्रीगोंदा, जामखेड, देवळाली प्रवरा व राहुरी अकरा



नगरपालिका व नेवासा नगरपंचायतीचा समावेश आहे.अहिल्यानगर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी चार सदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार प्रभागरना करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रभागरचनेचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. महापालिका आयुक्त यांनी प्रारुप प्रभागरचना तयार करुन जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करणे, जिल्हाधिकारी यांनी सदर प्रभागरचना राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करणार आहेत.

आयोगाने मान्यता दिल्यास महापालिका आयुक्त सदर प्रारुप प्रभागरचना प्रसिध्द करणार आहेत. यावर दाखल झालेल्या हरकतींची जिल्हाधिकारी सुनावणी घेणार आहेत. सुनावणीनंतर जिल्हाधिकारी अंतिम प्रभागरचना राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविणार आहेत. आयोगाची मान्यता मिळाल्यानंतर महापालिका आयुक्त अंतिम प्रभागरचना प्रसिध्द करणार आहेत.नगरपालिका आणि नगरपंचायतींची प्रभागरचनेचे अधिकार देखील जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत. संबंधित नगरपालिकांचे मुख्याधिकारी हे प्रारुप प्रभागरचना तयार करुन जिल्हाधिकारी यांना सादर करणार आहेत. याला मान्यता मिळावी यासाठी जिल्हाधिकारी राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविणार आहेत.

आयोगाची मान्यता मिळाल्यानंतर मुख्याधिकारी प्रारुप प्रभागरचना प्रसिध्द करणार आहेत. यावर दाखल सुनावणी देखील जिल्हाधिकारी घेणार आहेत. अंतिम प्रभागरचना मुख्याधिकारी प्रसिध्द करणार आहेत. लोकसंख्येच्या आधारावर एकूण सदस्यसंख्या निश्चित केली जाणार आहे. एका प्रभागातून एक सदस्य निश्चित केला जाणार आहे. नगरपंचायतीसाठी १७ सदस्यसंख्या निश्चित केली आहे.

अहिल्यानगर महापालिकेसाठी एकूण लोकसंख्या भागिले महापालिकेची एकूण सदस्यसंख्या गुणिले संबंधित प्रभागातून निवडून द्यावयाच्या सदस्यांची संख्या या सूत्रानुसार प्रभाग तयार केले जाणार आहे. मंगळवारी (दि.१०) जारी केलेल्या कार्यक्रमात तारीख निश्चित केलेली नाही. येत्या काही दिवसांत तारखेचा कार्यक्रम येण्याची शक्यता आहे. शासनाने प्रभागरचना करताना कोणत्या पध्दतीचा वापर करावयाचा याबाबत जिल्हा प्रशासनासाठी विविध मार्गदर्शन सूचना जारी केल्या आहेत.

## भुईकोट किल्ल्याजवळ दिसला १३ फुटी अजगर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** येथील किल्ल्या जवळील आय लव नगर गार्डन जवळ मंगळवारी रात्री १३ फुटी रॉक पायथन अजगर येथील रहिवासी सामाजिक कार्यकर्ते व व्यापारी गोविंद जोशी, कौशल जोशी व करण पारखे यांना रात्री घरी जाताना दिसला.त्यांनी त्वरित सर्पमित्र अमित गायकवाड यांना बोलून घेतले व त्याला पकडण्यासाठी त्यांना अर्धा तास लागला.यावेळी पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती,सकाळी त्याला दूर जंगलात निसर्ग अधिवासात सोडण्यात आले

गोविंद जोशी यांनी आत्तापर्यंत या परिसरात वर्षभरात ४ अजगराचे प्राण वाचवले आहेत तसेच अनेक सरपटण्याऱ्या प्राण्याचे त्यांनी अनेक वर्षापासून प्राण वाचवत आहे, त्यांना रेसिक्यू करून त्याच्या अधिवासात सोडत आहेत, यामध्ये ३ किल्ल्याजवळ व १ बेलेश्वर मंदिर जवळ त्यांनी



पाहिल्यावर सर्पमित्रांना बोलावून त्यांना पकडले.नाहीतर रात्रीच्या वेळेस हे गाडीखाली येऊन मृत्युमुखी पडतात,रात्रीच्या वेळेस हे अजगर पावसाळ्यात,उन्हाळ्यात बाहेर पडतात.त्यामुळे या परिसरात रात्री पायी फिरताना व गाडी चालवणाऱ्यांनी काळजी घ्यावी असे सरपटणारे प्राणी दिसल्यास त्यांना वाचवावे व त्वरित सर्पमित्रांना कळवावे असे ते म्हणाले. हा भाग निसर्ग संपन्न आहे तसेच नगरजवळ सर्वच ठिकाणी वन्यप्राणी मोठ्या प्रमाणावर आहेत,यामध्ये भारतात रॉक पायथन हा दुर्मिळ होत चाललेला आहे आणि त्याला वाचवण्याची गरज आहे,किल्ला परिसरात परिसरात मोर,विषारी बिनविषारी सर्प,विविध पक्षी यांचा मोठ्या प्रमाणावर ती अधिवास आहे. येथे जंगल पण आहे व खंदक पण आहे,त्यामुळे त्यांना सुरक्षित जागा आहे,जिल्हा प्रशासनाने या ठिकाणी त्यांचे संवर्धन करण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी ही गोविंद जोशी यांनी केली आहे

अजगर (ठेलज्ञ झ्रींहेप) हा जगात वावरणारा सर्वात मोठा बिनविषारी सर्प आहे.सरीसृप वर्गातील बोइडी कुलातील पायथॉनिनी उपकुलात त्याचा समावेश होतो.जगाच्या विविध भागांत अजगराच्या अनेक जाती आढळतात.पायथॉन मोलुरस या जातीचे अजगर संपूर्ण भारतात आढळतात.

## पहिल्या पत्नीशी फारकत घेण्यासाठी दुसऱ्या पत्नीकडे १० लाखांची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** पहिल्या पत्नीशी फारकत घेण्यासाठी दुसर्या पत्नीकडे १० लाख रुपयांची मागणी करुन दुसर्या पत्नीचा शारीरिक व मानसिक छळ करण्यात आला. या बाबत राहुरी पोलिस ठाण्यात पतीसह तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

स्मिता मोहित मंडलिक, वय ३५ वर्षे, रा. कॉलेज रोड, राहुरी, यांच्या पहिल्या पतीचे निधन झाल्यानंतर त्यांचे दुसरे लग्न सनी दिलीप कर्पे शिध्दीविनायक मंदिर रोड वार्ड नं ७ श्रीरामपुर याचेशी दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी झाले होते. लग्नानंतर स्मिता मंडलिक यांना सासरच्या लोकांनी काही दिवस चांगली वागणूक दिली. परंतु काही दिवसानंतर सनी दिलीप कर्पे याचे प्रतिभा पावसे हिचेशी लग्न झालेची माहिती स्मिता मंडलिक यांना मिळाली.त्याबाबत त्यांनी पतीला विचारले तू तुझे पहिले लग्न माझेपासून लपवून का ठेवले, असे विचारणा केली असता त्याने मला सांगितले की, ती मागील काही वर्षापासून माझे सोबत राहत नाही आमची लवकरच फारकत होणार आहे. काही दिवसानंतर पती सनी कर्पे याने सांगितले की, प्रतिभा हिला फारकत देण्यासाठी तू तुझ्या नावे असलेली प्रॉपर्टी विकून मला १० लाख रूपये दे.त्यानंतर सासरच्या लोकांनी वारंवार पैशाची मागणी करुन स्मिता मंडलिक यांचा शारीरिक व मानसिक छळ केला. स्मिता मंडलिक यांनी अखेर राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून आरोपी सनी दिलीप कर्पे, दिलीप कर्पे, विमल दिलीप कर्पे, रा. सिध्दी विनायक मंदिर रोड, श्रीरामपूर या तिघांवर गुन्हा रजि. नं. ६४६/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ११५ (२), ३५२, ८५, ८६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

## निवृत्त अधिकाऱ्यांना पुन्हा प्रशासनात येण्याची संधी

### ६५ वर्षांपर्यंत कंत्राटी पद्धतीने सेवेत घेणार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** मंत्रालयासह अनेक शासकीय ठिकाणी कंत्राटी भरतीला प्राधान्य देणाऱ्या राज्य सरकारने आणखी एक मोठा निर्णय घेतला आहे. आता सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनाही कंत्राटी पद्धतीने पुन्हा सेवेत घेता येणार आहे.

वयाच्या ६५ व्या वर्षांपर्यंत या अधिकाऱ्यांना कंत्राटी पद्धतीने काम करता येणार आहे. राज्य शासनाच्या या निर्णयाला कर्मचारी आणि अधिकारी संघटनांनी मात्र विरोध केला आहे. अशा अधिकाऱ्यांची निवड करताना मर्जीतल्या अधिकाऱ्यांनाच संधी दिली जाईल, भेदभाव होण्याची शक्यता असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे.

राज्यातील बहुतांश खात्यातील जागा कायमस्वरुपी न भरता त्या कंत्राटी पद्धतीने भरण्याला राज्य सरकारने प्राधान्य दिलं आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी नव्याने भरतीच झाली नसल्याचे दिसून येते. त्यातच आता राज्य सरकारने आणखी निर्णय घेतला आहे. शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या सरकारी अधिकाऱ्यांना पुन्हा कंत्राटी पद्धतीने सेवेत घ्यायचा मार्ग मोकळा झाला आहे. वयाच्या ६५ व्या वर्षांपर्यंत अशा अधिकाऱ्यांना कंत्राटी भरतीच्या माध्यमातून सेवेत घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यामध्ये सर्व शासकीय आणि निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना करार पद्धतीने सेवेत घेता येणार आहे. सध्या राज्यात शासकीय निवृत्तीचे वय ५८ वर्षे आहे. त्यामुळे करार पद्धतीने अशा अधिकाऱ्यांना आणखी सात वर्षे सेवेत राहता येणार आहे. मात्र राज्य सरकारच्या या निर्णयाला कर्मचारी, अधिकारी संघटनांचा विरोध आहे.

#### निवृत्तीचे वय ६० वर्षे करा

जर राज्य सरकार ६५ वर्षांपर्यंत करार पद्धतीने कामावरती घेत असेल तर निवृत्तीचं वय ६० वर्षे का करत नाही असा प्रश्न त्यांनी विचारला आहे. राज्यात सध्या शासकीय कर्मचाऱ्याच्या निवृत्तीचे वय ५८ वर्षे इतके आहे. ते वाढवून ६० वर्षे करण्यात यावे अशी मागणी सातत्याने केली जात आहे. या आधी निवृत्तीचे वय हे ६० वर्षेच होतं. पण नंतर ते कमी करून ५८ इतके करण्यात आलं. आता निवृत्तीचे वय पुन्हा ६० वर्षे करावे अशी मागणी कर्मचारी आणि अधिकारी संघटनांनी केली आहे.

#### तर मर्जीतल्या अधिकाऱ्यांची होईल निवड...

राज्य शासनाच्या या निर्णयाला कर्मचारी आणि अधिकारी संघटनांनी मात्र विरोध केला आहे. अशा अधिकाऱ्यांची निवड करताना मर्जीतल्या अधिकाऱ्यांनाच संधी दिली जाईल, भेदभाव होण्याची शक्यता असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे.

# आळंदीत वारकरी संस्थांवर सरकारी गंडांतर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** पुणे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या अधिपत्याखाली फेब्रुवारी महिन्यात आळंदी, डुडुळगाव आणि केळगाव परिसरातील सुमारे १६८ वारकरी शिक्षण संस्थांची तपासणी करण्यात आली.या तपासणीत अनेक गंभीर त्रुटी आढळून आल्या असून, अनेक संस्था नियम व परवानग्यांशिवाय सुरू असल्याचे स्पष्ट झाले आहे.

यामध्ये शासकीय परवानग्यांचा अभाव, वसतिगृह परवाना नसणे, मुले-मुलींना एकत्र ठेवणे, बालकांच्या नोंदी ठेवणाऱ्या वह्या उपलब्ध नसणे, अपुरी स्वच्छतागृहे, बालस्नेही वातावरणाचा अभाव, जेवणाचा दर्जा अत्यंत हलक्या स्वरूपाचा, अपुरी वीज व इतर मुलभूत सुविधा अशा विविध कारणांहून अनेक संस्था मोघमपणे चालविल्या जात असल्याचे मत पुणे जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्यांनी केलेल्या सर्वेक्षणात दिसून आले.

सर्वेक्षणामध्ये ९१ संस्था नोंदणीकृत आहेत. तर, ७७ संस्था नोंदणीकृत नाहीत, २५ संस्थांमध्ये सुविधा आहेत पण मर्यादित, तर ९१ संस्थांमध्ये सुविधांचा वानवा असून सर्वेक्षणावेळी तब्बल ३८ संस्था बंद असल्याचे निदर्शनास आले. असे असतानाही राज्य सरकारकडून याबाबत पुढील कारवाई होत नसल्याचे चित्र आहे. राज्यभरातून अध्यात्मिक शिक्षण घेण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांकडून आजही काही महाराज मंडळी जाहिरात बाजी करून ३५ ते ५० हजार रुपयांपर्यंतचे शुल्क आकारून संस्थेत प्रवेश देण्यासाठी आवाहन करत असल्याचे चित्र आहे.

संत ज्ञानेश्वर माउलींचे अखंड वास्तव्य असणा-या देवाच्या आळंदीत काही वारकरी शिक्षण संस्थेत चुकीचे प्रकार घडल्याने पोक्सोसारख्या गुन्ह्याची नोंद संस्थाचालकाविरोधात जानेवारी मार्च महिन्यात करण्यात आली होती. यापूर्वीही काही गुन्हे गेल्या दहा वर्षात घडले. दरम्यान, काही बोगस आणि व्यापारी वृत्तीच्या पोटभरू संस्थाचालकांमुळे प्रामाणिकपणे संस्था चालविणारेही भरडले जात होते. मात्र, देवाच्या आळंदीची बदनामी होवू



नये, यासाठी संस्थाचालकांवर बंधने आणून बंधनात न राहणा-या संस्था सरसकट बंद करण्याची मागणी आळंदीकरांची होती.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्याकडे एप्रिलमध्ये आळंदीत भेट घेत संस्थांचालकांकडून बालकांचे होणारे शारीरिक आणि आर्थिक शोषणबाबत आळंदीकर तरूणाईंनी तक्रार केली होती. त्यानुसार चाकणकर यांनी आळंदी पोलिस ठाण्यात बैठक आयोजित करून ४८ तासांत संस्थांची तपासणी करून कारवाईचे आदेश दिले होते. याचा परिणाम राज्य पातळीवरून सुत्रे हलली आणि जवळपास १६८ वारकरी आणि अध्यात्मिक शिक्षण देणा-या संस्थांची तपासणी केली होती. या तपाणीमध्ये अनेक ठिकाणी संस्थाचालकांनी संस्था बंद असल्याचे सांगितले, तर काहींनी संस्था अन्य जिल्ह्यात सुरू असल्याचे सांगितले.

काही ठिकाणी मुलांना जेवणापासून शौचालये, खोलीमध्ये वीज व्यवस्था नसल्याचे दिसून आले. काही ठिकाणी फरशी पुसण्याचे काम विद्यार्थ्यांकडूनच घेतले जात असल्याचे दिसून आले. काही ठिकाणी मुले- मुली एकत्र राहत असल्याचा धक्कादायक प्रकार आढळला. काही संस्थांना शासकीय परवानग्या नसल्याचे दिसून आले. विद्यार्थ्यांकडून पैसे घेवूनही काही संस्थाचालक स्वतःच्या, तसेच धर्मशाळेच्या जागेत वसतिगृहाचा परवाना न घेताच मुलांना प्रवेश देत. अनेक संस्था तर महाराज आणि त्यांची पत्नीच चालवीत. त्यासाठी पुरेसा कर्मचारीही नाही. यामुळे बालकांच्या नोंदणी नसणे, सुविधा न देणे या कारणावरून संस्था बंद ठेवण्याच्या लायकीचा असल्याचा अहवाल जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडून देण्यात आला.

मात्र, अशा गल्लाभरू संस्थांमुळे ज्या इमानेइतबारे संस्था चालवितात त्यांच्यावर गंडातर आले आहे. गुरूकृपा वारकरी शिक्षण संस्था, श्रीनाथ शिक्षण संस्थासारख्या जवळपास पंचवीस संस्थांमध्ये सुविधा चांगल्या असून मुलांना चांगले घडविले जाते. या ठिकाणी मुलांना मर्यादित ४० विद्यार्थ्यांना प्रवेश आहे. संस्थेचे नोंदणीपत्र, सूचनापेटी ठेवण्यात आली आहे. काही ठिकाणी सीसीटिव्हीही आहेत.

खरेतर अजूनही काही संस्थाच्या तपासण्या झालेल्या नाहीत. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, नगरपरिषद, पोलिस यांनी केलेल्या संयुक्त पाहणीत अनेक धक्कादायक बाबी आहेत. राज्याच्या महिला आयोग अध्यक्षा रुपाली चाकणकर आळंदीत आल्यावर कारवाईचे पाऊल सुरू झाले. तरीही, अवघ्या तिशीच्या आतील वयाचे महाराज संस्था चालवित आहेत. यंदाच्या वर्षात पन्नास हजार रुपये वार्षिक आकारणी होत आहे. नगरपरिषदेने यंदाच्या आर्थिक वर्षात संस्थांची तपासणी करून घरपट्टी, नळपट्टी व्यावसायिक दराने आकारावी. तसेच अनाधिकृत संस्थांवर कारवाई करावी. मुलतः बाालकांचे आर्थिक आणि शारीरिक शोषण होवू नयेत, यासाठी संस्था बंद करणे गरजेचे आहे.